रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक १२५ । पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹

## जिताडाला मिळाला २४ हजारांचा भाव

**नवीन पनवेल :** पनवेलजवळील खाडीत वाणा प्रकारच्या मासेमारीत तब्बल २० किलो वजनाचा जिताडा मासा मिळाला. पारगाव गावातील एका खवय्याने हा मासा तब्बल २४ हजारांना खरेदी केला आहे. पनवेल तालुक्यात जिताडा माशाला पापलेट, हलव्यापेक्षा जास्त मागणी असते. कोल्ही-कोपर गावातील स्थानिक मच्छीमार सत्यवान पाटील, चंद्रकांत म्हात्रे, पारगावचे अंकुश गायकवाड यांनी खाडीकिनारी एक ते दोन किमीच्या परिघात काठ्या गाडून जाळे बांधले होते. भरतीच्या वेळी जाळे खाडीच्या बाजूने काठीच्या उंचीवर उभे केले होते. या जाळ्यात तब्बल २० किलो वजनाचा जिताडा मासा सापडला. रायगड, पनवेलच्या परिसरात या माशाला खाणाऱ्यांचा मोठा वर्ग आहे. पनवेल खाडीत वाणा प्रकारच्या पांरपरिक पद्धतीने ही मासेमारी केली जाते.

## जैन मुनींची राजकारणात एन्ट्री

**मुंबई :** मुंबईत कबुतरखान्यावरील वाद चांगलाच पेटला आहे. याच पार्श्वभूमीवर जैन समाजाकडून शनिवारी (११ ऑक्टोबर) धर्मसभा घेण्यात आली. या सभेत जैन मुनींनी सरकारला इशारा देत राजकारणात नवा वळण देणारी घोषणा केली. ''जैन समाज सर्वाधिक टॅक्स भरतो, पण आमच्या भावनांचा विचार कोणी करत नाही,'' असं म्हणत जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी नवीन 'जन कल्याण पार्टी' स्थापन केल्याची घोषणा केली. या नव्या पक्षाचं चिन्ह कबूतर असणार आहे. ''शिवसेनेला वाघाचं चिन्ह होतं, आता आमच्या पार्टीचं चिन्ह कबूतर असेल,'' असं निलेश मुनी म्हणाले. ''ही फक्त जैनांची नाही, तर गुजराती, मारवाडी आणि सर्व शांतताप्रिय समाजांची पार्टी आहे. आमच्या पक्षात चादर-फादर सोडून सर्वांना प्रवेश आहे,'' अशी घोषणा करून त्यांनी राजकीय हलचाल वाढवली आहे.

### वेधक

## जल जीवनच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची दिवाळी अंधारात ?

**उरण :** जल जीवन मिशनच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची यंदाची दिवाळी अंधारात जाण्याची शक्यता आहे कारण गेली चार महिन्यांपासून कंत्राटी कामगारांचे मानधन थकीत आहे. निधीअभावी ही गंभीर परिस्थिती उद्भवली असल्यामुळे कंत्राटी कामगारांची यंदाची दिवाळी मात्र अंधारात जाणार आहे. त्यामुळे शासनाने यावर त्वरित तोडगा काढावा अशी मागणी कंत्राटी कामगारांनी शासनाकडे केली आहे.

हे सर्व कर्मचारी जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन या केंद्र पुरस्कृत योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सातत्याने काम करीत आहेत. कर्मचाऱ्यांनी सांगितले की, 'आम्ही वेळोवेळी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संपर्क साधला असता, केंद्र सरकारकडून निधी प्राप्त झालेला नाही म्हणून मानधन देणे शक्य नाही,' अशी उत्तरे मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांनी प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना तसेच प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांना निवेदन सादर करून मानधन तातडीने मंजूर करण्याची मागणी केली आहे.

## अनिल अंबानींना मोठा धक्का

**नवी दिल्ली :** उद्योजक अनिल अंबानी यांना मोठा धक्का बसला आहे. रिलायन्स पॉवर कंपनीचे मुख्य वित्तीय अधिकारी अशोक कुमार पाल यांना ईडीनं अटक केली आहे. यामुळं मोठी खळबळ उडाली आहे. भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी रिलायन्स पॉवरच्या शेअरमध्ये १३ टक्के तेजी पाहायला मिळाली होती. नेमक्या त्याच दिवशी रात्री उशिरा रिलायन्स पॉवरचे अशोक कुमार पाल यांना ईडीनं अटक केली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवारी रात्री ईडीनं अशोक पाल यांना दिल्ली येथील त्यांच्या कार्यालयातून चौकशीनंतर अटक केली. शनिवारी (दि.११) ईडीच्या पथकाने अशोक पाल यांना दिल्लीच्या राउज एवेन्यू कोर्टात हजर केले. बनावट बँक तारणासंदर्भात अशोक पाल यांना अटक करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.

### भाजपच्या रॅलीत हुल्लडबाजी; सांगोल्यात शेकाप कार्यकर्त्यांकडून निषेध

# स्व.गणपतराव देशमुखांच्या घरावर हल्ला

**। सांगोला । प्रतिनिधी ।**

सोलापुरातील सांगोला तालुक्यात भाजपकडून रॅली काढण्यात आली होती. मात्र, यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी हुल्लडबाजी केल्याचे समोर आले आहे. स्व. गणपतराव देशमुख यांचे नातू सांगोल्याचे आमदार बाबासाहेब देशमुख यांच्या घरावर दारुच्या बाटल्या फेकण्यात आल्या. त्यामुळे संतापलेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि.११) या घटनेचा निषेध व्यक्त करीत रविवारी सांगोला बंदची हाक दिली. शेतकरी कामगार पक्षाकडून तहसीलदार संतोष कणसे व सांगोला पोलीस ठाण्याचे सपोनि. पोपट काशीद यांना निवेदन देण्यात आले व हल्लेखोरांवर त्वरित कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. शिवाय, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार रोहित पवार यांनीदेखील याबाबत संताप व्यक्त केला आहे.

आमदार रोहित पवार म्हणाले, सोलापूरच्या पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या भाजपच्या पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमाआधी झालेल्या रॅलीमध्ये भाजपच्या कार्यकर्त्यांनी सांगोल्यातील स्व.गणपतराव देशमुख (आबा) यांच्या घरावर दारूच्या बाटल्या फेकल्या. हे अत्यंत •➤पान २ वर



### मी २७ खेड्यांची जहागीरदार आहे - रतनबाई देशमुख

- कधी माझ्या दाराला कोणी हात लावला नाही. मी काय त्यांना भीत नाही. मी एक राजाची लेक आहे. मी २७ खेड्यांची जहागीरदार आहे. देशमुखाच्या कुटुंबाच्या नादी लागणं सोपं नव्हं. अनेकांचे प्रपंच धुळीला लागलेत. ही कृती करणाऱ्या व्यक्तीला कडक शासन व्हावं. कोणतं सरकार त्यांना सोडवते ते मी बघणारच आहे, असा इशाराही रतनबाई देशमुख यांनी दिला आहे.

### गद्दारांना धडा शिकवायलाच पाहिजे - जयंत पाटील

- सांगोल्यामध्ये स्वर्गीय गणपतराव देशमुख यांच्या घरावर भ्याड हल्ला करण्यात आला. काही पक्षाचे गद्दार आहेत, ज्यांना पक्षाने आर्थिकदृष्ट्या मोठे केले. गणपतरावांनी या गद्दारांना एक विचार देऊन सामाजिक संघटनांमध्ये आणून त्यांना सामाजिक स्थैर्य देण्याचे काम केले होते. गणपतराव देशमुखांच्या पत्नी रतन काकू एकट्या घरात असताना या गद्दारांनी हा भ्याड हल्ला केला. गणपतराव देशमुखांचे घर कष्टकऱ्यांचे प्रेरणास्थान आणि स्फूर्ती देणारे स्थान म्हणून महाराष्ट्रातील कष्टकरी कार्यकर्ता मानतो. त्याच निवासस्थानातून गणपतरावांनी •➤पान २ वर

### सत्तेचा माज आणि संस्कृतीचा अपमान; ओमराजेंनी सुनावलं

- महाराष्ट्राच्या राजकारणात प्रामाणिकपणा, तत्वनिष्ठता आणि आदर्श नेतृत्वाचं प्रतीक म्हणून ज्यांचं नाव घेतलं जातं, त्या स्व. गणपतराव आबा देशमुख यांच्या सांगोला येथील घरावर भाजपच्या रॅलीदरम्यान दारूच्या बाटल्या फेकण्यात आल्या. ही केवळ धक्कादायक नाही, तर महाराष्ट्राच्या संस्कृतीवर झालेली एक अमानुष चाप आहे. ही तीच भाजपा आहे का जी स्वतःला संस्कृतीरक्षक म्हणवते? पण त्यांच्या रॅलीतून बाहेर येतंय दारूची नशा, गुंडगिरीची भाषा आणि सत्तेचा उन्माद! पुढे बोलताना ओमराजे निंबाळकर म्हणाले, स्व. गणपतराव आबांसारख्या लोकनेत्यांच्या घरावर अशी घाणेरडी कृत्यं करून •➤पान २ वर



- स्वर्गीय गणपतराव देशमुख यांच्या घरावर समाजकंटकांनी भ्याड हल्ला केल्यानंतर कार्यकर्ते पेटून उठले होते. समाजकंटकांचा उपस्थित कार्यकर्त्यांनी निषेध करून घोषणाबाजी केली. यामुळे सांगोल्याचा परिसर दणाणून गेला होता. यावेळी आक्रमक झालेल्या कार्यकर्त्यांना शांत राहण्याचे आवाहन रतन देशमुख आणि आमदार बाबासाहेब देशमुख यांनी केले. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### समाजकंटकावर कारवाई करा- सुरेश खैरे

- सांगोल्यामध्ये भारतीय जनता पार्टीचा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी काहींनी त्यामध्ये प्रवेश केला. हा प्रवेश झाल्यानंतर काही उत्साही कार्यकर्त्यांनी रॅली काढली. हि रॅली शेकापचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय गणपतराव देशमुख यांच्या घरासमोर आली असताना काही समाजकंटकांनी स्वर्गीय आबांच्या घरावर दगडफेक आणि दारूच्या बाटल्या फेकण्याचे अत्यंत निंदनीय, लाजीरवाणे आणि खेदजनक कृत्य केले. •➤पान २ वर


### अतिवृष्टी नसलेल्या तालुक्यांनाही सरकारची मदत

## शेतकरी पॅकेजमधून निवडणूक लक्ष्य

**। रायगड । प्रतिनिधी ।**

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लक्षात घेता राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी मदत पॅकेजमध्ये जास्तीत जास्त तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे, अशा चर्चांना उधाण आले आहे. त्यातूनच पुराचा फटका बसला नाही, अशा काही तालुक्यांचाही समावेश करण्यात आला आहे. राज्यात जून ते सप्टेंबर दरम्यान अतिवृष्टी आणि पुरामुळे ३१ जिल्ह्यांतील २५३ तालुके बाधित झाल्याची घोषणा सरकारने केली असून या तालुक्यांतील बाधितांसाठी ३१,६२८ कोटींचे मदत पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यामधील सर्व तालुक्यांना शेतकरी मदत पॅकेजमध्ये स्थान मिळाले आहे.

### अधिकाधिक तालुक्यांचा समावेश



मदतीची रक्कम बाधितांच्या खात्यात तातडीने जमा करण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित तालुक्यांमध्ये दुष्काळासाठी लागू असलेल्या सर्व सवलती आणि उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. या तालुक्यांमध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीपिकांचे नुकसान, शेतजमीन खरडून जाणे; •➤पान २ वर

### पात्र लाभार्थ्यांची यादी सार्वजनिक

- या मदत पॅकेजअंतर्गत लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावा. तसेच या याद्या तालुका आणि गावातही प्रसिद्ध कराव्यात, असे आदेश देण्यात आले. त्यामुळे या मदत वाटपातील गोंधळ टळेल आणि पात्र लोकांनाच मदत मिळेल.

## तीन वाहनांची एकमेकांना धडक

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मार्गावर पहिला भीषण अपघात

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या मार्गावर शनिवारी (दि.११) दुपारी चार वाजण्याच्या आसपास झालेल्या पहिल्याच अपघाताने परिसरात खळबळ उडाली. नव्याने तयार झालेल्या या मार्गावर बेफाम वेगाने जाणाऱ्या तीन गाड्या एकमेकांना जोरदार धडक देत अपघातग्रस्त झाल्या. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र सर्व गाड्यांचे मोठे नुकसान झाले. पनवेल शहराकडून विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून वेगाने •➤पान २ वर

## रायगडातील शेतकऱ्यांसाठी खुशखबर

### धन धान्य योजनेला प्रारंभ; राज्यातील नऊ जिल्ह्यांची निवड, रायगडचा समावेश

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अर्थसंकल्पात घोषणा करण्यात आलेल्या पंतप्रधान धन धान्य कृषी योजनेची अंमलबजावणी शनिवारी (दि.११) देशातील शंभर जिल्ह्यात सुरू झाली आहे. महाराष्ट्रातील नऊ जिल्ह्यांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या एकत्रिकरणातून कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये रायगड जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांना •➤पान २ वर

### शेतकऱ्यांना मिळणार थेट लाभ

राज्यातील शेतकऱ्यांना या योजनेमुळे थेट लाभ मिळेल. शाश्वत शेती, पाणी बचत, आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून आपल्या शेतकऱ्यांचा आत्मविश्वास अधिक दृढ होईल. ही योजना म्हणजे शेतीला बळ आणि शेतकऱ्याला दिलासा आहे, असे म्हटले आहे. केंद्र आणि राज्य सरकारांच्या एकत्रित उपक्रमांतर्गत ११ विभागांच्या ३६ योजना एकत्रित राबवल्या जाणार आहे. ग्रामपंचायत स्तरावर तसेच कृषी विज्ञान केंद्रे, बाजार समित्या, किसान समृद्धी केंद्रे आणि सहकारी पतपुरवठा संस्था या सर्व स्तरांवर कार्यक्रमांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

## फ्लेमिंगो अधिवासावर घाला?

- फ्लेमिंगो संरक्षित क्षेत्रामुळे विमानांच्या उड्डाणांवर नकारात्मक परिणाम
- ३६00 कोटींच्या महसुलाचा फटका बसण्याची सिडकोची कबुली

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात झाले असले तरी त्याचा फटका फ्लेमिंगो पक्ष्यांच्या अधिवासाला बसणार आहे. विमानतळापासून ८ ते १० किलोमीटर अंतरावर असलेल्या आणि फ्लेमिंगो पक्ष्यांच्या अधिवासाचे मुख्य केंद्र ठरलेल्या डीपीएस आणि इतर पाणथळ क्षेत्रांना संरक्षित करू नये, अशा स्वरूपाचा सविस्तर प्रस्ताव सिडकोने राज्य सरकारला पाठविला आहे.

फ्लेमिंगो संरक्षित क्षेत्रामुळे विमानांच्या उड्डाणांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, अशी भीती सिडकोने व्यक्त केली. विमानतळाचे कारण पुढे करत असताना सिडकोने हा भूखंड फ्लेमिंगोंसाठी संरक्षित झाल्यास ३६०० कोटी रुपयांच्या महसुलास मुकावे लागेल, हे मात्र मान्य केले. नवी मुंबई महापालिकेने पाम बिच मार्गालगत मोक्याच्या ठिकाणी असलेल्या पाणथळींच्या जागा राज्य सरकारला सादर केलेल्या विकास आराखड्यात •➤पान २ वर

## पालक ठेवणार मुलांच्या सुरक्षेवर देखरेख



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुले शाळेत सुरक्षित आहेत की नाही, यावर पालकांना आता स्वत: देखरेख ठेवणे शक्य होणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाने त्याबाबतची माहिती उपलब्ध करणारे स्वतंत्र अधिकृत संकेतस्थळ सुरू केल्याची माहिती राज्य सरकारने उच्च न्यायालयात दिली.

त्यामुळे, मुलांच्या सर्वंकष सुरक्षेच्या दृष्टीने राज्य सरकारने बंधनकारक केलेल्या उपाययोजनांची शाळांकडून अंमलबजावणी केली जात आहे की नाही याची पडताळणी यापुढे पालकांना करता येणार आहे.

शालेय मुलांच्या सुरक्षेशी संबंधित उपाययोजनांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागाकडून केल्या जात असलेल्या प्रयत्नांबाबत न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने समाधान व्यक्त केले. तथापि, उपाययोजनांच्या पूर्ततेची माहिती टप्प्याटप्प्याने अधिक सविस्तरपणे अपलोड करावी. शाळा प्रशासनाकडे मुलांच्या सुरक्षेबाबत आलेल्या तक्रारी, त्या निवारण्यासाठी काय केले गेले किंवा जात आहे आणि तक्रारींचे निवारण झाले की नाही याचा तपशील देखील संकेतस्थळावर उपलब्ध करण्याचे आदेश न्यायालयाने सरकारला दिले. दर महिन्याला शाळांनी हा तपशील अद्ययावत करण्याबाबत •➤पान २ वर

### स्वतंत्र अधिकृत संकेतस्थळ सुरू

### उच्च न्यायालयात दिली माहिती



# एसटीच्या ई-बससाठी योजना
# प्रवाशांना मासिक, त्रैमासिक पास मिळणार



। मुंबई । प्रतिनिधी ।

एसटी महामंडळाने प्रवाशांच्या सोयीसाठी आणि ई-बस सेवेला अधिक प्रतिसाद मिळवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता राज्यातील ई-बस प्रवाशांना मासिक व त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध होणार आहे. याचा फायदा एसटीच्या प्रवासी वर्गाला होणार आहे.

या पास योजनांचा मुख्य उद्देश नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने दररोज एकाच मार्गावर प्रवास करणाऱ्या नियमित प्रवाशांना ई-बस सेवेकडे आकर्षित करणे हा आहे.

सध्या महामंडळाच्या ताफ्यात ई-बस प्रकल्पातील ४४८ बस आणि शिवाई प्रकल्पातील ५० ई-बस कार्यरत आहेत. भविष्यात या बसची संख्या आणखी वाढवण्याचा मानस आहे. अनेक प्रवाशांकडून ई-बससेवेत पास प्रणालीची मागणी केली जात होती.

या पार्श्वभूमीवर महामंडळाने प्रवाशांना अधिक सोयीस्कर आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारा प्रवास देण्यासाठी ही योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे

राज्यातील ई-बस प्रवाशांना मासिक व त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध होणार आहे. एसटी महामंडळाच्या या निर्णयामुळे दैनंदिन प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि आरामदायी प्रवासासाठी ई-बसचा वापर वाढण्यास मदत होईल, असा विश्वास परिवहन महामंडळाने व्यक्त केला आहे. ई-बस प्रवाशांना मासिक व त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध होणार आहे.

### योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि उपलब्धता

९ मीटर ई-बस, १२ मीटर ई-बस आणि ई-शिवाई सेवेमध्ये हे पास उपलब्ध असतील. (ई.शिवनेरी बससेवा वगळून)

मासिक पास (३० दिवस) : २० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ३० दिवसांसाठी पास दिला जाईल.

त्रैमासिक पास (९० दिवस) : ६० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ९० दिवसांचा पास उपलब्ध होईल.

सेवा वर्गातील लवचिकता - उच्च सेवा वर्गाचा पास (ई-बस) वापरून प्रवासी निमआराम किंवा साध्या बसमध्येही प्रवास करू शकतील.

फरक भाडे नियम - निमआराम किंवा साध्या बसच्या पासधारकांना ई-बसने प्रवास करायचा असल्यास, दोन्ही सेवांतील भाड्यातील फरक १०० टक्के दराने भरून तिकीट घेऊन प्रवास करता येईल.

## आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

। पनवेल । वार्ताहर।

श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट, श्री पुज्य सिंधी पंचायत ट्रस्ट पनवेल, विद्यार्थी वाहक संस्था पनवेल, पनवेल-नवी मुंबई प्रिंट आणि डिझिटल पत्रकार संघटना, आम्ही रक्तदाते पनवेलचे आणि पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने १२ ऑक्टोबर रोजी पनवेलमध्ये रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री पुज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर, डॉ.लिखीते हॉस्पिटल समोर, महात्मा गांधी पथ विश्राळी नाका पनवेल येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. यावेळी अवयदान या विषयावर सुद्धा मार्गदर्शन केले जाणार नाही.

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा



। रसायनी। प्रतिनिधी ।

कै.बाळाराम कोंडाजी लबडे यांच्या समरणार्थ गुरुवर्य महंत आनंद महाराज खंडागळे (चौक) आणि गुरुवर्य जगन्नाथ बाबा रत्नाकर (श्री क्षेत्र संगम)यांच्या कृपाशिर्वाने खालापूर, चौक, मोहोपाडा, रसायनी व पनवेल तालुक्यातील सातशे वारकऱ्यांच्या उपस्थितीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा श्री क्षेत्र गहिनीनाथ गड, चिंचोली, बीड येथे संपन्न झाला.

या सोहळ्याचे निटनेटके आयोजन खानातले गावचे माजी प्रभारी सरपंच मोहन लबडे आणि योगिता मोहन लबडे या दोघा उभयतांकडून करण्यात आले होते.

हे दांपत्य दरवर्षी राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांत ग्रंथराज पारायण सोहळ्याचे आयोजन करतात. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी पाच दिवस श्री सदगुरु माऊली सेवा मंडळ, चौक आणि संत तुकाराम महाराज वारकरी मंडळ बारवईपुल यांनी अथक परिश्रम घेतले.

पान १ वरून

## स्व. गणपतराव देशमुखांच्या घरावर हल्ला

दुर्दैवी आहे. या घटनेचा मी तीव्र शब्दात निषेध करतो. या घरात आबांच्या पत्नी व नातू विद्यमान आमदार बाबासाहेब देशमुख राहतात. सांगोल्याचे देशमुख कुटुंब हे राज्यातील एक आदर्श कुटुंब आहे. अशा भ्याड हल्ल्याने ते दबतील असे कोणाला वाटत असेल तर तो त्यांचा गैरसमज आहे. आम्ही सर्वजण याप्रसंगी देशमुख कुटुंबियाच्या सोबत आहोत.

### गद्दारांना धडा शिकवायलाच पाहिजे - जयंत पाटील

सांगोल्याच्या जनतेची ५५ वर्षे आमदारकीच्या माध्यमातून निरपेक्ष सेवा केली. विविध क्रांतिकारी निर्णय घेऊन कष्टकऱ्यांसाठी डाव्या विचारांचा आवाज उठवला. त्या कार्यकर्त्यांची गद्दारांनी केलेल्या भ्याड हल्ल्यामुळे निराशा झाली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आणि कष्टकरी समाज सांगोलेकरांच्या सोबत आहे. लवकरच सांगोल्यात गणपतरावांचे विचार जिवंत ठेवण्यासाठी त्यांचे विचार जनतेसमोर आणायचे आहेत. महाराष्ट्रातील डाव्या विचारांचा कार्यकर्ता देशमुख कुटुंबियांसोबत आहे. राज्याच्या विधानसभेत आणि सभागृहाबाहेर या घटनेसंदर्भात बाबासाहेब देशमुखांनी आवाज उठवायला हवा. ज्या गद्दारांनी हा निंदनीय प्रकार घडवून आणला आहे. त्याचा मी निषेध करतो. त्या गद्दारांना नष्ट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे.

### सत्तेचा माज आणि संस्कृतीचा अपमान; ओमराजेंनी सुनावलं

भाजपा कार्यकर्त्यांनी दाखवून दिलं आहे की, सत्ता जेव्हा अहंकाराच्या नशेत चढते, तेव्हा माणुसकीचं भान हरवतं. ज्यांच्या घराचं दार बंद असतानाही आदर्शाचा सुगंध दरवळतो, त्या देशमुख कुटुंबावर झालेला हा प्रकार महाराष्ट्राच्या राजकारणातील अधःपाताचं जिवंत उदाहरण आहे. महाराष्ट्र म्हणजे संयम, आदर आणि संस्कारांची भूमी. पण सध्याचं सरकार हेच संस्कार पायदळी तुडवत आहे. ना शिष्टाचार उरलेत, ना आदर्श. ही केवळ बाटली फेकण्याची घटना नाही, तर महाराष्ट्राच्या विचारसरणीवर फेकलेली घाण आहे. दारूच्या नशेत बुडालेली ही सत्ता लोकांच्या जागृतीसमोर फार काळ टिकणार नाही. कारण महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अपमान करणाऱ्यांना इतिहास कधीच माफ करत नाही.

### समाजकंटकावर कारवाई करा- सुरेश खैरे

महाराष्ट्राच्या विधिमंडळात सांगोल्याचे प्रतिनिधीत्व आबांनी गेली ५५ वर्षे केले. एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून आबांकडे महाराष्ट्राने पाहिलं आहे. अशा आदर्श व्यक्तिमत्वाच्या घरावर दगडफेकीचे कृत्य करणे म्हणजे हि गोष्ट महाराष्ट्राला लाजिरवाणी आहे. खरे म्हणजे त्यांचे विचार आणि त्यांचे तत्व आजही डाव्या विचारांच्या कार्यकर्त्याला प्रेरणा देत आहेत. अशा मौल्यवान विचारांची ठेवण देणाऱ्या आबांच्या घरावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा रायगड जिल्हा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने निषेध व्यक्त करतो. भ्याड हल्ला करणाऱ्या समाजकंटकांवर प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी.

## शेतकरी पॅकेजमधून निवडणूक लक्ष्य

विहिरींचे नुकसान, मनुष्य व पशुहानी, घरांची पडझड, मालमत्तेचे नुकसान झालेल्यांना मदत देण्याची घोषणा करण्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या मदतीशिवाय आता शेतजमिनीवरील गाळ काढण्यासाठी हेक्टरी १८ हजार रुपये देण्यात येणार असून दरड कोसळणे, जमीन खरडणे, खचणे आणि नदीपात्र, प्रवाह बदलल्यामुळे शेतजमीन वाहून जाणे यासाठी केवळ अत्यल्प भूधारक म्हणजे १ हेक्टरपेक्षा कमी जमीनधारक आणि अल्पभूधारक म्हणजेच एक ते दोन हेक्टरच्या दरम्यान जमीन असलेल्या शेतकऱ्यांनाच प्रतिहेक्टर ४७ हजार रुपये दिले जाणार आहेत.

तसेच मत्स्य व्यावसायिकांना बोटींची दुरुस्ती व जाळी यांसाठी मदत देण्यात येणार असून पूर्ण नष्ट झालेल्या बोटींसाठी १५ हजार, अशंत: दुरुस्तीसाठी ६ हजार, अंशत: बाधित जाळ्यांच्या दुरुस्तीसाठी तीन हजार, पूर्णत: नष्ट झालेल्या जाळ्यांसाठी ४ हजार रुपयांची मदत दिली जाणार आहे. या तालुक्यांमध्ये जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेती कर्जाच्या वसुलीस एक वर्षासाठी स्थगिती, परीक्षा शुल्कात माफी आणि इयत्ता १० वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी शुल्क माफी आदी सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

## रायगडातील शेतकऱ्यांसाठी खूशखबर

आत्मनिर्भर बनविण्यासाठी पंतप्रधान धन धान्य कृषी योजना सुरू करण्यात येत आहे. देशभरात कृषी उत्पादन मागास असलेल्या शंभर जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी होणार असून, राज्यातील पालघर, रायगड, धुळे, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या नऊ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आली आहे. प्रामुख्याने कमी उत्पादकता असलेले, कमी सिंचन क्षमता असलेले, कृषी कर्जाची उपलब्धतेबाबत समस्या असलेल्या जिल्ह्यांची निवड झाली आहे.

शेतीत सुधारणा, उत्पादन वाढ, पीक विविधीकरण आणि शाश्वत शेतीला चालना देणे हा योजनेचा उद्देश असून, पुढील सहा वर्षे योजना राबवली जाणार आहे. योजनेवर दरवर्षी २४,००० कोटींचा निधी खर्च केला जाणार आहे. महाराष्ट्रातील निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये धान्य साठवण, प्रक्रिया, सिंचन सुधारणा, तसेच स्थानिक पातळीवरील रोजगार निर्मिती यावर भर दिला जाणार आहे.

## तीन वाहनांची एकमेकांना धडक

जाणाऱ्या एका कारने समोरून येणाऱ्या टेम्पोला जोरदार धडक दिली. धडकेचा आवाज एवढा मोठा होता की, आसपासच्या नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्या क्षणी मागून येणारी आणखी एक कार या अपघातग्रस्त वाहनांना येऊन धडकली आणि त्यामुळे तिन्ही वाहने एकमेकांवर आदळली. अपघात एवढा विचित्र आणि भीषण होता की, यामध्ये छोटा टेम्पो रस्त्यातच पलटी झाला. त्यामुळे काही वेळ रस्ता पूर्णतः बंद झाला होता. स्थानिक रहिवाशांनी व वाहनचालकांनी तात्काळ बचावकार्य सुरू करून जखमी टेम्पोचालकाला बाहेर काढले.

त्याला किरकोळ दुखापत झाली असून उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. सध्या या अपघाताची नोंद संबंधित पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अपघाताचे कारण तपासले जात आहे.

नव्याने उभारल्या जाणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मार्गावर हा पहिलाच अपघात असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्य, वाहनांची वाहतूक सुरू असते. त्यामुळे वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

या घटनेमुळे विमानतळ मार्गावरील सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनाही सजग राहावे लागणार आहे. सुरुवातीच्या तपासानुसार, वेग आणि बेफिकिरी हे या अपघातामागचे मुख्य कारण असल्याचे प्राथमिक निष्कर्ष समोर येत आहेत.

## फ्लेमिंगो अधिवासावर घाला?

निवासी आणि व्यावसायिक संकुलांसाठी खुल्या करण्याचा धक्कादायक निर्णय घेतला होता. महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यात या जागा पाणथळ असल्याचे नमूद करण्यात आले होते. सिडकोने घेतलेल्या हरकतीनंतर महापालिका एक पाऊल मागे गेली. पाम बिच मार्गावरील डीपीएस शाळेलगत असलेला सेक्टर ५२ चा परिसर फ्लेमिंगो पक्ष्यांचे अधिवासाचे मुख्य केंद्र मानले जाते.

या परिसरातील भूखंड सिडकोला विकायचा असल्याचे यापूर्वीच स्पष्ट झाले आहे. सिडकोच्या या निर्णयाला याच भागातील काही रहिवासी संस्थांनी न्यायालयात आव्हान दिले. डीपीएस तलाव परिसर पाणथळ नसल्याची भूमिका सिडकोने घेतली होती. राज्याच्या कांदळवन विभागाने या संपूर्ण पट्ट्याचे सर्वेक्षण केले. राज्य सरकारने यासंबंधी नेमलेल्या समितीनेही आपला अहवाल सादर केला. त्यानंतर डीपीएस तलावाचा परिसर फ्लेमिंगोंसाठी संरक्षित करण्याची प्रक्रिया आता राज्य सरकारच्या स्तरावर सुरू झाली आहे. मात्र सिडकोने नवी मुंबई विमानतळाचे निमित्त पुढे करत या प्रक्रियेला हरकत घेतली आहे. दरम्यान, याबाबत सिडकोच्या अधिकाऱ्यांशी वारंवार संपर्क साधूनही प्रतिक्रिया उपलब्ध होऊ शकली नाही.

पाम बिच मार्गावरील जे क्षेत्र राज्य सरकारने फ्लेमिंगो पक्ष्यांसाठी संरक्षित करण्याचा निर्णय घेतला आहे त्यावर विकासाची मोठी संधी असल्याचे सिडकोचे म्हणणे आहे. हे क्षेत्र फ्लेमिंगो पक्ष्यांसाठी आरक्षित केल्यास सध्याच्या बाजारभावानुसार (अंदाजे ३०० कोटी रुपये प्रति हेक्टर) सिडकोला सुमारे ३६०० कोटी रुपयांचा महसूल तोटा होईल, अशा स्वरूपाचे पत्र नगरविकास विभागाला पाठविण्यात आले आहे. डीपीएस स्कूल, सेक्टर-५२, नेरुळ नोडमधील अंदाजे १२ हेक्टर क्षेत्रफळाचे क्षेत्र फ्लेमिंगो संरक्षण राखीव क्षेत्र म्हणून घोषित केले जात आहे. मंजूर विकास योजनेनुसार १२ हेक्टर क्षेत्रफळाचा मोकळा भूखंड निवासी क्षेत्रात असाही सिडकोचा दावा आहे. नेरुळ नोडल आराखड्यात भविष्यातील विकासासाठी राखीव क्षेत्र म्हणून चिन्हांकित आहे. हा भूखंड सीआयडीसीओच्या ताब्यात आहे.

२०१० साली सिडकोने डीपीएस शाळेलगत या जागेचा विकास सुरू केला होता. मात्र पर्यावरणप्रेमी रहिवासी तसेच आसपासच्या वसाहतींमधील संस्थांनी त्या विकासास आक्षेप घेऊन मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतिम आदेशानुसार डीपीएस व टी.एस. चाणक्य या दोन्ही तलावांचे संरक्षण व संवर्धन करणे ही सिडकोची जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. या आदेशाविरोधात सिडकोने सर्वोच्च न्यायालयात विशेष परवानगी याचिका दाखल केली आहे. या याचिकेवरील निर्णय प्रलंबित आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कंपनीने फ्लेमिंगोमुळे विमान वाहतुकीस धोका होऊ शकतो, असे पत्र सिडकोस दिले. या पत्राचा आधार घेत सिडकोने राज्य सरकारकडे आता डीपीएस तलावावर भूखंड विक्रीसाठी प्रयत्न सुरू केले आहेत. सिडकोने नगरविकास विभागामार्फत वन विभागाला पत्र देऊन डीपीएस स्कूलजवळील क्षेत्रास पक्षी अभयारण्य किंवा फ्लेमिंगो संरक्षण राखीव क्षेत्र घोषित करू नये, अशी विनंती केली. फ्लेमिंगोमुळे विमान उड्डाणांवर परिणाम होईलच, शिवाय येथे उभे राहत असलेला आमदार, खासदारांसाठीचा गृह प्रकल्प, प्रस्तावित सीएसएमआयएएनएमआयए मेट्रो मार्ग, ठाणे उन्नत मार्ग, गोल्फ कोर्स प्रकल्प, खारघरनेरुळ सागरी मार्गही बारगळू शकतो, अशी भीती व्यक्त केली.

## पालक ठेवणार मुलांच्या सुरक्षेवर देखरेख

आणि शाळांना अचानक भेट देऊन उपाययोजनांची अंमलबजावणी होत आहे की नाही याची पडताळणी करण्याचे आदेश देखील न्यायालयने दिले. तसेच, याच कारणास्तव याचिका कायम ठेवत असल्याचेही स्पष्ट केले.

तत्पूर्वी, आतापर्यंत एकूण ९२ हजार ५२९ शाळांनी उपाययोजनांच्या पूर्ततेचे तपशील नोंद करण्यास सुरूवात केली असून ८८ हजार २५६ शाळांनी याबाबतचा पूर्ण तपशील संकेतस्थळावर अपलोड केला आहे.

उर्वरित शाळा येत्या १५ ऑक्टोबरपर्यंत हा तपशील अपलोड करतील, अशी माहितीही अतिरिक्त सरकारी वकील प्राजक्ता शिंदे यांनी खंडपीठाला दिली. हे संकेतस्थळ ५ ऑक्टोबर रोजी कार्यान्वित झाले असून त्यात शाळेचे नाव प्रविष्ट करून कोणीही त्यावर प्रवेश करू शकते. तसेच, दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत सर्व माहिती अद्ययावत करण्याचे आदेश शाळांना देण्यात आले आहेत, असे शिंदे यांनी न्यायालयाला सांगितले.

उपाययोजनांची पूर्तता करणाऱ्या शाळांच्या आकडेवारीवर न्यायालयाने यावेळी प्रश्न उपस्थित केला. शाळांनी दिलेल्या माहितीनुसार, काहींनी पालकांसाठी कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. तथापि, त्या कधी झाल्या याची पालकांना माहितीच नाही. ही माहिती पालकांना दिली गेली नाही, तर उपाययोजना निरर्थक ठरतील, अशी टिप्पणी न्यायालयाने केली. त्यामुळे, शाळांना विशिष्ट तारखेनुसार तपशील उपलब्ध करावा लागेल, असे न्यायालयाने म्हटले.

शाळांनी पालकांना माहिती देण्यासाठी विशेष अधिकारी नियुक्त करावा आणि उपाययोजनांची पूर्तता पडताळण्यासाठी अचानक तपासणी करावी, अशी सूचनाही न्यायालयाने केली. या प्रकरणी न्यायमित्र म्हणून काम पाहणाऱ्या वकील रेबेका गोन्साल्विस यांनी संकेतस्थळ आणि त्यावरील माहिती मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांत उपलब्ध करावी, असे सूचवले.

सद्यस्थितीला संकेतस्थळावर केवळ इंग्रजीमध्येच माहिती उपलब्ध केली गेली आहे. तथापि, अनेक पालकांना इंग्रजी ज्ञात नाही. त्यामुळे संकेतस्थळावरील माहिती मराठी भाषेतही उपलब्ध करण्याचे गोन्साल्विस यांनी म्हटले, न्यायालयाने त्याची दखल घेऊन संकेतस्थळावर दोन्ही भाषांत माहिती उपलब्ध केली जाईल याची खात्री करण्याचे आदेश दिले.

# भिशीच्या नावावर महिलेकडून कोट्यवधींची फसवणूक

- ४० तक्रारदारांनी घेतली पोलीस ठाण्यात धाव
- रसायनी पोलिसात फसवणुकीचा गुन्हा

। खालापूर । प्रतिनिधी ।

मोहापाडा येथील एका महिलेने भीशी चालविण्याच्या नावावर खातेदारांना कोट्यवधींचा गंडा घातल्याची घटना घडली आहे.

महिन्याला पाच टक्के व्याजदराने म्हणजे वार्षिक ६० टक्के व्याज दराने परतावा देण्याची स्कीम सांगून हजारो लोकांचे कोट्यवधी रुपये घेऊन ते हडप केले. अशाप्रकारच्या दोन स्कीम चालवून अनेक खातेदारांचे कोट्यवधी रुपयांची हेराफेरी करून या महिलेने फसवणूक केली असल्याच्या तक्रारी पोलिसाना प्राप्त झाल्या आहेत. फसवणूक झालेल्यांमध्ये बहुतांशी महिला खातेदार आहेत. या महिला पैसे मागण्यासाठी गेल्या असता महिलेने ते मान्य केले की आमच्याकडे १०० खातेदारांचे अंदाजे १.५ कोटी रुपये देणे आहे, त्याची नोंद माझ्या डायरीमध्ये करून ठेवली आहे. माझे घर विकून मी पैसे परत करेन. पण ते कधी विकणार याची खात्री दिली नाही. खातेदारांना दिलेले पोस्ट डेटेड चेक हे खात्यात पैसे नसल्याने बाऊन्स झाले आहेत. अनेक महिने वाट पाहून शेवटी कोणताही पर्याय नसल्यामुळे समारे चाळीस खातेदारांनी खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहूल व वरिष्ठ पोलीस निरीक्षक बांगर यांच्याकडे तक्रार केली आहे. पोलीस त्याचा कसून तपास करीत आहेत. तपासामध्ये महिलेने एक कोटी ६८ लाख रुपये देणे लागत असल्याचे स्वतः मान्य केले आहे. पैसे परत देत नसल्याने कोणताही पर्याय नसल्यामुळे एकूण चाळीस तक्रारदारांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार केली. खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहूल यांना प्रकरण गंभीर असल्याचे लक्षात आल्याने त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रसायनी संजय बांगर यांना खोलवर तपास करून पुरावे तपासण्यास सांगितले. महिला पैसे देण्यास तयार आहे का? हे विचारण्यास सांगितले. परंतु महिला पैसे परत देण्यास तयार नसल्याचे निष्पन्न झाले.

तक्रारदारांची संख्या वाढत जाईल आणि फसवणूक झालेली रक्कम देखील मोठ्या प्रमाणात वाढेल. महिलेने या पैशातून अनेक मालमत्ता विकत घेतल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. ते तपासामध्ये उघड होईल. तिने हे पैसे वापरून मोहोपाडा इथे मोठी बिल्डिंग बांधून त्यात ती कुटुंबासह वास्तव्यास आहे. वर्षातून दोन तीन वेळा फॉरेन ट्रिपला आपल्या कुटुंबासह जात होत्या. नवरा साधा ग्रामपंचायत कर्मचारी असूनदेखील एवढी मालमत्ता कुठून जमवली? हा प्रश्न सर्वांना पडला आहे. एका खातेदाराकडून पन्नास हजार रुपयांचे अनेक बंडल घेतानाचे व्हिडिओ व्हायरल होत आहे.

## डॉक्टरकडून रुग्णावर अतिप्रसंगाचा प्रयत्न

**नवी मुंबई** : एका खासगी रुग्णालयामधील उपचारासाठी दाखल २८ वर्षीय तरुणीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या प्रकरणाता रबाळे पोलिसांनी डॉक्टरविरोधात गुन्हा दाखल केला आहे. २ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास डॉक्टरने तपासणीसाठी वॉर्डमध्ये जाऊन पीडित तरुणीची तपासणी केली. त्यानंतर तिला गप्पा मारण्यासाठी केबिनमध्ये बोलावून घेतले. पीडित तरुणी पहाटे ३.३० वाजता डॉक्टरच्या केबिनमध्ये गेल्यानंतर, डॉक्टरने वैयक्तिक समस्यांची चर्चा करताना तिच्यासोबत शारीरिक जवळीक केली.

## कर्नाळा घाटात दुचाकी घसरली

- होमगार्ड राजेंद्र पाटील यांचा मृत्यू
- पत्नी जखमी

। पनवेल । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा पक्षी अभयारण्य खिंडीत शुक्रवारी सकाळी झालेल्या अपघातात होमगार्ड राजेंद्र पाटील (५०, रा. पेझारी, ता. अलिबाग) यांचा मृत्यू झाला. तर या अपघातात त्यांच्या पत्नी दिपाली पाटील (४३) या गंभीर जखमी झाल्या आहेत.

राजेंद्र पाटील पोयनाडहून पनवेलकडे खरेदीसाठी येत होते. सकाळी ११.३० वाजता कर्नाळा घाटातील उतारावर रस्त्यावरील खडीमुळे त्यांची दुचाकी घसरली होती. यावेळी राजेंद्र पाटील दुभाजकावर आपटल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर त्यांची पत्नी गंभीर जखमी आहे. प्राथमिक चौकशीत दुचाकीचा वेग अधिक असल्याने अपघात झाल्याने नमूद आहे. या प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी राजेंद्र पाटील यांच्याच विरोधात अपघाताचा गुन्हा नोंदविला आहे. मात्र, स्थानिकांच्या मते रस्त्याची दुरवस्था अपघाताचे मुख्य कारण आहे. स्थानिकांमध्ये रोष या अपघातानंतर शनिवारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने रस्त्यावरील खडी साफ करण्याचे काम हाती घेतले आहे. पण बळी गेल्यावरच प्राधिकरणाला जाग आली, अशी प्रतिक्रिया स्थानिकांमधून व्यक्त होत आहे.

## शैला तुरे यांचा समाजरत्न पुरस्कार

सुकेळी । वार्ताहर ।

आदर्श रायगड वृत्तपत्र आणि वृत्तवाहिनीच्या चतुर्थ वर्धापनदिनानिमित्त सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, पत्रकारीता, साहीत्य अशा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळा अंबरनाथ येथे संपन्न होणार आहे.

या पुरस्कार सोहळ्यामध्ये पेण तालुक्यातील खारपाले येथील समाजसेविका शैला तुरे यांच्या सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल व त्यांचे अनमोल कार्य पाहून आदर्श रायगड वृत्तपत्र आणि वृत्तवाहिनीने शैला तुरे यांना समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

# ‘ब्रेस्ट कॅन्सर जागरूकता महिना’ विशेष अभियान



(छायाचित्र : संजय गायकवाड)

। कर्जत। प्रतिनिधी ।

रायगड मेडिकल असोसिएशनतर्फे ऑक्टोबर महिना ब्रेस्ट कॅन्सर जागरूकता महिना म्हणून साजरा करण्यात येणार आहे, झोनल वैद्यकीय अधिवेशन व मोफत तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी यांनी सांगितलं की श्रीवर्धन हे माझे पूर्वजांचे गाव असल्याने या उपक्रमाची सुरुवात आपल्या भागातून करावी असे मला वाटले. म्हसळा व श्रीवर्धनसारख्या ग्रामीण भागातील लोकांना फायदा व्हावा ह्या दृष्टीने हे शिबीर आयोजित करण्याचा निर्णय घेतला आणि मुंबई ऑकोलॉजी सेंटरने यात मोठे सहकार्य केले. त्याबद्दल आभार व्यक्त केले. रायगड मेडिकल असोसिएशन तर्फे ऑक्टोबर ब्रेस्ट कॅन्सर अवेअरनेस मंथ निमित्ताने सलग झोनल अधिवेशन कार्यक्रम व मोफत स्तन कर्करोग तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. हे पाचवे झोनल अधिवेशन हॉटेल मेरिटास सीविंड, श्रीवर्धन येथे रायगड मेडिकल असोसिएशन आणि श्रीवर्धनम्हसळा तालुका आणि एम्ओसी पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले. यावेळी डॉ. प्रशांत गांगल (सचिव) यांनी सर्वांचे आभार मानले.डॉ. कुमार ओसवाल (खजिनदार), डॉ. दिलीप सावळे, डॉ. आदित्य जंगम, डॉ. निलेश म्हात्रे व डॉ. संजीव पाटील यांवेळी उपस्थित होते.

या वैद्यकीय अधिवेशनामध्ये बेसिक्स ऑफ ब्रेस्ट कॅन्सर, केस बेस्ड प्रेजेंटेशन देण्यात आले. याचे संयोजन डॉ. देवेंद्र पाल यांनी केले तर पॅनेलमध्ये डॉ. राजीउद्दीन ख्वाजा, डॉ. सौरभ फडके, डॉ. संजय साबणे, डॉ. सुभाष काटकदौंड आणि डॉ. श्रीकांत पाटील सहभागी झाले. रायगड मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. नीलकंठ फडके, डॉ. डोंगरे, डॉ. पद्माकर मते, रायकॉनचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. गजानन चव्हाण, डॉ. शैलेश ठाकूर, डॉ. वानखेडे, डॉ. संजय कुरुंगले, डॉ. प्रतिभा महिंद्रीकर, डॉ. मनीष परमार, डॉ. रितेश जैन आदी मान्यवर उपस्थित होते.

# उरण तालुक्यात धुळीचे साम्राज्य

### श्वसनाचे आजार वाढण्याची भीती

। उरण । प्रतिनिधी ।

पावसाचा जोर कमी झाल्यानंतर उरण तालुक्यातील प्रमुख रस्त्यांवर चिखलाऐवजी आता धुळीचे साम्राज्य पसरले आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर उरण शहर आणि परिसरातील रस्त्यांवरून उसळणाऱ्या धुळीच्या लोटांमुळे नागरिक, वाहनचालक आणि प्रवासी अक्षरशः हैराण झाले आहेत. निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांवरील तात्पुरत्या दुरुस्तीच्या कामांमुळे ही परिस्थिती अधिकच गंभीर बनली असून, नागरिकांच्या आरोग्यावर याचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत.

यंदा उरण तालुक्यात मागील चार महिन्यांत मोठ्या प्रमाणात पर्जनवृष्टी झाली. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातील रस्त्यांची अशरक्षः चाळण झाली. त्यामुळे सिडको, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून रस्त्यांवरील खड्डे बुजवण्यासाठी माती आणि ग्रीट वापरले गेले. मात्र या मातीचे थर उन्हात कोरडे पडल्याने अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे ती धूळ हवेत उडत आहे. त्यामुळे रस्त्यावर सतत धुळीचे ढग निर्माण होत आहेत.

मोटारसायकलस्वारांना रस्ता नीट दिसत नसल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. खड्डे बुजवण्यासाठी मातीमिश्रित ग्रीट वापरली गेल्याने आता ऊन पडल्यावर ही माती हवेत उडत असून, मोटारसायकल चालवणे धोकादायक झाले आहे, असे स्थानिक प्रवासी सनी पाटील यांनी सांगितले. कोप्रोली खोपटा, दिघोडे चिर्ले इत्यादी मार्गांवर धुळीची समस्या अधिक तीव्र आहे. सिडको आणि पीडब्ल्यूडीच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यांची अवस्था बिकट झाली असून, सर्वसामान्यांना श्वसनाचे आजार, खोकला, ॲलर्जी यांसारख्या तक्रारी वाढताना दिसत आहेत. याकडे संबंधित विभागांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता नरेश पवार यांनी सांगितले, की दिघोडे मार्गाचे काम सुरू आहे. तसेच कोप्रोलीखोपटा मार्गासाठी वाहतुकीची परवानगी मिळताच काम सुरू होईल. या कामानंतर धुळीची समस्या कमी होईल. नागरिकांनी तातडीने रस्त्यांची योग्य देखभाल करून धुळीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## निवडक

### मुरुड किनाऱ्यावर शुकशुकाट



**मुरुड** : राज्यात सुरु असलेल्या शालेय परीक्षा, अधूनमधून अचानक हवामानात होणारे बदल, पडलेले कडक उन याचा परिणाम म्हणून पर्यटकांचा मुरुड बीचवर शुकशुकाट जाणवत आहे. तुरळक प्रमाणात पर्यटक येत आहेत. पावसाळ्यानंतर प्रसिद्ध जंजिरा किल्ला नुकताच खुला झाल्यानंतर पहिल्या शनिवारी शुकशुकाट दिसून आला. त्यामुळे बिचवर असणारे पर्यटक व्यवसाय ठप्प झाली आहेत. घोडागाडी व्यावसायीक, सँड बाइक, स्पिड बोट तसेच खाद्यपदार्थ स्टॉलधारक पर्यटकांच्या प्रतिक्षेत बसलेले दिसत आहेत.

### ट्रेलरमधून डिझेलची चोरी

**पनवेल** : पनवेल तालुक्यातील शिरढोण परिसरात रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या २ ट्रेलरमधून सुमारे ६५० लिटर डिझेलची अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वडखळ ते वाडा प्रवास करत असताना झोप आल्याने ट्रेलर चालक दिलीप कुमार याने आपला ताब्यातील ट्रेलर रस्त्याच्या कडेला गाडी लावुन गाडीमध्ये आराम करत असताना अज्ञात चोरट्याने त्या ट्रेलरमधील ४५० लिटर तसेच बाजूला उभ्या असलेल्या आणखी एका ट्रेलरमधून २०० लिटर डिझेल चोरून नेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल परिसरात असलेल्या अनेक ढाबे व हॉटेल परिसरात उभ्या करून ठेवलेल्या वाहनांमधून डिझेल व पेट्रोल चोरीचे प्रमाण वाढत असल्याने याबाबत पोलिसांनी कारवाई करावी अशी मागणी वाहनचालकांसह ढाबे-चालक करत आहे.

### उपचार सुरू असलेला आरोपी फरार

**पनवेल** : पनवेल शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असलेला आरोपी पळून गेल्याची घटना घडली. या प्रकरणी तळोजा पोलीस अधिक तपास करत आहेत. खुटारी येथील राजकुमार म्हात्रे याच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. त्यानंतर त्याच्यावर पनवेल मधील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. अनिकेत म्हात्रे आणि राजकुमार म्हात्रे यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना आरोपी राजकुमार म्हात्रे रुग्णालयातून पळून गेला. तळोजा पोलीस रुग्णालयातून आरोपीला ताब्यात घेणार होते, मात्र त्यापूर्वीच आरोपीने पलायन केले. याप्रकरणी तळोजा पोलीस त्याचा शोध घेत आहेत

### दैनिक बाजार बांधकामाकरिता भूखंड उपलब्ध

**पनवेल** : पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिति अ (खारघर), ब (कळंबोली), क (कामोठे), ड (पनवेल) मधील विविध भूखंडांवर दैनिक बाजार बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सिडको प्राधिकरणाकडून दैनिक बाजार बांधकामाकरिता भूखंड उपलब्ध झाले आहे. बऱ्याच काळापासून या भूखंडांवर तात्पुरत्या बांधकामासह बाजारपेठा सुरु आहेत. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार, या ठिकाणी नव्याने कायमस्वरूपी बांधकाम करून दैनिक बाजार बांधण्याचे प्रस्तावित आहे. ज्यामुळे नागरिकांना बाजारांची चांगली सहजपणे व सोयिस्कर सुविधा उपलब्ध होणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील खारघर प्रभाग अ मध्ये सेक्टर ३,४,६,११,१२,१५ व २० मधील एकूण १७ ठिकाणी गरजेनुसार विविध ओटे संख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहे. दैनिक बाजारांसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आधिक मंजुरी देखील मिळाली आहे. काहीं दिवसांमध्ये काम पूर्ण होऊन नागरिकांच्या सेवेत प्रशस्त, रेखीव असे दैनिक बाजार उपलब्ध होणार आहेत. कळंबोली प्रभाग मध्य सेक्टर २, २६, ५, ६, १०, १२, १४, १५ मध्ये १६ ठिकाणी गरजेनुसार ओटेसंख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहे. या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळाली आहे. पनवेलमध्ये फेरीवाल्यांची गणना झाली आहे. मात्र अनेक फेरीवाल्यांकडे हक्काचा निवारा नसल्याने रस्त्यावर व्यवसाय करावा लागतो. बाजारपेठांद्वारे त्यांना जागा उपलब्ध होणार आहेत.

### पेणमध्ये पुरग्रस्तांना मदत

**पेण** : श्री गणपती देवस्थान व श्रीकृष्ण जन्माष्टमी व श्रीगणेशोत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रात आसमानी संकटाने बळीराजाचे नुकसान व बळीराजाला आवश्यक असलेली मदत करणे ही आपली जबाबदारी समजून पेण येथील या दोन मंडळाने अकरा-अकरा हजार अशी बावीस हजाराची मदत महाराष्ट्र मुख्यमंत्री सहायता निधीला केली आहे. याविषयी बोलताना श्री गणपती देवस्थानचे अध्यक्ष प्रसाद आघारकर यांनी सांगितले की, मराठ वाडयासह पश्चिम महाराष्ट्रात ढगफुटी सादृश्य पावसामुळे सर्वांत जास्त नुकसान बळीराजाचे झाले आहे. या बळीराजाचे सर्वच नुकसान आमच्यासारखी छोटी मोठी मंडळ पूर्ण करु शकत नाही. परंतू, रामसेतू बांधताना जो खारीने वाटा उचलला तोच खारीचा वाटा आम्ही फुल ना फुलाची पाकळी देऊन मदत करत आहोत जर बळीराजा जगला तर आपण सर्वजण जगू या भावनेखातीरच आमचे सहकारी, समीर साने, प्रसन्न मोडक, दिलीप बापट, प्रशांत ओक, आनंद बिवलकर, शेखर साठे आदी एकत्र येउन हा आम्ही निर्णय घेतला आणि १ ऑक्टोंबरलाच मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये अकरा-अकरा हजाराच्या दोन एनएफटी केल्या आहेत. आमच्या प्रमाणे इतरांनाही बळीराजा मदत करावी हीच अपेक्षा.

### पालिका करणार झाडांचे पुनर्रोपण

**पनवेल** : कळंबोली सर्कल परिसरात उड्डाणपूल आणि सर्विस रोड चांयाकामाच्या कामात अडथळा ठरणाऱ्या तब्बल ६९० झाडांचे पुनर्रोपण पनवेल महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे विकासकामास गती मिळणार असून, पर्यावरणाचे संतुलन अचापित राहील, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मात्र, या झाडांची तोड होणार असल्याच्या चर्चेमुळे पर्यावरणप्रेमी नागरिकांत संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पर्यावरणप्रेमी अरविंद म्हात्रे यांनी महापालिकेवर झाडे तोडण्याचा आरोप करत, कर झाडांना हात लावला गेला, तर न्यायालयात दाद मागू असा इशारा दिला आहे. पनवेल महापालिकेच्या हरीतील कळंबोली सर्कल से खारघर, कल्याण-शिळफाटा आणि जे.एन.पी.टी. रोड या मार्गावर सर्विस रोड व उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. या कामात अडथळा ठरणाऱ्या झाडांना लोड न करता अन्यत्र ठिकाणी पुनर्रोपण करण्यात येणार आहे.

# परतीच्या पावसाची दहशत

- हाता तोंडाशी आलेला घास हिसकावण्याची भीती
- शेवटच्या क्षणाला भातशेतीचे नुकसान

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

**गेले अनेक दिवस परतीचा पाऊस शेतकऱ्यांच्या मुळावर उठल्यामुळे तालुक्यातील भात शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. भाताच्या लोंब्यामध्ये दाणा तयार झाला असून त्यातच सायंकाळी पडणारा मुसळधार पाऊस आणि सुटलेला सोसाट्याचा वारा यामुळे उभी भातशेती आडवी पडत आहे. काही ठिकाणी भातपीके कापणी योग्य झाली आहेत. मात्र, परतीचा पाऊस सायंकाळी येत असल्यामुळे भात कापणी केली तर हातामध्ये हवे तेवढे धान्य मिळणार नाही, अशी भीती शेतकरी वर्ग व्यक्त करीत आहेत.**



**शेतकऱ्यामध्ये चिंतेचे वातावरण**

**परतीच्या पावसाने मागील काही दिवसांपासून धुमाकूळ घातल्याने ऐन भरात आलेले भाताचे पीक पडले असून त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. काही पिकांना या पावसाने संजीवनी दिली आहे. उशिरा तयार होणारे भातपीक यामुळे वाचले आहे. त्यामुळे काही शेतकऱ्यांमध्ये आनंद व्यक्त करण्यात येत आहे. तर काही शेतकऱ्यामध्ये चिंतेचे वातावरण आहे.**

मागील आठवड्यापासून हस्त नक्षत्रांचा पाऊस शेतकरी वर्गास मारक ठरत आहे. दरवर्षी भात लागवड करायची आणी शेवटच्या क्षणाला होणाऱ्या भातशेतीच्या नुकसानामुळे मातीत टाकलेला पैसा धान्याच्या माध्यमातून मिळत नसल्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहे. सध्या भात शेती कापण्यायोग्य झाली असूनही परतीच्या पावसामुळे होणारे भातशेतीचे नुकसान नुसते पाहण्याच्या पलीकडे दुसरा पर्याय नसल्यामुळे शेतकरी हवालदील झाला आहे. सायंकाळी पडणाऱ्या पावसामुळे भातपिकं आडवी पडत असून त्याचबरोबर शेतामध्ये पाणी जमा होत असल्यामुळे भातशेती कुजण्याची भीती आहे.

यामुळे तालुक्यातील असलेली भातशेती अनेक ठिकाणी ओस पडत चालली आहे. याचे कारण म्हणजे मातीत टाकलेला पैसा वसूल होत नाही. शिवाय हातामध्ये हवे तेवढे धान्य मिळत नाही. तसेच, परतीच्या पावसाच्या अस्मानी संकटाचा दरवर्षी शेतकरी वर्गास सामना करावा लागत असल्यामुळे भातशेतीचे प्रमाण कमी होत आहे. मात्र, असे असले तरी सुद्धा तालुक्यात गेल्या काही वर्षात तुरळक स्वरूपात भात लागवड करण्यास वाढ झाली आहे.

शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास परतीच्या पावसाने हिसकावून नेला, शेतकऱ्यांनी शेतामध्ये कापलेले भात पूर्णपणे या पावसामुळे भिजुन जात आहे, तर कापणीसाठी आलेले भात शेतातच पावसामुळे आडवे झाले आहे.

चार महिने भाताची शेती केली जाते भात शेतात पिकून तयार आहे, तर काही शेतकऱ्यांनी हळवे भात शेतात कापून ठेवलं. मात्र मागील आठवड्यापासून पाऊस सुरू आहे. या पावसाने शेतात पाणी साचले व कापलेले भात या पाण्यात बुडाल्याने ते कुजण्याची शक्यता आहे. मात्र, परतीच्या पावसाची दहशत आजही बळीराजाला चिंताग्रस्त करून ठेवले आहे.

## रसायनीत पाणीपुरवठा बंद

**| रसायनी | प्रतिनिधी |**

मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळ महानगर गॅस पाइपलाईनचे काम सुरु असताना एमआयडीसी जलशुध्दीकरण केंद्राची पाईप लाईन फुटल्याने गेल्या सहा दिवस हजारो लिटर पाणी रस्त्यावरुन वाया जात होते. ही परिस्थिती पाहता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी दोन दिवसांत या पाईपलाईंनचे काम न झाल्यास पत्रकार आंदोलन करतील असा इशारा देताच प्रशासन जागे झाले. दुसऱ्याच दिवशी एमआयडीसीकडून पाईपलाईंनचे काम करुन पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला. परंतु पाण्याचा दबाव वाढत असताना तासाभरात जलशुध्दीकरण केंद्राजवळ पाईपलाइन फुटली. यावेळी रसायनी व आसपासच्या परिसरातील पाणीपुरवठा पुन्हा बंद झाला. रसायनीकरांचा तब्बल पन्नास तास पाणीपुरवठा बंद होता.



याबाबत ग्रामस्थांनी स्थानिक ग्रामपंचायत सदस्या रसिका खराडे व राकेश खराडे यांना दूरध्वनीवरून विनंती करुन पाण्यासाठी प्रयत्न करण्यास सांगितले. यावेळी ग्रामस्थांच्या समस्येचे निराकरण करत स्वःखर्चाने ग्रामस्थांसाठी मोहोपाडा मुख्य बाजारपेठ गावाला पिण्याच्या पाण्याचे टॅंकर ग्रामस्थांसाठी उपलब्ध करून देवून सामाजिक बांधिलकी जोपासली.

## खोकल्याने जनता त्रस्त

**| पनवेल | प्रतिनिधी |**

सध्याच्या बदलत्या वतावरणामुळे गेल्या काही दिवसांपासून पेण तालुक्यातील जनता खोकला आणि घशाच्या आजाराने त्रस्त झाली आहे. आत्ता पाऊस गेला असून थंडीचे आगमन झाले आहे. मात्र, त्याबरोबरच वातावरणात देखील सातत्याने बदल होत आहेत. या बदलांमुळे सध्या तालुक्यात सर्दी बरोबरच खोकला, घशाची खवखव यांचा त्रास नागरिकांना होऊ लागला आहे. त्यामुळे घशाची खवखव व खोकल्याच्या रुग्णांच्या संख्येत नेहमीपेक्षा जास्त वाढ झाली असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे.


## उरण नगरपरिषदेत ११ जागा महिलांच्या वाट्याला

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

आगामी होऊ घातलेल्या सार्वत्रिक पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी उरण नगरपरिषदेच्या १० प्रभागातील २१ जागांचे आरक्षणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. उनप प्रशासन भवनात गुरुवारी (८) प्राधिकृत अधिकारी अविशकुमार सोनुले व मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सोडत पद्धतीने आरक्षण काढण्यात आले.

१) अ- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला), ब- सर्वसाधारण, २) अ- अनुसूचित जाती ( महिला) ब- सर्वसाधारण ३) अ- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला), ब- सर्वसाधारण ४) अ- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, ब- सर्वसाधारण (महिला ) ५) अ- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला), ब- सर्वसाधारण

६) अ- अनुसूचित जाती, ब- सर्वसाधारण (महिला) ७) अ- सर्वसाधारण (महिला), ब- सर्वसाधारण ८) अ- सर्वसाधारण (महिला), ब- सर्वसाधारण ९) अ- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, ब- सर्वसाधारण (महिला) १०) अ- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, ब- सर्वसाधारण (महिला), क-सर्वसाधारण (महिला).



• समुद्रलगतचे टुमदार मुरुड शहर डोंगरी गावच्या टेकडीवरुन टिपले आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## मोठीजूई येथून महिला बेपत्ता

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील मोठीजूई येथील चंद्रभागा बुधाजी भोईर वय -७२ वर्षे गुरुवार (दि.९) रोजी घरारून निघून गेली आहे. उरण पोलीस ठाण्यात लक्ष्मण बुधाजी भोईर यांनी उरण पोलीस ठाण्यात कळविले. उरण पोलीस ठाण्यात मनुष्य मिसिंग नोंद करण्यात आली आहे. महिलेचे वय ७२ वर्षे



असून उंची साडेपाच फुट, अंगाने सडपातळ, रंग सावळा, चेहरा उभट, नाक सरळ, केस पांढरे, अंगात लाल रंगाची साडी, चोकलेटी रंगाचाब्लाउज, गळ्यामध्ये काळ्या मण्यांचे सोन्याचे मंगळसूत्र, कानामध्ये पिवळ्या रंगाचे कुड्या, कपाळावर लाल रंगाची मोठी टिकली, पायात राखाडी रंगाची चप्पल, असे वर्णन असलेली महिला कुणास आढळून आली. तर उरण पोलीस ठाण्यात संपर्क साधावा. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय साबळे अधिक तपास करीत आहेत.

## प्रिया पाटीलने पटकवला रायगड फोटो सुंदरीचा किताब

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड फोटोग्राफर्स अण्ड व्हिडीओ ग्राफर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित केलेल्या फोटो एक्स्पोमध्ये छायाचित्रकारांना मॉडेल फोटोग्राफी, फॅशन फोटोग्राफी संदर्भात ज्ञान अवगत व्हावे त्याचबरोबर फॅशन फोटोग्राफीचा अनुभव मिळावा या उद्देशाने रायगड फोटो सुंदरी २०२५ या फॅशन शोची स्पर्धा आयोजित केली होती.

जिल्ह्यातील २६ स्पर्धक या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेचे कोरिओग्राफर गौरव पाटील यांनी निवडक १४ स्पर्धकांना अंतिम फेरीत निवड केली होती.

वेस्टर्ण वेशभूषा परिधान करून रॅम्पवॉक करणाऱ्या या स्पर्धेकांमधून अलिबाग येथिल प्रिया पाटील हिने रायगड फोटो सुंदरी २०२५ चा किताब पटकवला, सिद्धी वाकडे द्वितीय तर पुजा बांधरकर हिने तिसरा क्रमांक पटकवला. विजयी स्पर्धकांना पेण नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.या स्पर्धेचे परीक्षण मुंबई येथिल प्रसिद्ध छायाचित्रकार तृप्ती नाईक आणि ठाणे येथिल फॅशन फोटोग्राफर राजेंद्र तुपे यांनी केले. यावेळी फोटोग्राफर असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष विवेक सुभेकर, विद्यमान अध्यक्ष समीर भायदे, उपाध्यक्ष समीर मालोदे, सचिव आनंद निंबरे, खजिनदार जितेंद्र मेहता, सहसचिव दीपक बडगुजर, सल्लागार दादा आर्ते, कोअर कमिटी सदस्य अनिरुद्ध जोशी, अविनाश राऊत, सुशिल घाटवळ, निलेश शिर्के, चैतन्य पाटील, संदीप म्हात्रे, सर्व तालुका फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष,

## वडघर पूल ते कॉलेज फाटा रस्त्याने घेतला मोकळा श्वास

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल जवळील वडघर पूल ते कॉलेज फाटा पर्यंत वाढलेल्या अतिक्रमणावर कारवाई करत करंजाडे ग्रामपंचायतीने वाहतूक कोंडी फोडली आहे. सरपंच मंगेश शेलार यांनी याबाबत पुढाकार घेवून नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा दिला आहे.

पनवेलहून उरणकडे जाताना गाढी नदीवर पूल बांधण्यात आला आहे. त्या पुलापासून कॉलेज फाटा पर्यंत हातगाडी आणि फेरीवाल्यांनी रस्ता अतिक्रमित केला होता.त्यामुळे पादचारी आणि वाहनचालकांना येता-जाता नाहक त्रास सहन करावा लागत होता.या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी देखील होत होती. नागरिकांनी याबाबत ग्रामपंचायत करंजाडे यांना तक्रारी केल्या होत्या. यावर सरपंच मंगेश शेलार यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना यावर कारवाई करण्याचे आदेश दिले. तेव्हा आठ कर्मचारी यांनी एक जेसीबी सह अतिक्रमणावर कारवाई केली.



**रोजगार मेळाव्याला तरुणांचा प्रतिसाद | १५० युवक व युवतींना नेमणूक पत्र सुपूर्द**

# सुधागडात १८ वा यशस्वी मेळावा

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यात भारतीय शेतकरी कामगार पक्ष व शेकाप खजिनदार महाराष्ट्र राज्य अतुल म्हात्रे यांच्या संकल्पनेतून पाली येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन शनिवार (दि.११) ऑक्टोबर रोजी मराठा समाज हॉल, शिलोशी रोड येथे रायगड जिल्हा शेकाप चिटणीस सुरेश खैरे, तालुका चिटणीस अतिष सागळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या रोजगार मेळाव्यात रोजगाराच्या शोधात असणाऱ्या तालुक्यातील ५०० युवक आणि युवतींनी या मेळाव्यात सहभाग घेतला होता. या रोजगार मेळाव्यात संचालक प्रशांत कांबळे यांनी उपस्थित युवक आणि युवतींना रोजगारा बद्दल मार्गदर्शन करताना कोणत्या क्षेत्रात करिअर करता येईल याची सविस्तर माहिती सांगितली.



शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे मेळाव्यातील युवकांना मार्गदर्शन करताना असे म्हणाले की गेली कित्येक दिवस सुधागड तालुक्यातील युवक-युवतीसाठी रोजगार मेळावा घेण्याच्या विचारात होतो. अतुल म्हात्रे यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी तालुक्यातील बेरोजगाराना रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते.

गेल्या काही दिवसात जिल्ह्यात १७ रोजगार मेळावे घेऊन हजारो तरुणाचे भविष्य उज्वल केले. १८ वा रोजगार मेळावा सुधागड तालुक्यात घेऊन तालुक्यातील तरुणांना आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी उपलब्ध आहेत त्याचा लाभ तरुणांनी घ्यावा तसेच ज्यांची या मेळाव्यात नेमणूक होणार नाही त्यांनी निराश न होता पुन्हा प्रयत्न करा हा मेळावा सुधागडमध्ये घेतल्याबद्दल अतुल म्हात्रेचे आभार मानले.

मेळाव्याचे उत्तम नियोजन जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, तालुका चिटणीस अतिष सागळे आणि तालुक्यातील कार्यकर्ते यांनी केले. मेळाव्यासाठी मोठ्या प्रमाणावर रोजगारासाठी गरजू तरुण उपस्थित आहेत. जिल्ह्यातील तरुण युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा संकल्प केला होता. रोजगार मेळाव्यात ज्यांना रोजगार उपलब्ध होणार नाही त्याना देखील येत्या काळात लवकरात लवकर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मी कटिबद्ध राहील असे त्यांनी सांगितले. आजच्या काळात ज्या क्षेत्रात करिअर आहे त्यानुसार प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. ए.आय क्षेत्रात करिअरच्या संधी आहेत त्यासाठी पनवेल येथे प्रशिक्षण केंद्र निर्माण केले आहे.

या मेळाव्यासाठी किसन उमटे संचालक आरडीसीसी, जे. बी गोळे, समृद्धी यादव, भारती शेळके माजी सभापती, नरेश बेकर, प्रवीण कुंभार, ॲड. रोशन पाटील, प्रशांत कांबळे गजानन शिंदे, सुधीर साखरले, संदेश सोनकर तसेच शेकाप पदाधिकारी, कार्यकर्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

> **सुधागड तालुक्यात युवक व युवतीसाठी भव्य दिव्य प्रथमच रोजगार मेळावा भरविण्यात आला. त्यामुळे तालुक्यातील तरुण आणि तरुणींना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल शेकापचे मन:पूर्वक धन्यवाद. मला या मेळाव्यात नोकरीचे नेमणूक पत्र दिल्याबद्दल मी खूप आनंदी आहे.**
> **बबन वाघमारे – युवक**

## निवडक

### पोलिसांतर्फे विद्यार्थी समुपदेशन



**खांब :** रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे कोलाड पोलीस स्टेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना समुपदेशक कार्यक्रम (दि.११) ऑक्टोहर रोजी विद्यालयात करण्यात आले. कोलाड पोलीस स्टेशनचे नितिन मोहिते यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी पोलीस स्टेशनचे विजय वांद्रे, श्रावणी भोईर यांनी विद्यार्थी वर्गाला मोबाईल फोनचे दुष्परिणाम व आपल्या जीवनात विविध जोपासलेले छंद व पुस्तके वाचण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. शेवटी मुख्याध्यापक दिपक जगताप यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### सभापती पद ना. मा. प्रवर्ग राखीव

**नेरळ :** आगामी काळात होणाऱ्या कर्जत पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सभापती पदाचे आरक्षण काढण्यात आले आहे. तालुका पंचायत समितीचे सभापती पद हे नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. दरम्यान, अडीच वर्षासाठी नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी सभापती पद आरक्षित ठेवण्यात आल्याने मोठी चुरस निर्माण झाली आहे. या आधी पहिली अडीच वर्षे सभापती पद हे सर्वसाधारण होते. मागील पाच वर्षाच्या सदस्य पदाचे काळात अडीच वर्षाच्या दोन टर्ममध्ये तब्बल चार सदस्यांना सभापती होण्याची संधी मिळाली होती. मागील निवडणुकीनंतर सात वर्षात अनेक राजकीय स्थित्यंतरे आली आहेत. अशावेळी शिवसेना, राष्ट्रवादी, शिवसेना ठाकरे पक्ष, भाजप तसेच शेतकरी कामगार पक्ष यांच्यात राजकीय चुरस पाहायला मिळणार आहे.



### रस्त्यांमुळे वाढली गावाची शोभा

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या चिरनेर मुळपाडा येथील तुकाराम कडू यांच्या घरापासून ते माजी सरपंच संध्याताई मुंबईकर यांच्या घरापर्यंतच्या अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण व आरसीसी गटाराच्या कामांचे भूमिपूजन शनिवारी (दि.११) ऑक्टोबर रोजी करण्यात आले. याप्रसंगी भास्कर मोकल, अरुण पाटील, माजी सचिन घबाडी, संजय पाटील, सुरेश पाटील, हिराजी ठाकूर, अशोक मुंबईकर, रवींद्र मुंबईकर, विमल कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीफळ वाढवून करण्यात आले. त्यानंतर या कामाला सुरुवात करण्यात आली. गावातील प्रमुख अंतर्गत रस्ते, गल्लीबोलातील रस्ते, भुयारी गटारांची कामे मार्गी लागली असून, येत्या काही दिवसात अक्कादेवी धरणाकडे जाणारा आदिवासींचा रस्ता तसेच चिरनेर हायस्कूल ते कातळपाडापर्यंत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यात येणार असल्याची माहिती मोकल यांनी दिली. या रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरण व मजबुतीकरणामुळे गावाची शोभा आणखीन वाढली आहे.

### शासनमान्य धान्य दुकानाचे उद्घाटन

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील निळगूण गावात बामणोली २ या शासनमान्य नवीन रास्त भाव धान्य दुकान सुरू करण्यात आले आहे. या दुकानाचा उदघाटन दि. ११ ऑक्टोबर रोजी कुणबी समाज साले ग्रुपचे अध्यक्ष सुभाष गुगले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिनेश गुगले, नितीन वाघमारे, दिलीप गुगले, काशीराम गुगले, प्रा. भारत पवार आदी मान्यवरांसह ग्रामस्थ व महिला मंडळ निळगुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- आमच्या मालकीचे दोन मजली इमारतीमधील पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरचे रूम आणि खालील तळमजल्यावरचे दुकान गाळे भाड्याने द्यायचे आहेत, इच्छुकांनी संपर्क साधावा. मो. ८६९८२३१५६७ गुरव मॅडम.
- अकाऊटंट पाहिजे. पात्रता- Bcom, Tally अनुभव- ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार २५००० महिना, Contact- 9823585321
- दुकान गाळा विक्री करणे आहे. अलिबाग एस.टी.स्टँड जवळ ९७६४५४८६७९
- अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी १० वी पास मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- अलिबाग-गोंधळपाडा येथे २.५ वर्षांच्या जुळ्या मुलींना सांभाळून जेवण बनवणे किंवा घरकाम करणे यासाठी निवासी (२४ तास) प्रेमळ मदतनीस ताईची आवश्यकता आहे. साधारण वयोमर्यादा- ३५ ते ५५ वर्षे. संपर्क : ९८६९१८०१५१/८८०६६८५७१०
- मुलं, मुली पाहिजेत कामासाठी १० वी १२ वी पास औषधांच्या एजन्सीमध्ये part time सुद्धा चालेल. वेळ : १०.०० am to ७.०० pm
- सर्वप्रकारचे आजार, संतानप्राप्ती, मधुमेह, लठ्ठपणा/विवाह/सो-नेतारणावर बिनव्याजी कर्ज/शेतकरी, विधवा महिलांना जगभर दरमहा ३०००/- ठेवीदाराना एका लाखात ८०००/- घरबसल्या कायमस्वरूपी लाखो कमविणेसाठी (१८ वर्षावरील/गुंतवणूक आवश्यक) वेळ ठरवूनच निसर्गोपच्चारतज्ञ नथुराम धायाशेठ मोकल इंटरप्रायझेस शिहू (पोयनाड-नागोठणा) ४०२१०६/८२६३८९०४२३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# रस्ता बंद केल्यामुळे ग्रामस्थ आक्रमक

## • मोठा अपघात होण्याची शक्यता • दोन दिवसात निर्णय द्या, अन्यथा रस्तारोको

| कोलाड | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गावरील गोवे व पुई नाका (पुई कॉलनी) येथील बस स्टॉप जवळ येण्याजाण्याचा मार्ग संबंधित ठेकेदारानी बंद केला असून या ठिकाणी कोणताही दिशादर्शक फलक नाही, यामुळे या महामार्गांवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

कोणाचा नाहक बळी गेल्यानंतर येण्याजाण्यासाठी रस्ता मोकळा केला जाईल काय? असा संतप्त सवाल करत गोवे व पुई ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. दोन दिवसात आम्हाला निर्णय द्या नाहीतर रस्त्यावर उतरून रस्तारोको करण्यात येईल असा इशारा ग्रामस्थांकडून मुंबई-गोवा हायवेचे टीम लीडर विर बहादूर सिंग यांना देण्यात आला आहे.



मुंबई-गोवा हायवेवरील गोवा स्टॉप व पुई नाका (पुई कॉलनी) या दोन्ही बाजूकडे जाण्यायेण्यासाठी कोणताही रस्ता ठेवला नाही. गोवे बाजुकडून कोलाडकडे जाण्यासाठी ५०० अंतरावर भिक्षेकरी गृहाजवळ जाऊन मार्ग बदलवा लागत आहे. यामुळे समोरून येणाऱ्या अतिवेगाने येणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

तसेच पुई कॉलनीकडे जाण्यासाठी तिच परिस्थिती आहे. यामुळे अपघाताचा धोका टाळण्यासाठी गोवे स्टॉप व पुई नाका येथे रस्ता मोकळा करून दिशादर्शक फलक लावून या दोन्ही स्टॉप जवळील मार्ग मोकळा करून द्यावा यासाठी ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. गोवे येथे गिता द. तटकरे पॉलिटेक्निकल कॉलज असल्यामुळे मुंबई-गोवा महामार्गांवरून गोवे गावाकडे जाण्यासाठी रायगड जिल्हासह देशाच्या कानाकोपऱ्यातून असंख्य विद्यार्थी येजा करीत असतात तसेच गोवे गावातील नागरिक, विद्यार्थी कोलाडकडे जाण्यासाठी याच मार्गाने येजा करीत असतात तर पुई कॉलनी येथे पाटबंधारे खात्याचे अधिकारी तसेच येथे श्री सद्गुरु दास भक्तीचा हॉल असून येथे असंख्य दासभक्त बैठकीसाठी ये-जा करीत असतात, अशा महत्वाच्या ठिकाणी येण्याजाण्याचा मार्ग बंद केला आहे. यामुळे या महामार्गांवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. यामुळे हा मार्ग खुळा करून रस्ता करून द्यावा. यासाठी ग्रामस्थ आक्रमक झाले असून मुंबई-गोवा हायवेचे टीम लीडर विर बहादूर सिंग यांना दोन दिवसाची मुदत देऊन योग्य तो निर्णय द्या अन्यथा मुंबई-गोवा हायवेवर रस्तारोको करू असा इशारा गोवे व पुई ग्रामस्थ यांच्याकडून देण्यात आला आहे.

यावेळी विभागीय अध्यक्ष नरेंद्र जाधव, नरेंद्र पवार, बळीराम जाधव, श्रीधर गुजर, विश्वास निकम, किरण पवार, राजा जाधव, नितीन जवके, अशोक धामणसे, सुनिल दळवी, असिफ सय्यद, अमजद सय्यद, नाना दिवेकर, नितीन वारकर, योगेश धामणसे, विनायक दिवेकर, उल्हास पाटील, नितीन पवार दिनेश खराडे, तसेच असंख्य गोवे व पुई ग्रामस्थ उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांचे हाल

जिल्ह्यासह देशाच्या कानाकोपऱ्यातून असंख्य विद्यार्थी ये-जा करीत असतात. तसेच गोवे गावातील नागरिक, विद्यार्थी कोलाडकडे जाण्यासाठी याच मार्गाने येजा करीत असतात. हा मार्ग बंद केल्यामुळे विद्यार्थ्यांचे हाल झाले आहेत.

# फुले चोरणारे विकृत भक्त कार्यरत

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन शहरातील आगरपट्ट्यामध्ये सध्या फुले चोरून नेणाऱ्यांच्या टोळ्या सक्रिय झालेल्या आहेत. मोटर सायकलवर येऊन दुसऱ्याच्या आवारात शिरून पहाटेच्या वेळेला फुले चोरून न्यायची व ती चोरलेली फुले देवाला वाहून देवाचे आशीर्वाद मिळवण्याचा प्रयत्न करण्याचा विकृत प्रकार सध्या सुरू असलेला पाहायला मिळत आहे. अनेक जण आपल्या आवारात नियमित देवपूजेसाठी किंवा शोभेसाठी विविध प्रकारची फुल झाडे लावत असतात.

परंतु अनेक असे महाभाग आहेत जे दुसऱ्याच्या आवारातील फुले पहाटे चार ते पाच च्या दरम्यान चोरून नेतात. फुले नेली तर नेली पण त्या फुलझाडांच्या फांद्या तोडून यांना कोणत्या प्रकारचे मानसिक सुख मिळते? असा प्रश्न फुल झाडांची जोपासना करून लावणाऱ्या घरमालकांना पडलेला आहे. आपल्या देवघरातील देवपूजेसाठी फुले उपलब्ध नसतील तर बाजारात फुले विकत मिळतात. ती आणून देवाला वहावी. दुसऱ्याच्या आवारातील फुले चोरून देवाची भक्ती करण्यामागे विकृत महाभागांचा काय उद्देश असावा? असा प्रश्न देखील पडतो. अनेक महाभागांना अशी सवयच लागलेली आहे की, दुसऱ्याच्या आवारामध्ये जाऊन रोज नियमितपणे फुले, तुळशीची पाने, बेलाची पाने अशा प्रकारची देवाला वाहण्यासाठी लागणाऱ्या वस्तू चोरून आणायच्या आणि देवभक्ती करायची. अशाप्रकारे दुसऱ्याच्या आवारातील फुले चोरणाऱ्या महाभागांनी जनाची नाही तर मनाची तरी लाज बाळगावी असे फुलझाडे जोपासणाऱ्यांचे म्हणणे आहे.

### अशोक टके यांचे निधन

**नागोठणे :** नागोठण्याजवळील आमडोशी गावातील सामाजिक कार्यकर्ते अशोक सिताराम टके (वय ६४) यांचे गुरुवार दि. १० ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. यांच्या पार्थिवावर आमडोशी येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन भाऊ, बहिण असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवार दि. १९ ऑक्टोबर रोजी माणकेश्वर मंदिर आमडोशी येथे व उत्तरकार्य मंगळवार दि. २१ ऑक्टोबर रोजी आमडोशी येथील राहत्या घरी होणार असल्याची माहिती टके कुटुंबियांनी दिली आहे.

# वाचन प्रेरणा दिन



| तळा | प्रतिनिधी |

भारताचे माजी राष्ट्रपती व महान वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन १५ ऑक्टोबर रोजी देशभर 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. महाविद्यालयात परीक्षा सुरू असल्यामुळे वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम ११ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी कला-प्रा. डी. टी. आंबेगावे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रभारी प्राचार्य डॉ. बी. जी. भवरे, एस. के. ढवण उपस्थित होते. प्रा. आंबेगावे यांनी वाचनाचे वैयक्तिक व शैक्षणिक जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारशक्ती वाढते, प्रगल्भ व्यक्तिमत्व घडते. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माथेरानमधील सेवा पंधरवडाची सांगता

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद यांच्या आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य विभाग यांच्याकडून सेवा पंधरवडा साजरा झाला. या पंधरवडाचे निमित्ताने बीजे रुग्णालयाच्या वतीने महाआरोग्य शिबीर आयोजित केले होते.आरोग्य शिबिरामध्ये विविध आजारांवर तब्बल ३८० रुग्णांची तपासणी करण्यात आली.



माथेरान नगरपरिषद आरोग्य विभाग आणि बीजे रुग्णालय यांच्या माध्यमातून आयोजित केलेल्या महाआरोग्य शिबीराचे उद्घाटन पालिकेचे मुख्याधिकारी आणि प्रशासक राहुल इंगळे यांचे हस्ते झाले. यावेळी सुरेंद्रनाथ ठाकूर, डॉ रुपाली मिसाळ, डॉ अश्विनी सोनवणे, डॉ प्रतीक झेंडे, डॉ राहणं यादव, डॉ अर्चना सिंग, डॉ ज्ञानेश्वर अरसाळे, डॉ. विलास चव्हाण, डॉ. अजय इंगळे, रमेश पवार उपस्थित होते. आरोग्य सेवामध्ये रक्तदाब, मधुमेह, नेत्र ,दंतरोग तपासणी, मुख कर्करोग तपासणी तसेच लसीकरण सेवा, रक्त व हिमोग्लोबिन तपासणी, तसेच क्षयरोग तपासणी यांच्यासह सिकलसेल आजार व रक्तशय तपासणी करण्यात आली. या आरोग्य शिबिरात २०० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तर अन्य डॉक्टरांकडून ३५० रुगणांची तपासणी करण्यात आली.

# बौद्ध वर्षावास प्रवचन मालिकेचा समारोप

| वावोशी | प्रतिनिधी |

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने ७ ऑक्टोबर रोजी धाटाव एमआयडीसी परिसरातील खैरवाडी येथे वर्षावास प्रवचन मालिका समारोप उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रोहा तालुका अध्यक्ष मारुती लोखंडे यांनी भूषविले होते.



यावेळी यशवंत शिंदे, सूर्यकांत कांबळे, सुप्रिया कांबळे, मिराताई सुरळकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात त्रिसरण पंचशील ग्रहण करून झाली, तर समारोप सरणतय घेऊन करण्यात आले.

यावेळी सुरेश वाटवे, अमोल वाटवे, मनिषा इंगळे, सुभाष इंगळे, मिलिंद गमरे, नम्रता शिंदे, अक्षदा वाटवे, अश्विनी वाटवे, ज्योती वाटवे, मनोज शिंदे, मनिषा लोखंडे, प्रमिला रसाळ, सिंधुताई, वर्षा इंगळे, रेश्मा इंगळे, शिल्पा इंगळे, विश्वास इंगळे, विशाल सुरळकर, संजना सुरळकर, शीतल इंगळे, अशीष गाजीकर, वाघमोडे, मनिषा तायडे, कल्पना खंडारे, वाघमारे, तुळशीराम शिर्के, प्रकाश शिर्के, देवराम इंगळे, नारायण गायकवाड, आणि प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माथेरानमध्ये बालवाडीतील बाळांचा मेळावा

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान शहरात बालवाडी संस्कृती अजूनही टिकून असून महाराष्ट्र राज्यात १९७२ मध्ये पहिल्यांदा बालवाडी सुरु करणाऱ्या सुहासिनी सावंत तथा माई यांनी माथेरान शहरातील तिन्ही बालवाडीमध्ये येणारी बालके यांच्या मेळाव्याला हजेरी लावली. दरम्यान, बाळाच्या संगोपनात बालवाडी अत्यंत महत्वाची असून बालवाडी संस्कृती टिकली पाहिजे असे आवाहन सुहासिनी सावंत यांनी केले.



माथेरान शहरात बालवाडी आणि अंगणवाडी यांच्या माध्यमातून पोषण माह सप्ताह आयोजित करण्यात आला होता. या सप्ताहाच्या समारोप प्रसंगी महाराष्ट्र राज्यात पहिली बालवाडी मुंबई शहरात सुरु करणाऱ्या सुहासिनी सावंत यांनी माथेरान शहरातील बालवाडी पोषण सप्ताहाला हजेरी लावली. पोषण माह सप्ताह मधील आरंभिक बालसंगोपन आणि बालशिक्षण दिवस कार्यक्रमाचे आयोजन माथेरान शहरातील हुतात्मा भाई कोतवाल शैक्षणिक संकुलातील बालवाडी केंद्रात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी एकात्मिक बालविकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी सुहिता ओव्हाळ राज्यात पहिली बालवाडी सुरु करणारे सुहासिनी सावंत,मुख्य सेविका रोहिणी अधिकारी यांच्यासह माथेरान शहरात अंगणवाडी केंद्राच्या सुरेखा जमदाडे, रमा आखाडे आणि स्मिता गायकवाड तसेच मदतनीस मनीषा दळवी, शबाना महापुळे, मनीषा शिंदे आदी प्रमुख उपस्थित होते. या पोषण महासप्ताहाच्या समारोप प्रसंगी माथेरान शहरातील बी. जे रुग्णालय आरोग्य सेविका तसेच मैत्री ग्रुपचे महिला सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमात पालक म्हणून कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिलांचे विविध खेळ साजरे झाले. तर पोषण आहाराबद्दल माहिती देणारे पोषण आहाराचे स्टॉल त्या ठिकाणी मांडण्यात आले होते.



# खोपोलीत शिवसेनेची आढावा बैठक

| खोपोली | प्रतिनिधी|

खोपोली नगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने खोपोली शहर मर्यादित शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची आढावा बैठक उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत अंकुश पवाली, पंकज रुपवते, पंढरीनाथ राऊत, संघटक दिलीप पुरी, नितीन मोरे, महेश नायकोडे, प्रवक्ते विलास चालके, किशोरी शिगवण, शिवसैनिक युवासैनिक व महिला आघाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**भीमराव पांचाळे यांच्या मैफलीला रसिकांची दाद** | **अनेक मान्यवरांचा आयुक्ताच्या हस्ते सत्कार**

# कोजागरीच्या गजल मैफलीत रसिक मंत्रमुग्ध

| पनवेल | प्रतिनिधी|

कोजागरी पौर्णिमेचे औचित्य साधून नवी मुंबई प्रेस क्लबने आयोजित केलेल्या गजलनवाज भीमराव पांचाळे यांच्या 'तू नभातले तारे' या गज़ल मैफलीस श्रोत्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. या निमित्ताने शहरातील राजकीय, शासकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मान्यवरांचे कौटुंबिक स्नेहसंमेलन संपन्न झाले.




कोजागरीच्या शीतल चांदण्यात दुग्धपानाचा आस्वाद घेत हजारो रसिकांनी एकमेकांची विचारपूस करत कोजागरी साजरी केली.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून पद्मश्री पुरस्कार प्राप्त सुलेखनकार अच्युत पालव, महाराष्ट्र शासनाचा लता मंगेशकर पुरस्कार प्राप्त गज़लनवाज़ भीमराव पांचाळे व महाराष्ट्र शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त नवी मुंबईतील पहिले मान्यवर सुभाष कुळकर्णी यांना वन मंत्री गणेश नाईक, व आ. मंदा म्हात्रे, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. याशिवाय नवी मुंबई शहराच्या निर्मितीनंतर येथील सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक व पर्यावरण क्षेत्रात गत ४०-५० वर्षांपासून सतत कार्यरत असलेल्या व नवी मुंबईच्या जडण-घडणीत महत्त्वपुर्ण योगदान देणाऱ्या मान्यवरांना देखील नवी मुंबई प्रेस क्लबच्यावतीने गौरविण्यात आले.

### रसिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

गज़लनवाज़ भीमराव पांचाळे यांनी सादर केलेल्या तू नभातले तारे, अंदाज आरशाचा, हा असा चंद्र ही अशी रात फिरायासाठी, नाही म्हणावयाला आता असे करुया या गज़लांना रसिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. तर त्यांची कन्या डॉ. भाग्यश्री पांचाळे यांनी सादर केलेली चांदण्यासाठी हे असे जगणे आता पुरे, करते थोडी स्वप्ने गोळा व रोशनीचे कायदे पाळायचे या गज़लांनी रसिकांची वाहवा मिळवली.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### १२ ऑक्टोबर

१) श्री. सुधाकर मधुसूदन वर्तक
वरसोली, अलिबाग, १२-१०-१९५१
२) श्रीम. जयश्री जयंत राईलकर
अलिबाग, १२-१०-१९५२
३) श्रीम. माधुरी जयेंद्रनाथ घोसाळकर
सारळ, अलिबाग, १२-१०-१९४९
४) श्री. आत्माराम महादेव म्हात्रे
नारंगी, अलिबाग, १२-१०-१९५२
५) श्रीम. अनुराधा बबन श्रीम. पेणकर
अलिबाग, १२-१०-१९६०

# मालमत्ताधारकांचा सहा कोटींचा दंड माफ

## चिपळूण पालिकेची थकबाकीदारांना संधी

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

वारंवार नोटिसा बजावून व जप्तीची कारवाई करूनही मालमत्ता कराची रक्कम न भरणाऱ्या शहरातील मालमत्ताधारकांसाठी शासनाने मोठी संधी दिली आहे. मालमत्ता करावरील दंडमाफीसाठी अभय योजना १९ मे २०२५ पासून सुरू झाली आहे. नोव्हेंबर २०२५ पर्यंतच्या कालावधीत थकीत मालमत्ता कर एकरकमी भरल्यास त्यांचा दंड आयुक्तांमार्फत पूर्णपणे माफ केला जाणार आहे. तसेच, ५० टक्के दंड जिल्हाधिकारीस्तरावर माफ केला जाणार आहे.

चिपळूण शहरातील थकीत मालमत्ताधारकांकडून ५ कोटी ९७ लाख ५८ हजार रुपयेइतकी रक्कम दंड स्वरूपात येणे आहे. घरपट्टी व पाणीपट्टी हे एकमेव उत्पन्नाचे साधन असलेल्या चिपळूण पालिकेत दरवर्षी मालमत्ता कर वसुलीवर भर दिला जातो. त्यासाठी मार्चअखेरीस सलग दोन महिने वसुली मोहीम राबवली जाते. शहरात सुमारे २८ हजार मालमत्ताधारक असून, एकूण १६ कोटींची मालमत्ता कराची मागणी आहे; मात्र एकूण मागणीच्या थकीत करापोटी सुमारे सहा कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. सुमारे १३०० मालमत्ताधारकांचा यात समावेश आहे. त्यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करूनही त्याची वसुली झालेली नाही; मात्र आता थकीत मालमत्ताधारकांना शासनाने कराची रक्कम भरण्यासाठी संधी दिली आहे. त्यासाठी अभय योजना १९ मेपासून लागू केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी थकीत मालमत्ताधारकांना नोहेंबरपर्यंत नगरपालिकेकडे अर्ज करावा लागणार आहे. जे ३० मालमत्ताधारक थकीत कराची रक्कम एकरकमी भरतील त्यांचाच दंडमाफीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात येणार आहे. थकीत दंड रकमेच्या ५० टक्के अथवा त्यापुढे सवलतीचा लाभ हवा असल्याने पालिकेकडे परिपूर्ण प्रस्ताव द्यावा लागणार आहे. दंडाची रक्कम पूर्णतः माफ करण्याचा अधिकार हा शासनाचा असल्याचे मुख्याधिकारी विशाल भोसले यांनी स्पष्ट केले.

### योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

पालिकेकडे अभय योजनेतून जे अर्ज प्राप्त होतील त्यांची थकीत रक्कम भरल्यानंतरच सवलतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील थकीत मालमत्ताधारकांनी अभय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी भोसले यांनी केले आहे.

# परेश राठोड यांचे अपघातात निधन

**माणगाव :** माणगावशहरातील प्रसिद्ध राठोड हॉस्पीटल आणि धनलक्ष्मी मेडिकलचे मालक परेश मोहनलाल राठोड यांचे अपघातात निधन झाले. मंगळवारी (दि.८) रात्री १० सुमारास माणगाव बाजारपेठेतील मोतीराम प्लाझासमोर मुंबई-गोवा महामार्गावर दुचाकीवरून जात असताना अपघात झाला. या अपघातानंतर त्यांना माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले. मात्र त्यांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना मुंबई येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वत्र दुःख व्यक्त करण्यात येत आहे. परेश राठोड हे अत्यंत मनमिळाऊ आणि शांत संयमी स्वभावाचे होते. त्यांनी अनेक गरीब आणि गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवेचा लाभ दिला होता. त्यामुळे ते संपूर्ण तालुक्यात परीचीत होते. त्यांच्या अंत्ययात्रेला मोठ्या संख्येने मित्र परिवार उपस्थित होता. मृत्यूसमयी त्यांचे वय ५९ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे.



## बोधकथा
## श्री समर्थांचे सामर्थ्य

**(समर्थ श्री रामदास स्वामी)**

एकदा समर्थ रामदास स्वामी आपल्या शिष्यांसह सहल करीत होते. मध्ये रस्त्यावरच त्यांच्या शिष्यवर्गाना खूप चालल्यामुळे तहान भूक लागली. त्यांना रस्त्यात एक उसाचा मळा दिसला. समर्थांचे शिष्य स्वतः ला प्रति समर्थ समजून त्या मळ्यात शिरले आणि भराभर ऊस तोडून खात होते. मळ्याच्या मालकाला हे समजताच तो धावत आला. तो रागाने लालबुंद झाला होता. रागाच्या भरात त्यांनी शेतातले दोन ऊस उपटून काढले आणि तो प्रत्येक शिष्याला झोडपित सुटला. इतक्यात त्याचे लक्ष श्री समर्थांच्याकडे गेले. आणि हाच सर्वांचा मोरक्या दिसतो असे म्हणून त्यांने समर्थांची पाठ हिरवी निळी केली. समर्थ काहीच बोलले नाहीत. दुसऱ्या दिवशी आंघोळ करताना समर्थांना कुणीतरी खूप मारले आहे हे सर्वांना समजले आणि राजानी त्याची चौकशी सुरू केली. चार तासात त्या दोषी शेतकऱ्याला जेर बंद करून राजे शिवाजी महाराज यांच्यासमोर उभे करण्यात आले. चौकशी झाली. शेतकऱ्यांने श्री समर्थ ना मारल्याचे कबूल केले राजांनी श्री समर्थांना विचारले की, या उद्धम शेतकऱ्याला काय शिक्षा करावी? श्री समर्थ म्हणाले, राजे, शेतकऱ्याला इनाम द्या.

**सद्गुरु स्वामी बोध**

हृदयात क्रोध येण्यासारखी परिस्थिती असूनही साधू पुरुषांच्या ठिकाणी क्रोध नसतो. सर्व विश्वांबरोबर एकरूप झालेले असल्यामुळे राग ज्याचा यावा असे साधू पुरुषांना कोणी ही परके नसतात. जीभ दातांनी चावली कोणी बत्तीशी पाडली असे संत मुक्ताबाई (भगवान श्री ज्ञानदेवांच्या भगिनी) म्हणतात. साधू पुरुष कधीही क्रोधाच्या वाटेने जात नाही त्यांना राग कधीच येत नाही. आपण संत चरित्र या दृष्टीने वाचायची. संतांची चरित्र वाचताना आपल्याला त्यांच्या भावनेशी एकरूप व्हावे लागते नाहीतर त्या चरित्रातील मर्म आपणास समजणारच नाही.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम, दातार आळी, पेण.**



# राष्ट्रीय पोषण सप्ताह साजरा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

एकात्मिक बालविकाससेवा योजना माणगाव अंतर्गत बीट इंदापूर-१ यांच्यामार्फत इंदापूर येथे आठवा राष्ट्रीय पोषण माह सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. पोषण माह सप्ताह अंतर्गत तळाशेतमधील विठ्ठल-रखुमाई मंदिर ते बसस्थानक या मार्गावर महिला, किशोरवयीन मुली, अंगणवाडी सेविका, मदतनीस, शालेय विद्यार्थी यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.

यावेळी फळे, फुले, पालेभाज्या यांची सजावट केलेली पोषण पालखी घेऊन रली काढण्यात आली. ढोल-ताशाच्या गजरात निघालेल्या या रॅलीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. इंदापूर बसस्थानकात यावेळी अंगणवाडी सेविका, मदतनीस, बालकांच्या माता पालक यांनी प्रधानमंत्री मातृत्व वंदन व लेक लाडकी योजनेवर आधारीत अतिशय प्रभावी पथनाट्य सादर करुन जनजागृती केली. तसेच, तळाशेत-गौळवाडी या अंगणवाडीतील चिमुकल्या बालकांनी सफरचंद, शेवगा, संत्री, भेंडी, पपई, कलिंगड यांची वेशभूषा परिधान करुन फळे व पालेभाज्यांचे महत्व विषद केले. पोषण माह अंतर्गत विविध पथनाट्य सादर करुन नागरीकांची मने जिंकली. पुढच्या सत्रात पोषण माह कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी आहार प्रात्यक्षिकांची मांडणी करुन सर्व किशोरवयीन मुली, गरोदर माता, स्तनदा माता यांना आहाराचे महत्व स्पष्ट केले.

यावेळी तळाशेत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी पंदिरकर यांनी स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संबंधी मार्गदर्शन केले.

## पायी दिंडीचे कोलाडमध्ये स्वागत

**कोलाड :** हवामानाच्या बदलामुळे दिवसेंदिवस निसर्गाचा ऱ्हास होत चाललेला आहे. वातावरणाच्या आधी तापमानामुळे प्रदूषण, जंगलतोड, नैसर्गिक स्रोत कमी होणे, हानिकारक वायूचा अतिरेक यामुळे पर्यावरणावर दुष्परिणाम होऊ लागला आहे. समुद्रातील अद्रता कमी होऊ लागली आहे. यामुळे सागरातील जीवसृष्टी नाहीशी होऊ लागली आहे. याला वाचविण्यासाठी श्रीक्षेत्र मुंबई ते श्रीक्षेत्र नाणीजधाम पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या दिंडीचे शुक्रवारी (दि.१०) आगमन झाले. भविष्यकाळात जर जीवसृष्टी वाचावायची असेल तर वसुंधरा वाचवली पाहिजे, यासाठी या पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या दिंडीत झाडे लावून कशासाठी, मानव जातीच्या हितासाठी, वसुंधरा देते निवारा, फक्त येथील प्रदूषण आवरा, स्वच्छ समुद्र निसर्ग भगवंत करेल कृपानुग्रह, भाव असेल आपला देवावरी, प्रेम करावे वृक्षावरी, झाडे लावा, झाडे जगवा, प्रदूषणाचा विळखा आयुष्याचा नारा ओळखा, अशा घोषणा देण्यात आल्या. या दिंडीचे आयोजन लोकांपर्यंत जनजागृती करण्यासाठी करण्यात आले आहे.

# उरणमध्ये वाजणार नाटकाची घंटा



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

समृद्ध रंगभूमीची परंपरा लाभलेल्या उरण तालुक्यात नाट्य सादरीकरणाचे वारे वाहू लागले आहेत. लवकरच तिसरी घंटा होऊन नाटकाचा पडदा उघडणार आहे. तालुक्यातील अष्टगंध कला मंचाच्या वतीने 'आगरी पेठा' आणि 'पैशाने तुटली नाती' या नाट्य प्रयोगांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. याबाबतची घोषणा अष्टगंध कलामंचाचे सहसचिव रमेश कोळी यांच्या जन्मदिनानिमित्ताने भेंडखळ येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात करण्यात आली. आगरी पेठा ही नाट्यकलाकृती नाटककार रंजन कान्हा ठाकूर, तर पैशाने तुटली नाती ही कलाकृती हसुराम पाटील यांच्या लेखणीतून उतरली आहे. दरम्यान या नाटकाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी नाटककार धनेश्वर म्हात्रे यांच्यावर सोपाविली आहे. त्यांनी या नाट्य कलाकृतीचे दिग्दर्शन करण्याला होकार दिला आहे. आगरी रूढी परंपरांवर ही दोन्ही नाटके आधारित असून, आगरी बोलीभाषेचा गोडवा आणि तेवढाच तिखटपणा या आकृतीबंध नाटकातून प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे.

या नाटकात अशोक म्हात्रे, कृष्णकांत म्हात्रे, चेतन पाटील, नवनीत माळी, जयकिसन मोकल, दिगंबर कोळी, रमेश कोळी, प्रसाद कडू, रोशन घरत, परीशा सरोदे, वैशाली मोहिते, रुचिता म्हात्रे निकिता पाटील आदी कलाकार भूमिका बजावणार आहेत.

## वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा



**उरण :** पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे ठकूबाई परशुराम खारपाटील इंग्लिश मिडीयम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज चिरनेर, उरण जिल्हा रायगड येथे महाराष्ट्र शासन वनविभाग अलिबाग वनपरीक्षेत्र उरण व फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताह २०२५ साजरा करण्यात आला. यावेळी वन्यजीव छायाचित्र प्रदर्शन व वन्यजीव पुस्तक प्रदर्शनदेखील फॉन संस्थेतर्फे भरविण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये विविध विषारी, बिनविषारी सापांच्या छायाचित्रांच्या सोबत पक्षी, कीटक, उभयचर, पतंग, फुलपाखरे तसेच वेगवेगळे प्रकारच्या वन्यजीवांची फॉन संस्थेच्या स्वयंसेवकांनी काढलेली छायाचित्रे प्रदर्शनात दाखविण्यात आली.

# जयेश महाडिक यांना पुरस्कार

**कोलाड :** रोहा तालुक्यातील गोवे येथील प्राथमिक शाळेतील शिक्षक जयेश देवजी महाडिक यांना महाराष्ट्र आदर्श शिक्षक समितीकडून देण्यात येणारा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. रोहा तालुक्यातील द.ग. तटकरे हायस्कूल व जुनिअर कॉलेज कोलाड येथे रविवारी (दि.५) हा पुरस्कार सोहळा पार पडला. या पुरस्काराबद्दल जयेश महाडिक यांचे विविध स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य १२ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर २०२५

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### अडचणींवर मात कराल

**मेष :** हा सप्ताह कौटुंबिक जीवनासाठी चांगला असेल. तुम्ही तुमच्या घरातील छोट्या सदस्यांसमवेत वेळ घालवू शकता. चंद्राव्यतिरिक्त, शुक्र ग्रहाचे संक्रमण या आठवड्यात आपल्या नवम घरात असेल. शुक्र आपल्या सहाव्या आणि अकराव्या घराचा स्वामी देखील आहे, म्हणून या काळात आपले आरोग्य चांगले राहील. वडिलांसोबत काही मतभेद उद्भवू शकतात. म्हणून या मतभेदांचे निराकरण करण्यासाठी वडिलांसोबत मनमोकळेपणाने बोला. आठवड्याची सुरुवात तशी खूप चांगली असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही. यावेळी आपल्या बोलण्यात कठोरपणा दिसून येईल. जेणेकरून जवळचे लोक देखील आपल्यापासून दूर होऊ शकतात. पैशांचा विचारपूर्वक वापर करा. आपले भांडवल खर्च करण्याचा विचार करू नका. अन्यथा भविष्यात आपणास काही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधताना संयम ठेवा. वाईट परिस्थिती सुधारू शकते. **महिलांना–** या राशीच्या लोकांना त्यांच्या कार्यक्षेत्रात चांगली कामगिरी करता येईल, ज्यामुळे उत्पन्न वाढण्याची शक्यता आहे. **शुभदिनांक –** १२,१३.

### भरपूर यश मिळेल

**वृषभ :** या साप्ताहात कौटुंबिक जीवनातही सकारात्मक बदल घडतील. आपण लहान भावंडांसह चांगला वेळ घालवू शकता. जेव्हा आपल्या कुंडलीत वेगवेगळ्या ग्रहांचे संक्रमण असेल तेव्हा आपण अत्यंत महत्वाकांक्षी असाल. जे लोक ॲथलेटिक्स किंवा खेळात भाग घेणार आहेत, त्यांना या काळात भरपूर यश मिळू शकते. आठवड्याच्या शेवटी, चंद्र देव आपल्या चौथ्या घरात संक्रमण करेल. या संक्रमणामुळे आईबरोबर काही मतभेद उद्भवू शकतात. हे मतभेद दूर करण्याचा प्रयत्न करा आणि आपल्या आईशी उघडपणे बोला. तथापि, या राशीच्या काही लोकांना यावेळी जीवनाचा आनंद घेण्याची पूर्ण संधी मिळेल. **महिलांना–** आपण मनोरंजन साधनांवर मुक्तपणे खर्च करू शकता. आपण जर शुक्राची स्थिती पाहिली तर आपल्याला संततीबाबत चिंता असू शकते. त्यामुळे तुम्हाला मानसिक समस्येचा त्रासही सहन करावा लागू शकतो. अशा वेळी तुम्ही प्राणायाम वगैरेचा अवलंब करावा. यामुळे आयुष्यात चांगले बदल येतील. कोणालाही फसवू नका आणि नेहमीच सत्य बोला. फायदा होईल. **शुभदिनांक–** १४,१५.

### सकारात्मक बदल घडतील

**मिथुन :-** आठवड्याची सुरुवात तुमच्यासाठी चांगली असेल. तुमच्या चंद्राची स्थिती तुम्हाला बऱ्याच मानसिक त्रासांपासून मुक्त करेल. ज्यामुळे कौटुंबिक जीवनातही सकारात्मक बदल दिसून येतील. या घरात चंद्राच्या संक्रमणानंतर आपण आध्यात्मिक गोष्टींमध्ये देखील रस घेऊ शकता. आपला वेळ योग्य प्रकारे कसा वापरायचा याची आपण योजना देखील बनवू शकता. या कालावधीत, जे जातक नोकरी करतात किंवा व्यवसाय करतात त्यांना अत्यंत सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता आहे. कारण आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. यावेळी आपण कोणताही व्यवहार न केलेलेच आपल्यासाठी चांगले असेल. यासह, आपण सामाजिक पातळीवर देखील सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे, संभाषणादरम्यान शब्दांची काळजीपूर्वक निवड करा. **महिलांना–** या आठवड्यात मंगळ आपल्या बाजूने उभा राहणार आहे. म्हणून आपणास आर्थिक बाबींमध्ये सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता आहे. भविष्य सुधारण्यासाठी, कोणत्याही प्रकारची गुंतवणूक करण्यापूर्वी खूप विचार करा. **शुभदिनांक –**१६,१७.

### चांगले फळ मिळेल

**कर्क :** या सप्ताहात जास्त मसालेदार अन्न खाणे टाळा. अन्यथा यामुळे पोटाची समस्या उद्भवू शकते. आठवड्याच्या शेवटी, येणाऱ्या भावना, धैर्य व सामर्थ्य भाव देखील म्हणतात. त्यावेळी चंद्राच्या स्थितीनुसार आपण इच्छित परिणाम मिळवू शकता. ज्यांच्याकडून आपण अपेक्षा देखील केली नाही, अशा लोकांकडून आपण काही खास सल्ला मिळवू शकता. आपण सोशल मीडिया चालवत असल्यास आपली काही कंटेंट लोकांना आवडेल. चंद्राव्यतिरिक्त, शुक्र ग्रहाचे संक्रमण यावेळी या संक्रमणाचा विवाहित जीवनावर वाईट परिणाम होऊ शकतो, म्हणून सावधगिरी बाळगा. तथापि या राशीच्या व्यापाऱ्यांसाठी हे संक्रमण बऱ्याच चांगल्या संधी मिळवून देईल आणि व्यावसायिकांना लाभ मिळवण्याची संधी मिळेल. **महिलांना–** कौटुंबिक जीवनात या राशीतील लोकांना चांगले फळ मिळण्याची पूर्ण अपेक्षा आहे. या राशीतील लोक आपल्या घरच्यांसोबत या महिन्यात सामंजस्य बसवण्याचा पूर्ण प्रयत्न करतील. **शुभदिनांक –** १२,१७.

### सकारात्मक बदल होतील

**सिंह :** या लोकांना या साप्ताहात बऱ्याच क्षेत्रात आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. जसे की, या जातकांना करिअरच्या क्षेत्रात थोडे सांभाळून चालावे लागेल. कारण या महिन्यात आपण आपल्या कार्यक्षेत्रात आपले संयम सोडू शकतात आणि आपल्या टीममधील लोकांसोबत वाद करू शकतात. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा महिना थोडा विपरीत राहू शकतो. या महिन्यात तुमचे अभ्यासात मन लागण्यात समस्या येऊ शकतात. शिक्षकांच्या सहयोगाने तुम्ही बऱ्याच विषयात येणाऱ्या समस्या दूर करू शकाल. यावेळी तुम्हाला आपल्या पाठ्यक्रमातील अभ्यासात मन लावण्यात समस्यांचा सामना करावा लागू शकतो. शिक्षकांच्या सहयोगाने तुम्ही बऱ्याच विषयात येणाऱ्या समस्या दूर करू शकाल. **महिलांना–** प्रेम एक सुंदर अनुभव आहे. परंतु, जेव्हा प्रेमावर संशय किंवा गैरसमज जागा घेते आणि या गैरसमजांमुळे अलगाव स्थिती निर्माण होऊ शकते. अशा स्थितीतून बचाव करण्यासाठी तुम्हाला आपल्या व्यवहारात सकारात्मक परिवर्तन आणावे लागतील. **शुभ दिनांक –** १३,१५.

### समस्या दूर होतील

**कन्या :** यावेळी तुम्हाला किडनी आणि पोट संबंधित समस्या होऊ शकतात. म्हणून, तुम्हाला आपल्या खाण्या-पिण्याची आणि आपल्या दिनचर्येवर या सप्ताहात विशेष काळजी घ्यावी लागेल. नियमित सुर्योदयाच्या वेळी ॐ हनुमते नमः चा जप करा. या राशीतील जातकांसाठी हा सप्ताह सामान्य राहण्याची अपेक्षा आहे. यावेळी इतर ग्रह आपली राशी परिवर्तन करतील. जर व्यतीत झालेल्या वेळेत तुम्हाला आपल्या कार्यक्षेत्रात काही समस्या येत असेल तर, या महिन्यात त्या दूर होऊ शकतात. या महिन्यात तुम्हाला कार्यक्षेत्रात काही नवीन असाइनमेंट मिळू शकतात. ज्यामध्ये तुम्हाला आपल्या प्रतिभेला पाहण्याची संधी मिळेल. या असाइनमेंटवर तुम्ही पूर्ण मेहनतीने काम कराल. तसेच, या राशीतील काही जातक या साप्ताहात चांगल्या सॅलरीवर काही नवीन नोकरी प्राप्त करू शकतात. **महिलांना–** यावेळी तुम्ही आपल्या मुलांच्या शिक्षणावर पैसा खर्च करू शकतात. या सोबतच, जर तुमच्या घरात कुणाची तब्येत बरी नसेल तर, तुम्हाला त्यांच्यावर आपला पैसा खर्च करावा लागू शकतो. जर तुमचे मोठे भाऊ बहीण आहे तर, या महिन्यात तुमच्याकडून आर्थिक मदत मागू शकतात. **शुभदिनांक –** १२,१३.

### कार्यक्षेत्रात चांगले प्रदर्शन कराल

**तुळ :** या सप्ताहात कौटुंबिक जीवनात तुम्हाला आपल्या विवेकाचा वापर करून स्थिती सुधारावी लागेल. या कालावधीत मुलांसोबत कुठल्या गोष्टीला घेऊन वाद होऊ शकतात. कुटुंबासोबत वेळ व्यतीत करण्यासाठी ऑफिसमधून लवकर काम संपवून घरी लवकर पोहचण्याचा प्रयत्न या वेळेत करू शकतात. या राशीतील विद्यार्थ्यांना या सप्ताहात शिक्षणाच्या क्षेत्रात मनासारख्या फळांची प्राप्त होऊ शकते. या राशीतील जातकाचे प्रेम जीवन या वेळी मात्र प्रतिकूल राहू शकते. तुमच्या आरोग्य जीवनाची गोष्ट केली, तर या सप्ताहात तुम्हाला पोट आणि खांदादुखी समस्या होऊ शकतात. आपले आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी तुम्हाला यावेळी कमीत कमी यात्रा केली पाहिजे. नियमित सुर्योदयाच्या वेळी श्री लक्ष्मी नारायण आरतीचा जप करा. यावेळी ग्रहराशी परिवर्तन करण्यामुळे या राशीतील लोकांचे अनेक भाव सक्रिय अवस्थेत राहतील. **महिलांना–** या राशीतील महिलांबाबत करिअरच्या दृष्टीने पहिले असता या लोकांचा कालावधी शुभ राहील. निजी आयुष्यात तुम्ही बरेच आनंदी राहाल म्हणून, तुम्ही कार्य क्षेत्रात ही चांगले प्रदर्शन करू शकाल. **शुभदिनांक –** १४,१६.

### कुटुंबाचे समर्थन मिळेल

**वृश्चिक :** या सप्ताहात तुम्ही प्रत्येक कार्यात आपले सर्वश्रेष्ठ देण्याचा प्रयत्न कराल. जर तुमचं कोणीही नोकरी पेशात आहे तर, यावेळी त्यांना चांगल्या सॅलरीवर कुठल्या नवीन नोकरीचा प्रस्ताव मिळू शकतो. तसेच, या राशीतील काही जातकांच्या वडील, आईच्या कमाईमध्ये वृद्धी होण्याने घरातील आर्थिक स्थिती सुधारू शकते. तुमच्या आई वडिलांचे आरोग्य या महिन्यात खूप चांगले राहील. यामुळे तुम्ही बऱ्याच चिंतांनी मुक्त व्हाल. या सप्ताहात तुम्ही घरचांच्या सल्ल्याने नवीन गाडी किंवा बाइक खरेदी करू शकतात. या राशीतील विद्यार्थी विद्यार्थिनींना शिक्षणाच्या क्षेत्रात यावेळी आपल्या कुटुंबाचे पूर्ण सहयोग मिळेल. यामुळे तुम्ही ज्यांच्यावर प्रेम करतात त्यांच्या आईकडून या महिन्यात तुम्हाला समर्थन मिळू शकते. म्हणजे यावेळी काही गोष्टींना घेऊन ते तुमच्या जोडीदारापेक्षा तुमच्यावर विश्वास दाखवू शकतात. **महिलांना–** या कालावधीत तुम्हाला छातीदुखीची समस्या होऊ शकते. खासकरून, छातीच्या उजव्या बाजूच्या हिश्यामध्ये अधिक दुखापत होईल. तसेच, कंबरेच्या डाव्या बाजूलाही दुखणे असू शकते. नियमित एक ठरलेल्या वेळी महामृत्यूंजय मंत्राचा १०८ वेळा जप करा. **शुभदिनांक –** १५,१६.

### सुखद अनुभवाची प्राप्ती

**धनु :** या सप्ताहात आपल्या राशीच्या प्रत्येक व्यक्तीला वाटेल की, त्यांच्या करिअरचा ग्राफ लागोपाठ वर जात रहावा. तुमच्या इच्छाही अशाच आहेत की, तुमच्या कमाईमध्ये वृद्धी होईल आणि तुमची नोकरी व्यवस्थित चालत राहिल. तसेच या राशीतील जे जातक बेरोजगार आहे, त्यांना ही चांगली नोकरी मिळवण्याचे स्वप्न पाहत असतील. तर, आनंदित व्हा. या कालावधीत तुम्हाला आपल्या मनासारखी नोकरी मिळू शकते आणि तुमच्या कमाईमध्ये वृद्धी होऊ शकते. कमाईमध्ये वृद्धी होण्याने या कालावधीत तुमची बरीच थांबलेले काम पूर्ण होतील. कौटुंबिक जीवनात ही यावेळी तुम्हाला सुखद अनुभवाची प्राप्ती होईल. कुटुंबातील लोकांसोबत बसून तुम्ही खूप गप्पा करू शकतात. **महिलांना–** कुणी अल्प अवधीचे काम सुरु करू शकतात. यावेळी तुम्ही आपल्या प्रियकर/ प्रेयसीसोबत कुटुंबातील सदस्यांना न सांगता विवाह करण्याचा प्लॅन बनवू शकता. तथापि, या वेळी योग्य सल्ला असेल, हे करणे तुमच्यासाठी योग्य नाही. तुम्हाला विवाहाच्या आधी आपल्या घरचांसोबत चर्चा केली पाहिजे आणि त्यांना हे सांगायला हवे. **शुभदिनांक –** १७, १८.

### व्यवहारामध्ये सकारात्मक बदल

**मकर :** या राशीतील जातक दृढ इच्छा शक्तीचे मालक असतात. आपल्या या दृढ इच्छा शक्तीच्या बळावर तुम्ही या कालावधीत जीवनात सकारात्मक परिवर्तन आणू शकतात. करिअरच्या क्षेत्रात ज्या चांगल्या बदलाची तुम्ही कामना करतात ते बदल यावेळी येऊ शकतात. या बदलाचे कारणही तुम्हीच आहे. कारण, तुम्ही आपल्या व्यवहारामध्ये सकारात्मक परिवर्तन केले आहे आणि आपल्या वाणीमध्ये गोडवा आणला आहे. म्हणून, या साप्ताहात तुम्हाला याचा फायदा कार्यक्षेत्रात मिळू शकतो. या राशीतील जातकांच्या कमाईमध्ये या महिन्यात वृद्धी होईल, या कारणाने घरातील बरेच खर्च तुम्ही सहजरित्या पूर्ण करू शकाल. जर तुम्ही कुणावर प्रेम करता तर, या वेळी आपल्या घरातील प्रेम संबंधाच्या बाबतीत माहिती देऊ शकता. तथापि, तुमच्या भाऊ बहिणींमध्ये कुणाला तुमच्या प्रेम संबंधांनी चिंता होऊ शकते. **महिलांना–** या राशीतील धारकांना आपल्या माहेरून चांगली बातमी मिळेल. हातात पैसा खेळेल. कामात अचानक बरकत येईल. प्रवासात मात्र आपली तब्येत सांभाळा. **शुभदिनांक –** १२,१४.

### शिक्षणाच्या क्षेत्रात यश

**कुंभ :** या साप्ताहात विद्यार्थ्यांसाठी या कालावधीत शिक्षणाच्या क्षेत्रात सामान्य फळांची प्राप्ती होईल. जर तुम्ही शिक्षण घेण्याची इच्छा ठेवतात आणि शिक्षणाच्या क्षेत्रात यश प्राप्त करण्याची इच्छा आहे तर, तुम्हाला आपल्या मित्रांपासून थोडी दूरी ठेवली पाहिजे. तुमच्या प्रेम जीवनाची गोष्ट केली तर, या कालावधीत तुम्ही आपल्या जीवनसाथी सोबत पैशाने जोडलेल्या कुठल्या मुद्याला घेऊन भांडू शकता. तुमचा भाऊ किंवा बहिणींमुळे तुमच्या प्रेम संबंधात या महिन्यात समस्या येऊ शकतात. कुठल्याही प्रकारच्या आरोग्य समस्यांना दूर करण्यासाठी तुम्हाला डॉक्टरांकडे जाणे योग्य असेल स्वतःच घरगुती इलाज करणे टाळा. नियमित सुर्योदयाच्या वेळी सूर्य स्तुतीचा जप करा. **महिलांना–** तुम्ही शारीरिकदृष्ट्या बरेच फीट राहाल. कठीण परिश्रम आणि इमानदारीने तुम्ही या महिन्याच्या कार्यक्षेत्रात आपली नवीन ओळख बनवू शकतात. आपल्या घरातील काही मौल्यवान वस्तू विकण्याचा प्लॅन बनवत असाल आणि ते आतापर्यंत विकल्या गेल्या नसेल तर, या कालावधीत डील मिळू शकते. **शुभदिनांक –** १४,१५.

### कौटुंबिक परिस्थिती सुधारेल

**मीन :** या आठवड्यात सुरूवातीस चंद्रमाचे संक्रमण आपल्याला राशीसाठी नवीन ऊर्जा देणारे ठरेल. यावेळी, आपण आपल्या व्यवहाराने आपल्या आजूबाजूच्या लोकांवर देखील प्रभाव टाकू शकता. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही महत्वाची चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या पुढच्या टप्प्यात, चंद्राचे संक्रमण आपली कौटुंबिक परिस्थिती सुधारू शकते. वडील, आईबरोबरचे आपले संबंध सुधारतील. तथापि, आर्थिक बाजूबद्दल थोडे सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. जर आपण एखाद्याकडून कर्ज घेतले असेल तर ह्या काळात तो आपल्याकडे पैसे मागू शकतो. आपल्या इतर ग्रहस्थितीमुळे आपण घराचे नूतनीकरण करू शकता. आपल्या आरोग्याची काळजी घेणे देखील आवश्यक आहे. **महिलांना–**आठवड्याच्या शेवटी चंद्राचे संक्रमण वेगळ्या पद्धतीचे असल्याने आपल्या प्रेम प्रकरणांमध्ये अडचणी निर्माण होऊ शकतात. हा भाव शिक्षण आणि बुद्धिचा देखील आहे. म्हणून या राशीचे विद्यार्थी त्यांच्या तीक्ष्ण बुद्धीने बऱ्याच अडचणींवर मात करू शकतात. **शुभदिनांक –** १६,१८.

# खालापूर पोलिसांची धडक कारवाई

## • ३,३८३ किलो गांजा जप्त; अवैध धंदा करणाऱ्यांचे धाबे दणाणले



। खोपोली । प्रतिनिधी ।

कमी वेळात अमाप पैसा कमावण्याच्या नादात वेगवेगळे गोरख धंदे केले जात आहेत. त्यामुळे अनेक तरुणाई व्यसनाधीन होत चालली आहे. या व्यवसायाने अनेकांच्या संसाराची राख रांगोळी होत आहे. या पार्श्वभूमीवर खालापुर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. पोलिसांनी घोटीवली फाटा येथे मादकपदार्थांची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांच्या मुसक्या आवळल्या आहेत. त्यात त्यांनी ३,३८३ किलो ग्रॅम वजनाचा १ लाख २० हजार रूपये किंमतीचा गांजा जप्त केला आहे. या कारवाईने अनेकांचे धाबे दणाणले असून खालापुर पोलिसांच्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जुना मुंबई-पुणे रस्त्यावर घोडीवली फाटा येथे गांजा विक्री करण्यासाठी दोन व्यक्ती येणार असल्याची माहिती खालापूर पोलीस व गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली होती. यावेळी खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील हे सहकाऱ्यांसह त्या ठिकाणी असलेल्या पेट्रोल पंपावर दबा धरून बसले होते. त्यावेळी त्या ठिकाणी दोन व्यक्ती स्कूटीवरून गांजा विक्री करण्यासाठी आले असता दबा धरून बसलेल्या पोलिसांनी त्यांना पकडले. त्यावेळी त्यांच्याजवळ ३,३८३ किलो ग्रॅम वजनाचा १ लाख २० हजार रूपये किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे. तसेच आरोपीनी वापरलेल्या २ लाख रूपये किंमतीच्या दोन स्कूटी जप्त करण्यात आल्या आहेत. या आरोपींना १३ तारखेपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली असून त्यांनी गांजा कोठून आणला? त्यांचे इतर साथीदार आहेत का? याचा तपास खालापूर पोलिसांकडून सुरू आहे.



# वाजेकर विद्यालयातील मेळावा उत्साहात

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १२ वी कला शाखेचा विद्यार्थी, शिक्षक व पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बाबूराव पाटोळे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून या सभेचा उद्देश स्पष्ट केला. विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन कृष्णाजी कडू यांनी विद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या उज्ज्वल परंपरेचा आढावा घेत विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेत यश मिळावे, अशा शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांनी वाढत्या शहरीकरण आणि स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे मार्गदर्शन केले. त्यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच, बोर्ड परीक्षेसाठी अभ्यासाचे नियोजन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमाला वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अमोद ठक्कर यांची उपस्थिती होती.

# चौलमध्ये सुगम संगीतचा कार्यक्रम

**रेवदंडा** : चौल येथील मुखरी(मुख्य) गणपती मंदिराच्या सभागृहात सोमवारी (दि.६) पुण्यातील सानिया पाटणकर यांचा सुश्राव्य शास्त्रीय व सुगम संगीत गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. हा कार्यक्रम ज्येष्ठ नागरिक संघ चौलच्या रौप्य महोत्सवाचा भाग म्हणून सादर करण्यात आला. या कार्यक्रमाला चौलच्या रुपाली म्हात्रे यांनी आपल्या आई, वडीलांच्या स्मरणार्थ आर्थीक मदत केली. सुमारे अडीच तास चाललेल्या कार्यक्रमात शास्त्रीय संगीत, रागदारी, भजन, अभंग आणि सुगम संगीत सादर करून विदुषी पाटणकर यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांना हार्मोनियमची माधव लिमये, तबला अविनाश पाटील, गायन साथ नितीन महाबळेश्वरकर, अदिती नगरकर यांनी साद दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यात सर्व सभासदांनी खूप मेहनत घेतली.

# अलिबागच्या बाजारपेठांमध्ये चैतन्य संचारले

। अलिबाग । प्रतिनिधी ।

दिवाळी जवळ आल्यामुळे बाजारपेठांमध्ये पणत्या, आकाशकंदील, दिवे, तोरणे, रांगोळी, सजावटीचे साहित्य, मिठाई आणि इतर आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी होऊ लागली आहे. अलिबाग शहरातील मुख्य बाजारपेठेसह एसटी स्टॅण्ड परिसर, रायगड बाजार येथे विविध आकाराच्या, रंगीबेरंगी पणत्या, आकाशकंदील, रांगोळीचे ठसे बाजारात विक्रीसाठी दाखल झाले आहेत. नागरिक पारंपरिक पणत्या व आकाश कंदिलांना पसंती देत आहेत. त्याचप्रमाणे मातीच्या विविध आकाराच्या पणत्या, दिवे इतर राज्यातील विक्रेतेही अलिबागमध्ये दाखल झाले आहेत.

# पेशवाई मार्गाचे कॉँक्रीटीकरण होणार

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील दामत फाटक ते साई मंदिर कोल्हारे आणि बोर्ले ते माणगाव आंबिवली फाटक या पेशवे कालीन रस्त्याचे कॉँक्रीटीकरण कामाचा नुकताच शुभारंभ झाला. त्याचवेळी माथेरान-कळंब या राज्यमार्ग रस्त्याच्या कॉँक्रीटीकरण कामाचा देखील शुभारंभ करण्यात आला. दरम्यान, या तिन्ही रस्त्यांच्या कामासाठी १३७ कोटींचा निधी मंजूर झाला असून माथेरान-कळंब राज्य मार्गावरील हुतात्मा चौक ते पोही या १३ किलोमिटर लांबीच्या रस्त्याचे काम शासनाच्या हायब्रीड तत्वावर करण्यात येणार आहे.

नेरळची वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी प्रमुख प्रलंबित असलेला रस्ता दामत रेल्वे गेट ते आंबिवली रेल्वे गेट पेशवाई मार्ग रस्त्याचे कॉँक्रिटीकरण कामाचे काम मंजूर झाले आहे. त्याचवेळी माथेरान-नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील नेरळ हुतात्मा चौक ते पोही कळंब या रस्त्याच्या कॉँक्रीटीकरण कामाला मंजुरी देण्यात आली आहे. या तिन्ही कामांचा भूमिपूजन सोहळा नेरळ कोल्हारे येथील साई मंदिर नाका येथे आयोजित करण्यात आला होता. तर, नेरळ रेल्वे फाटक ते युवराज सोसायटी साई मंदिर या भागातील रस्ता देखील डांबरीकरण स्तरावर आहे. त्या ठिकाणी कॉँक्रीटीकरण केले जाणार आहे. या रस्त्यामुळे नेरळ बाजार पेठेमधील होणारी वाहतूक कोंडी देखील कमी होण्यास मदत होणार आहे. हा रस्ता पुढे कळंब जवळ शहापूर-कर्जत राष्ट्रीय महामार्ग यांना जोडला जाणार आहे. या भागात युवराज सोसायटी ते धामोते मंदिर या भागातील रस्ता कॉँक्रीटचा आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे वराठी, ता. रोहा, जि. रायगड येथिल .......**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री श्रीराम शिवराम म्हात्रे | ५५/५/ब/ २ | वरकस ०१-५६-५०<br>पो.ख. ००-०७-५०<br>एकुण ०१-६४-०० | १.०० | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. १२/१०/२०२५

सही
**अॅड. पी. जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं.४०२, बी-विंग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे डॉस्पिटल जवळ, ता. रोहा,
जि.रायगड पिन नं. ४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

# मिनीबस झाली सतरा वर्षांची

## सर्वसामान्य लोकांसाठी ठरतेय जीवनवाहिनी

। माथेरान । प्रतिनिधी ।



अनेक कठीण परिस्थितीत आणि विरोध पत्करून प्रसंगी दगडगोटे झेलत काही समाज कंटाकांकडून स्वतःची होळी होऊन सुद्धा माथेरान करांच्या सेवेत आजही नव्या जोमाने, दिमाखात कर्जत-माथेरान ही मिनीबस सेवा सर्वसामान्य लोकांसाठी स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने सुरू आहे. ११ ऑक्टोबर २००८ मध्ये मिनीबसची सुविधा उपलब्ध झाली. त्याला आज सतरा वर्षे पूर्ण झाली आहेत. जरी ही बस म्हातारी झाली असली तरीसुद्धा नवचैतन्य आणि जोशात प्रवाशांना सेवा देण्यास नेहमीच वेळेवर सज्ज असते. वयोमानानुसार त्यात अनेकदा तांत्रिक बाबी निर्माण होत असतात; परंतु, कर्जत आगारातील कर्मचारी वर्ग, आगार प्रमुख योग्य प्रकारे या बसची देखभाल, दुरुस्ती करून प्रवाशांना सुविधा उपलब्ध करुन देत आहेत.

माथेरानमध्ये स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने कर्जत-माथेरान दरम्यान शासनाची मिनीबस सुविधा निर्माण व्हावी, हे समस्त माथेरानकरांचे चार दशकांपासूनचे स्वप्न होते. परंतु, ही सुविधा उपलब्ध झाली तर त्याला मोठ्या प्रमाणावर विरोध होणार हे सुद्धा तितकेच खरे होते. त्यामुळे कुणीही राजकीय क्षेत्रातील नेतेमंडळी विरोध घेण्यास पुढाकार घेत नव्हते. अखेरीस तत्कालीन नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी कसलीही पर्वा न करता विरोध पत्करून राजकीय पक्षांचा आधार न घेता शासन स्तरावर वरिष्ठ अधिकारी वर्गाशी संपर्क साधून ही अत्यावश्यक सुविधा निर्माण केली. त्यामुळे सर्वसामान्य लोकांचे स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले. या सतरा वर्षात अनेक विद्यार्थ्यांना नेरळ-बदलापूर वा अन्य ठिकाणी जाऊन महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करता आले आहे. तर, नियमितपणे व्यवसाय करणाऱ्या व्यापारी वर्गाला खूपच सोयीचे झाले आहे.

> **“ माथेरान-कर्जत-माथेरान बस सेवा सुरू झाली. या घटनेला १७ वर्षे पूर्ण होत आहेत. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आपले शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी या बस सेवेचा सर्वाधिक लाभ झालेला आहे. विद्यार्थी, वयोवृद्ध, समस्त महिलावर्ग व सर्व माथेरानकरांना या बस सेवेमुळे हक्काचे व स्वस्त वाहतुकीचे साधन उपलब्ध झाले आहे. ही बससेवा माथेरानवासियांची जीवनवाहिनी ठरली आहे. ”**
>
> **– कल्पना पाटील,**
> **माजी मुख्याध्यापिका**

# सोमवारी होणार आरक्षण सोडत

। खोपोली । प्रतिनिधी ।

पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्यपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत सोमवारी (दि.१३) सकाळी ११ वाजता खालापूर पंचायत समितीच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात काढण्यात येणार आहे. त्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात असल्याची माहिती तहसिलदार अभय चव्हाण यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिली आहे. काही महिन्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आता घडामोडींना वेग आला आहे, काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषदेचे अध्यक्षपदाचे आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली होती. दरम्यान, त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्यांच्या आरक्षणाची सोडत सोमवारी जाहीर होणार असून खालापूर पंचायत समितीचे सभापतीपदाचे आरक्षण सर्वसाधारण पडले आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-आर्ढे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे-आर.-चौ.मी | रूपये | पैसे |
| के अॅन्टोनी मॅथ्यु | १२६ | १ | ०-२०-०० | ० | १९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-
**अॅड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक १२/१०/२०२५
मो.नं.९०२८९८२२७७

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
ई मेल :- adv.jayeshmhase@gmail.com

### नॉटिलस कॉ-ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड

पत्ता- मु.तळवली, पो.खंडाळे,
ता.अलिबाग जि.रायगड

### निविदा सूचना

नॉटिलस सोसायटी तळवली अलिबाग येथे खालील कामांसाठी वेंडरची आवश्यकता आहे.
१.लिफ्ट ची मासिक देखभाल दुरूस्ती
२.जिन्यांचे कठडे व रेलिंग यांची दुरूस्ती व पेंटींग
३.CCTV कॅमेरे देखभाल दुरूस्ती
४.स्विमिंग पूल देखभाल दुरूस्ती
५.इमारत सिव्हिल लिकेज् दोष दुरूस्ती
सोसायटी आवारात ०८ इमारती मिळुन २० विंग आहेत. इच्छुक वेंडरनी अधिक माहितीसाठी सोसायटीच्या कार्यालयात संपर्क साधावा.
मोबाईल : ७५५६६६५४२२, ७०२००८७६४९

**अध्यक्ष/सचिव**
**नॉटिलस कॉ-ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड**
**अलिबाग, रायगड**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी जमीन मालक

(१) श्री. सम्यक बाकलीवाल, यांच्या मालकी हक्कातील, ताबे कब्जातील व वहीवाटीतील मौजे दिघाटी (५५३५००), ता.पनवेल, जि.रायगड येथे सर्व्हे/गट क्रमांक ३६ हिस्सा क्रमांक.२, जमिनीचा वर्ग (प्रकार)-१, क्षेत्रफळ ० हेक्टर २० आर. ०० प्रति, (२००० चौ.मी.)
(२) श्री.बळीराम कृष्णा ठाकुर, यांच्या मालकी हक्कातील, ताबे कब्जातील व वहीवाटीतील मौजे साई (५५३५०२), ता. पनवेल, जि. रायगड येथे सर्व्हे/गट क्रमांक २४६ हिस्सा क्रमांक ६/ब, जमिनीचा वर्ग (प्रकार)-१, क्षेत्रफळ ० हेक्टर ६० आर. २० प्रति (६०२० चौ.मी.) यापैकी त्याच्या हिश्याचे विक्री क्षेत्र ० हेक्टर ४४ आर. ०० प्रति (४४०० चौ.मी.)

सदर जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील समझौताज्ञापन/विक्री करारनामा/साठेखत/खरेदीखत हे आमचे अशिल आणि जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे, त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या जमीन मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध म्हणजेच कोणत्याही व्यक्तीला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एलएलपी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवशक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही तर आमचे अशिल सदर जमिन मिळकतीसंदर्भातील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे.

सही : वकील अजीत व्ही. सिंह (खरेदीदारासाठी)
अजीत सिंह अॅण्ड असोसिएटस्
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ताः १६/१७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर- ११, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ०२२-२७५७ ६१४२/९८२०५२३०७७
ई मेल -ajeet_advocate@yahoo.co.in
दिनांकः १०/१०/२०२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक निशांत जयंत जोशी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे - मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हेआर-पॉ | आकार रु पै |
|---|---|---|---|
| १२६ | ३ | ०-१४-०० | ०- ११ |

वर नमूद मिळकतीपैकी खरेदी देणार यांचे मालकीचे अविभक्त ६ गुंठे क्षेत्रबाबत जाहिर नोटीस

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**अॅड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, ''लक्ष्मी सदन'', जुने एस. टी. स्टॅण्ड, मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिलांची खुद्द मालकीची व खुद्द ताबेकब्जाची मौजे बामणसुरे, ता.अलिबाग येथील गट क्र. ७०/२/३ क्षेत्र ०-२२-४० (हे. आर) आकार ६.२५ (रू. पैसे) पैकी उत्तर-पूर्व भागातील ०-१५-९० (हे.आर) क्षेत्राची मिळकत आहे. आमचे अशिलांच्या मिळकतीपैकी दक्षिणेकडील ०-०६-५० (हे. आर) एवढ्या क्षेत्रफळाची मिळकत सौ. अर्पिता उल्हास भोवर यांनी विकत घेतलेली आहे. त्या क्षेत्रामध्ये जा-ये करणेसाठी आमचे अशिलांनी उत्तर हद्दीवरून नऊ मीटर रूंदीचा रस्ता त्यांच्या मिळकतीमध्ये जा-ये करणेसाठी ते सदर क्षेत्राचे मालक असेपर्यंत वापरणेस दिलेला आहे व त्यापोटी आमचे अशिलांनी कोणतीही रक्कम स्वीकारलेली नाही. अशी वस्तुस्थिती असतानाही वर नमूद व्यक्ती वर नमूद केलेल्या रस्त्याच्या हक्कासह सदर क्षेत्राची मिळकत तिऱ्हाईत इसमांना विकू पाहात आहेत अथवा सदर क्षेत्राच्या मिळकतीं संदर्भात तत्सम प्रकाराने तिऱ्हाईत इसमांचा हक्क निर्माण करू पाहात आहेत, असे आमचे अशिलांस खात्रीलायक समजले आहे त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. तरी सौ. अर्पिता उल्हास भोवर यांच्या वर नमूद क्षेत्राच्या मिळकतीसंदर्भात कोणीही वर नमूद व्यक्तीबरोबर कोणत्याही प्रकारे हस्तांतरणाचा व्यवहार करू नये. तसा कोणताही व्यवहार कोणीही केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व तो न्यायालयीन कारवाईस पात्र राहील.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख : ११.१०.२०२५.

**(अॅड. सुरेंद्र नारायण जोशी)**
ए-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड,
अलिबाग, जिल्हा रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत, विद्यमान मिळकत मालक श्री.अरुण चार्लस फर्नांडिस यांच्याकडून जाणे-येणेच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याची बोलणी केली आहे.

**-:मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे सर्वे, ता. मुरुड, जि.रायगड येथील मिळकत.**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकारणी रु. पै |
|---|---|---|
| २१६/१ | ४४.५०.०० | ४४५.०० |

वरील वर्णन केलेली बिनशेती मिळकत, खुद्द मालकीची असून निर्वेध व बोजाविरहीत असलेबाबत मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, मालकी, दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, बक्षीस, बोजा, जाणे-येणेचा मार्ग वगैरे असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपली हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही व तो असल्यास आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला आहे असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

कळावे,
अलिबाग

दिनांक : /१०/२०२५

सही / -
**अॅड. रश्मी शिंदे**
सरिता सदन, जे.एस.एम कॉलेज रोड,
ता.अलिबाग जि.रायगड
मोबाईल नं. ८३८०८०८००२

### जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे कळंबुसरे, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे आशिल यांनी विद्यामान मालक व कब्जेदार यांचे कडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,

**मौजे कळंबुसरे तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथील**

| मालक | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) बाळकृष्ण गणपत पाटील<br>२) बळीराम गणपत पाटील | ९८ | ५ | ०-३४-४० | ३.१२ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे साठेकरार, खरेदीखत, कुळखत्यार पत्र, बक्षीस पत्र, गहाण खत, बयाणापावती, करारनामा अथवा इतर हक्क हितसंबंध अगर सदरील व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणारे यांचे कडे ही नोटिस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत नोंदवावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून सदरील व्यवहार पूर्ण केला जाईल. व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक ०९/१०/२०२५

येणेप्रमाणे जाहीर नोटिस

सही /-
Adv. Aysha Hyka Saleem
ऑफिस -४०१-४०५. आय विंग.
अरेंजा प्लाझा, प्लॉट नं.५२, सेक्टर १५,
सी.बी.डी. बेलापुर, ठाणे, नवी मुंबई ४००६१४
मो. नं. ८६९२०३८५६७

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : व्यावसायिक कार्यात यश मिळेल. आर्थिक स्थिती उत्तम राहील. किंमती भेटवस्तूची प्राप्ती होईल.
- **वृषभ** : महत्त्वाची कामं मार्गी लागतील. सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा वाढेल. जुनी येणी सहज वसूल होतील.
- **मिथुन** : कौटुंबिक जीवनात सुख-समाधान लाभेल. व्यवसायात उत्कर्ष होईल. विद्यार्थ्यांना संधी लाभेल.
- **कर्क** : प्रवासात मौल्यवान वस्तुंची काळजी घ्या. मन चिंताग्रस्त राहील. प्रेम प्रकरणात वाद टाळायला हवे.
- **सिंह** : कौटुंबिक कर्तव्याची पूर्तता होईल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. पर्यटनाचे बेत बऱ्यापैकी मार्गी लागतील.
- **कन्या** : प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष नको. महत्त्वाच्या योजना आकाराला येतील. मानसिक ताण राहील.
- **तूळ** : धावपळ, दगदग होईल. मुलांच्या प्रश्नांची चिंता राहील. स्थापत्य, कला क्षेत्रात प्रगतीला वाव मिळेल.
- **वृश्चिक** : आर्थिक बाबतीत दिलासा मिळेल. भागीदारी व्यवसायात प्रगती होईल. नव्या ओळखी लाभ देतील.
- **धनु** : वाद-विवादापासून दूर रहावं. नोकरीत बदली-बढतीच्या हालचाली होतील. कार्याचा विस्तार होईल.
- **मकर** : स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळेल. स्थावर प्रश्नांचा गुंता वाढेल. अनुभवींचा सल्ला लक्षात घ्यायला हवा.
- **कुंभ** : व्यावसायिक योजनांमध्ये यश मिळेल. राजकीय महत्त्वाकांक्षा वाढेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.
- **मीन** : वरिष्ठांचं उत्तम सहकार्य राहील. व्यवसायात नव्या संधी लाभतील. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.

## दिनविशेष

### १२ ऑक्टोबर

**१९०१ :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष थियोडोर रुझवेल्टने राष्ट्राध्यक्षीय निवासस्थानाचं नाव एक्झिक्युटिव्ह मॅन्शन बदलून 'व्हाईट हाऊस' असं ठेवलं.
**१९६७ :** थोर नेते राम मनोहर लोहिया यांचं निधन.
**२००२ :** दहशतवाद्यांनी इंडोनेशियातील बालीमध्ये दोन बारमध्ये घडवून आणलेल्या बॉंबस्फोटात २०२ जण ठार तर ३०० जण जखमी झाले.
**२०१३ :** ओडिशाच्या किनारपट्टीला 'फायलिन' चक्रीवादळाचा तडाखा. सात जणांचा बळी.

## आरोग्यमंत्र

### पंचतत्वांचे महत्व

आपलं शरीर पंचतत्वांपासून बनलेलं आहे. त्यात अंगठा हे अग्नीतत्व, तर्जनी हे वायुतत्व, मधलं बोट हे आकाशतत्व, अनामिका - पृथ्वीतत्व आणि करांगुली जलतत्व दर्शवते. शरीरातील वायु आणि रक्तसंचारामध्ये अडथळे आले तर आजार निर्माण होतात. शरीरातील रक्तप्रवाह आणि वायुप्रवाह या दोन्हीला मुद्रा मदत करतात. एकूण पाच मुद्रा महत्वाच्या समजल्या जातात. अगदी सहजपणे करता येणाऱ्या मुद्रा कधीही केल्या तरी चालतात. १. ज्ञानमुद्रा- या मुद्रेत अंगठा आणि तर्जनीचा अग्रभाग एकमेकांना स्पर्श करतात.



दोन्ही हातांनी ही मुद्रा करून डोळे बंद करून बसावे. इतर तीन बोटे सरळ ठेवावीत. या मुद्रेमुळे मानसिक एकाग्रता आणि स्मरणशक्ती वाढते. डोकेदुखी आणि रागाच्या नियंत्रणासाठी उपयुक्त आहे. निद्रानाशासाठी या मुद्रेचा लाभ होतो. २. वायु मुद्रा करताना तर्जनी अंगठ्याच्या मुळाशी ठेवून त्यावर अंगठा ठेवावा. इतर तीन बोटे सरळ ठेवावीत. या मुद्रेमुळे मान, सांधे आणि गुडघेदुखी कमी होण्यासाठी मदत होते. संधीवातावर उपयुक्त ठरते. सायटीका आणि पक्षाघात तसंच रक्ताभिसरणातील दोष दूर होण्यासाठी लाभदायक आहे. ३. सूर्यमुद्रा अनामिका वाकवावी तिच्या पहिल्या पेरावर अंगठा ठेवावा. इतर तिन्ही बोटं सरळ ठेवावीत. या मुद्रेमुळे वजन कमी होण्यास मदत होते. पचनसंस्था सुधारते. अस्थमा आणि टी बी वर ही मुद्रा लाभदायक ठरते. मानसिक ताणतणाव दूर करण्यासाठी या मुद्रेचा फायदा होतो.

## जगा वर्तमानात

### आनंदाचा क्षण

आनंद निर्माण करणं हे खरं म्हणजे अगदी सोपं आहे. कितीतरी लहान लहान आणि साध्या गोष्टीमधून घरात आनंद निर्माण होऊ शकतो. इतरांनी केलेल्या एखाद्या चांगल्या गोष्टींचे कौतुक, मधुर आणि गोड शब्द , घरातल्या मोठ्या माणसांशी त्यांच्या प्रकृतीविषयी दोन वाक्यांची चौकशी यासारख्या छोट्या गोष्टी वातावरण बदलून टाकतात. खरं तर आयुष्य फार लहानसं आहे. लहानपण तर न कळताच संपून जातं. तारुण्य पहाता-पहाता प्रौढत्वात मिसळून जातं. जबाबदारीचे मणी ओढता-ओढता वृद्धत्व आलेलंही कळत नाही. अचानक मागे वळून पाहिल्यावर आपण म्हणतो, 'अरे बापरे ! हा एवढा काळ कसा गेला ते कळलंसुद्धा नाही.' तुमच्या मनात असो वा नसो, काळ तर पुढे सरकणार आहेच. घडून गेलेल्या घटना, प्रसंग तर आपण बदलू शकत नाही आणि पुढं काय घडणार आहे हे देखील आपल्याला माहीत नाही. अशा परिस्थितीत जर फक्त आत्ताचाच क्षण आपल्या हातात असेल तर तो आनंदात घालवणे हेच श्रेयस्कर नाही का?

## महत्त्वपूर्ण काही...

### उपग्रहांच्या गर्दीतून...

विविध देशांचे कृत्रिम उपग्रह फिरत असल्यामुळे सध्या पृथ्वीभोवती त्यांची गर्दी झाली आहे. पण १९५७ मध्ये 'स्फुटनिक' हा उपग्रह सोडला गेला त्याआधी मात्र पृथ्वीला एकच उपग्रह होता, तो म्हणजे चंद्र. स्फुटनिक हा रशियाने सोडलेला पहिला कृत्रिम उपग्रह होय. यानंतर मात्र झपाट्याने प्रगती होत गेली. १९६२ मध्ये 'टेलस्टार' या उपग्रहाने अटलांटिक सागरावरून पलीकडे दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम पोहोचवले. यानंतर दळणवळणासाठी उपग्रहांचा सर्रास उपयोग सुरू झाला. भारतात दूरचित्रवाणीचं जाळं सर्वदूर पोहोचवण्याचं काम 'इन्सॅट' च्या मालिकेनं केलं आहे. असे जिओस्टेशनरी या प्रकारचे उपग्रह ३,६०,००० किलोमीटर उंचीवरून पृथ्वीभोवती भ्रमण करतात. त्यांचा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याचा काळ आणि पृथ्वीचा स्वतःभोवती फिरण्याचा काळ सारखाच असतो, त्यामुळे हे या उंचीवर एकाच ठिकाणी असल्याप्रमाणे दिसतात. याचाच फायदा घेऊन या उपग्रहाच्या कक्षेतील सर्व शहरांकडे एका ठिकाणाहून पाठवलेले संदेश प्रक्षेपित केले जातात.

## पंचांग

**रविवार १२ ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, अश्विन कृष्ण ६, चंद्रराशी : मिथुन, योग : वरियान्र, नक्षत्र : मृगशीर्ष, सूर्योदय : ६.३४, सूर्यास्त : ६.१६

## फॉरवर्डस

**ज़ो महसूस करतें हैं वहीं बयाँ क़र देतें हैं...**

**हमसें लफ़्ज़ों क़ी दग़ाबाज़ी नहीं होतीं...!**

## सफर देशांची

ऑस्ट्रेलिया हा लोकरीच्या उत्पादनातला एक अग्रणी देश आहे. या देशात दर्जेदार लोकरीचं उत्पादन घेतलं जातं. तुम्हाला माहीत आहे, ऑस्ट्रेलियात एका वर्षात उत्पादित होणारी लोकर एकत्र केली आणि त्यापासून स्कार्फ बनवला तर त्याची लांबी किती होईल? मंडळी हा स्कार्फ आपल्या पृथ्वीला १०० वेळा गुंडाळता येईल इतका मोठा असेल... या एका उदाहरणावरुनच या देशात निर्माण होणाऱ्या प्रचंड प्रमाणावरील लोकर उत्पादनाचा अंदाज बांधणं शक्य आहे, नाही का...

## करिअरवाटा

### टॉय डिझाईनिंगचं करिअर

शालेय साहित्याबरोबरच विविध प्रकारचे खेळ मुलांच्या प्रगतीला पोषक ठरतात. त्यामुळेच खेळण्यांद्वारे मुलांच्या विचारक्षमतेला दिशा देण्याचा प्रयत्न केला जातो. खेळण्यांचा बाजार तेजीत असण्यामागे हे एक कारण आहे. तज्ज्ञांच्या मते हा बाजार दर वर्षी दहा ते पंधरा टक्क्यांनी वाढत आहे. त्यादृष्टीने कारकिर्दीचा विचार करताना हे क्षेत्र दुलर्क्षित करू नये. खेळ डिझाईन करणं आणि प्रत्यक्ष उत्पादनात सहभागी होणं या दोन टप्प्यांमध्ये कारकिर्दीला चालना मिळेल. तुम्ही टॉय डिझाईनिंगमध्ये रुची दाखवत असाल तर शास्त्रीय दृष्टीनं खेळणी बनवायचा अभ्यासक्रम निवडायला हवा. टॉय डिझाईनिंग हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहे. चार ते सहा महिने बेसिक ट्रेनिंग आणि त्यानंतर दीड वर्षाचा डिप्लोमा कोर्स याद्वारेही हा अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. या अभ्यासक्रमात प्लास्टिक किंवा विविध प्रकारच्या धातू अथवा साहित्यापासून खेळणी डिझाईन करण्याचं प्रशिक्षण दिलं जातं. मात्र त्यासाठी चित्रकला चांगली असणं, स्केचिंग, संगणकाचं मुलभूत ज्ञान आवश्यक आहे. खेळणी तयार करताना मुलांचं भावविश्व समजावून घेण्याची हातोटीही असावी.



## खेचाखेची

### धोबीपछाड

**पत्नी :** अलीकडे चोऱ्या फार व्हायला लागल्या आहेत.
**पती:** का? काय झालं?
**पत्नी :** धोब्यानं आपले दोन टॉवेल चोरले. नेले आणि परत दिलेच नाहीत.
**पती :** कोणते टॉवेल्स?
**पत्नी :** तेच ते, आपण मनालीच्या हॉटेलमधून आणले होते ते.....!!

## वेगळं काही

मधमाशीचं पोळं खाणारा एक किटक प्लास्टिकही खाऊ शकतो असं केंब्रिज विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. हा किटक मधमाशीचं पोळं पचवू शकतो. त्याचप्रमाणे तो प्लास्टिकही पचवू शकतो, असं संशोधनातून समोर आलं आहे. 'गॅलेरिया मेलोनेला' असं या किटकाचं नाव आहे. हा किटक एखाद्या अळीसारखा दिसतो. हा किडा तासाभरात प्लास्टिकची पिशवी खाऊ शकतो. केंब्रिज विद्यापीठातले डॉक्टर पाओलो बॉम्बेली या संशोधनाचे प्रमुख आहे. या किड्याचं तंत्र जाणून घेतलं तर प्लास्टिक नष्ट करण्याचं तंत्रज्ञान आपण निर्माण करू शकू. यामुळे प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदुषणाचं आव्हानाला सामोरं जाता येईल, असं त्यांचं म्हणणं आहे. हे चित्र आशदायी आहे.

## महिलायन

### विसरा जुनं नातं

मी दोन वर्षं परदेशात राहून नुकतीच भारतात परतले आहे. मोजक्या नातेवाईकांच्या उपस्थितीत रजिस्टर मॅरेज करुन मी परदेशी गेले होते. मात्र अलिकडेच पतीच्या चुलत भावाला भेटले आणि अवाक झाले कारण तो माझा एक्स बॉयफ्रेंड आहे. त्याच्या आई-वडिलांचा कडवा विरोध असल्यामुळे आमचं लग्न होऊ शकलं नव्हतं. आता प्राप्त परिस्थितीला मी कसं तोंड देणार हा प्रश्न आहे. आमच्यातलं जुनं नातं समजलं तर माझ्या पतीची आणि त्याच्या पत्नीची काय प्रतिक्रिया असेल या विचारानेही मी घाबरले आहे. काय करु?



- भूतकाळ अशा विचित्र पद्धतीने समोर आल्यास त्याला सामोरं जाण्याखेरीज पर्याय नसतो. त्यामुळे आधी तू स्वत:ला सावर आणि पतीला विश्वासात घेऊन वस्तुस्थिती समोर मांड. आता तुमच्यामध्ये कोणतेही संबंध नसल्याची त्याची खात्री पटायला हवी. किंबहुना, तुम्ही दोन जोडप्यांनी एकत्र येऊन गतकाळातल्या नात्यावर पडदा टाकून पुढे जाण्याचा निश्चय करायला हवा. जुनं नातं विसरुन पुढे जावं हे उत्तम.

## सुडोकू १६


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | ३ | ६ | | | | ५ | ९ |
| | | ९ | ३ | ५ | | | | |
| | | ५ | | | | १ | ६ | |
| ६ | | | | | ४ | | ८ | |
| ३ | | | | | | | | ५ |
| | ७ | | ८ | | | | | २ |
| | ८ | १ | | | | २ | | |
| | | | | ४ | ३ | ९ | | |
| ९ | ३ | | | | ६ | ५ | | १ |

**टीप -**
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १५चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | १ | ५ | ७ | ९ | ४ | ८ | ६ |
| ७ | ६ | ८ | ४ | २ | ३ | १ | ५ | ९ |
| ४ | ९ | ५ | १ | ६ | ८ | ३ | ७ | २ |
| ९ | ४ | ३ | ७ | १ | ६ | ५ | २ | ८ |
| ६ | १ | २ | ८ | ३ | ५ | ७ | ९ | ४ |
| ८ | ५ | ७ | ९ | ४ | २ | ६ | ३ | १ |
| १ | २ | ६ | ३ | ९ | ७ | ८ | ४ | ५ |
| ३ | ८ | ४ | २ | ५ | १ | ९ | ६ | ७ |
| ५ | ७ | ९ | ६ | ८ | ४ | २ | १ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १६



**आडवे शब्द :-**
१) पर्वत
३) धाक, भीती
५) आचारी
८) भेग, चीर
९) सततचे नामस्मरण
१०) क्षुद्र नीच, तेजोहीन खुंटी
१२) एक फळ
१३) नशेमुळे डोळे धुंद होणे
१५) कबूतर
१८) सुंदर तरुणी
२१) नम्र, वाकलेला
२२) वर्ण
२३) ✲✲✲ गोटा, तीव्र रेचक
२६) केव्हा (ग्रा.)
२७) साहित्यातील नऊ भावना
२८) तराजू
३०) रानटी
३२) पराग
३४) मुक्तता
३५) एकरूपता
३८) रंग
३९) पंख,
४०) विविध
४२) कमी, न्यून
४३) मृत्तिका
४५) अवस्था
४७) भांडण
४८) जप्ती
५०) कप्पा, खण
५२) कवी
५५) रजनी, रात्र
५७) ग्राम, नगर
५८) नवऱ्याचा भाऊ
६०) फाटलेला
६२) बूड
६३) धातूचा धागा
६५) इच्छा
६६) दोन मैलाचे अंतर
६७) खवा
६८) शेव, चिवडा, गाठी यांचे मिश्रण
६९) घागरा
७०) मांस

**उभे शब्द :-**
१) दृष्टी
२) वावडी
३) माल साठविण्याची जागा
४) अलमारी
५) खार - एक प्राणी
६) शर्करा
७) संगीतातील एक राग
८) शोभणारा
११) सापाची एक जात
१४) चालू काळ
१५) जल
१६) रात्रीचा पाऊस
१७) मेहनत, श्रम, त्रास
१९) तामिळनाडू राज्याचे पहिले नाव
२०) पवित्र
२१) नाकाला खड्डा असलेला
२४) अल्प, थोडे, बारीक केस
२५) शिकारीसाठी हेरलेला प्राणी
२९) बांगड्यांचा व्यवसाय करणारी जमात
३०) अरण्य
३१) गणितावरील भास्कराचार्यांचा ग्रंथ
३२) वर्तमानपत्रातील स्तंभ
३३) आजोबा (सं.)
३४) परमेश्वर
३६) घाण
३७) संपूर्ण
३९) आपला नसलेला
४१) सर्प
४३) जाणकार
४४) बोकड
४६) होडी
४७) तंबूची कापडी भिंत
४८) पावसाची झड
४९) धपाटा
५१) तुरुंगवास
५३) गेरु
५४) केशवृद्धीची सुगंधी वनस्पती
५६) सुटकेचा मार्ग
५९) पती, रमणारा
६१) रेशीमाचे जाडसर कापड
६२) लोकनाट्य
६३) दरवाजा
६४) मयूर
६६) चंद्राची कड

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



**पहिल्या कादंबरीपासून मी एस. एल. भैरप्पांची वाचक आहे. मराठीमध्ये त्यांच्या कादंबऱ्यांचे भाषांतर करणारी उमा कुलकर्णी ही माझी लहानपणापासूनची मैत्रीण. तिच्यामुळे अनेकदा प्रकाशित होण्यापूर्वीच मला त्यांच्या कादंबऱ्या वाचायला मिळाल्या आहेत. त्यामुळे लेखक म्हणून ते चांगलेच परिचित आहेत. आज देहरुपाने ते आपल्यामध्ये नाहीत. पण त्यांचे लेखन पुढच्या अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.**

# कादंबरीमध्ये हरवलेला माणूस



डॉ. तारा भवाळकर

एस. एल. भैरप्पा यांच्या निधनाची वार्ता साहित्यप्रेमींना दुःख देऊन गेली. त्यांच्या नसण्याने साहित्यविश्वाचे किती मोठे नुकसान झाले आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. लेखनासाठी कादंबरी हा साचा निवडणारे भैरप्पा तत्वज्ञानाचे प्राध्यापक आणि अभ्यासक होते. कुटुंबात घडलेल्या विपरित प्रसंगांना तोंड देत ते लहानाचे मोठे झाले. लहानपणीच आईचे छत्र हरवले. पंधराव्या वर्षीचे असताना रानात नेऊन आपल्या अवघ्या पाच वर्षांच्या लहान भावावर अंत्यसंस्कार करण्याचा प्रसंगही त्यांच्यावर आला. असे विविध प्रकारचे दुःख भोगत एका अर्थी जगण्याकडून तत्वज्ञानाकडे आणि तत्वज्ञानाकडून जगण्याकडे त्यांचा सतत प्रवास होत राहिलेला आपल्याला दिसतो. पुढे शिक्षणामध्येही अनेक अडथळे आले. तरीदेखील त्यांनी शिक्षण पूर्ण केले. पदवी घेतलीच, त्याचप्रमाणे डॉक्टरेटही घेतली. १९५८ च्या आसपास त्यांनी लेखनाला सुरूवात केली. 'वंशवृक्ष' ही त्यांची पहिली कादंबरी. या कादंबरीने कन्नड साहित्यात मोठे वादळ निर्माण केले. त्या वेळचे उदयोन्मुख आणि नामांकित लेखक, नाटककार गिरीश कर्नाड यांनी त्यावर एक चित्रपटही काढला. त्यात स्वतः काम केले. मात्र पुढील काळात गिरीश कर्नाड, लेखक अनंत मूर्ती यांच्या आणि भैरप्पांच्या विचारसरणीमध्ये अंतर निमर्ण होत गेले. यातून त्यांनी एकमेकांवर केलेली टीकाही आपण जाणतो. असा सगळा इतिहास बराच मोठा आहे.

पहिल्या कादंबरीपासून मी भैरप्पांची वाचक आहे. याचे कारण मराठीमध्ये त्यांच्या कादंबऱ्यांचे भाषांतर करणारी उमा कुलकर्णी ही माझी लहानपणापासूनची मैत्रीण. तिच्यामुळे अनेकदा प्रकाशित होण्यापूर्वीच मला भैरप्पांच्या कादंबऱ्या वाचायला मिळाल्या आहेत. त्यांना प्रत्यक्ष भेटीचा योग काही आला नाही. त्यामुळे व्यक्ती म्हणून त्यांचा परिचय नाही. मात्र लेखक म्हणून ते चांगलेच परिचित आहेत. आधी उल्लेख केल्याप्रमाणे अखेरपर्यंत त्यांनी कादंबरी हाच लेखनाचा साचा कायम ठेवला. त्यांना अनेक पुरस्कार मिळाल्याचे आपण जाणतो. त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्यांमध्ये 'दुभंग'चा उल्लेख करावा लागेल. यात त्यांनी सोसलेले दारिद्र्य दिसते. त्यांच्या 'वंशवृक्ष' या कादंबरीने मराठी वाचकांना चांगलेच बांधून ठेवले. बऱ्याच कादंबऱ्यांची मराठीत भाषांतर झाल्यामुळे तेदेखील, मी कन्नडपेक्षा मराठी वाचकांना अधिक परिचित आहे, असे म्हणत असत. महाराष्ट्रात त्यांचे सतत जाणे-येणे होते. काही दिवस ते मुंबईमध्ये रहायला होते. त्यांनी सुरूवातीच्या काळात सयाजीराव गायकवाड यांच्या कॉलेजमध्ये अध्यापनाचे काम केले होते. त्यामुळेच त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील वाचकांनाही मोठा धक्का बसलेला आपण पाहिला.

त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्यांपैकी एक म्हणजे 'पर्व'. मला स्वतःला ती खूप आवडली. विशेषतः यातील शेवटचे प्रकरण मला भावले. यात त्यांनी महाभारत युद्धाचा शेवटचा काळ चित्रित केला आहे. हे सगळे वर्णन खरोखर अंगावर काटा आणणारे आहे. महत्त्वाचे म्हणजे यातून आपल्या जीवनाची नश्वरता आणि भीषणता प्रामुख्याने समोर येते. आपण भीष्मांना पितामह म्हणून वंदनीय, पूजनीय मानतो. पण या प्रकरणात त्यांच्या माध्यमातून निसर्गाच्या दरबारात एक माणूस म्हणून शरीराची होणारी विकलांगता लेखकाने अत्यंत परखडपणे मांडली आहे. या प्रकरणात भैरप्पांनी केलेले महायुद्धाचे वर्णन, नंतरची पडझड आणि विविध पातळीवरील माणसासमोर येणाऱ्या दुःखाचे स्वरुप आपल्यालाही अंतर्मुख करुन जाते. राजपदावर असणारी व्यक्ती असो की सामान्य शिपाई, सगळ्यांना दुःखाचा सामना करणे ही बाब अपरिहार्य आणि अटळ असते हे यातून अधोरेखित होते. जगाच्या पाठीवर झालेल्या सगळ्या महायुद्धांचा इतिहास पाहिला, वर्णने वाचली तरी हेच जाणवते. दुसऱ्या महायुद्धाचा काळ, हिटलरने केलेला छळ, विषारी वायूने मारलेले जीव हे सगळेच आपण विविध माध्यमांतून जाणले आहे. समजून घेतले आहे. खरे तर कथा-कादंबऱ्यांमधून वा चित्रपटातून दाखवलेल्या या गोष्टी बघून जगातील क्रौर्य कमी व्हायला हवे होते. भैरप्पांसारख्या लेखकांनी आपल्या लेखणीतून जनांना या अर्थाने शहाणे करण्याचा प्रयत्न केला आहे. पण दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही.

भैरप्पा यांची गाजलेली आणखी एक कादंबरी म्हणजे 'आवरण'. यामध्ये त्यांनी आधुनिक विश्व चित्रीत केले आहे. यावर पुरोगामी लोकांचा बराच आक्षेप येत राहिला. डाव्या-उजव्या बाजूने चर्चा झाली. मात्र भैरप्पांनी माणसाच्या जीवनातील सगळी उलथापालथ प्रत्यक्षातही अनुभवली होती आणि तत्वज्ञानाच्या अभ्यासातून अभ्यासलीही होती. यातून आलेले महत्त्वपूर्ण विचार त्यांच्या लेखणीतून समोर येत होते. एकंदरच त्यांच्या लेखनात इतिहास, समाजशास्त्र, पुराण, मानववंशशास्त्र आणि मानसशास्त्र या सर्वांचे एकत्रीकरण दिसून येते. माझ्या मते, कोणत्याही विषयाचा एकरेषीय विचार करुन आपल्याला त्या विषयाचे नेमके भान येत नाही तर आंतरज्ञानशाखीय चिंतन करुन केलेली मांडणी असेल तरच जीवनाचे सगळे पैलू उलगडतात. भैरप्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये मला हा घटक महत्त्वाचा वाटतो. अशा विचारातून लेखन होते तेव्हा स्वाभाविकच तो केवळ मनोरंजनाचा भाग राहत नाही तर माणसाला अंतर्मुख करणारा, चिंतनशील बनवणारा भाग ठरतो. जीवनावर गांभिर्याने विचार करण्याची प्रवृत्ती अशा कादंबऱ्यांमधून दिसते. भैरप्पांच्या कादंबऱ्या हे याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणाव्या लागतील.

त्यांच्याच नव्हे तर दक्षिणेकडील सगळ्याच लेखकांबाबत मला ही बाब जाणवते. मराठीमध्ये मात्र हे गांभीर्य फारसे दिसत नाही. मुळातला, भारतीय माणसाच्या मातीतला विचार म्हणता येईल असे लेखन, भारतीय तत्त्वज्ञानाच्या चिंतनातून आलेले विचार दक्षिणेतील सगळ्या लेखकांनी मांडलेले दिसतात. गिरीश कर्नाडांपर्यंतच्या काळाचा विचार केला तर ही बाब प्रकर्षाने जाणवते. मात्र असा विचार महाराष्ट्रात केलेला दिसत नाही. इंग्रजोत्तर काळात जणू दुफळी निर्माण झाली आणि लोकजीवन तसेच अभिजन जीवन वेगवेगळे असल्याचे विचार प्रबळ झाले. कदाचित त्याचा हा प्रभाव असावा. म्हणूनच आंतरज्ञानशाखीय चिंतनात्मक मांडणी मला महत्त्वाची वाटते.

भैरप्पा यांच्या 'उत्तरकांड' या कादंबरीचा उल्लेख मी आवर्जून करेन. त्यांनी 'पर्व'मध्ये महाभारतावर लेखन केले तर रामायणावरील त्यांचे लेखन 'उत्तरकांड'मध्ये दिसते. रामाने सीतेचा त्याग केला. तिची मुले स्विकारली, त्यांना राज्यावर बसवले पण शीलावरुन लोकांनी आक्षेप घेतल्यामुळे रामाने तिला मात्र बाजूला टाकले. त्यानंतर ती परत रामाकडे गेली नाही. रामायणाचा आधार घेत भैरप्पा यांनी या कादंबरीमध्ये रामायणातील या उत्तरकाळाचा वेध घेतला आहे. माझ्या प्रवृत्तीला आणि अभ्यासाला जवळचा असल्यामुळे हा विषय अधिक महत्त्वाचा वाटतो. अलिकडेच लोकपरंपरेतून समजलेली सीता मी 'सीतायन' मध्ये मांडली आहे आणि 'उत्तरकांड'मध्ये भेटणारी सीता याला समांतर जाणारी आहे. उमा कुलकर्णीने भैरप्पांशी बोलताना माझ्या या लेखनाची कल्पना दिली होती. तेव्हा त्यांनी 'सीतायन'चे भाषांतर तू कन्नडमध्ये कर, असे म्हटले होते. तेव्हा प्रत्यक्षात भेट न होता हे त्यांच्याकडून मिळालेले प्रशस्तीपत्रक आहे, अशीच माझी भावना आहे.

देह नश्वर असतो. निसर्गनियमाप्रमाणे भैरप्पा देहरुपाने आज आपल्यात नाहीत. पण चिंतन, लेखनातून ते पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शन देत राहतील यात शंका नाही. त्यांना विनम्र आदरांजली.

(शब्दांकन: स्वाती पेशवे)

**एस. एल. भैरप्पा यांना मिळालेले काही महत्त्वपूर्ण पुरस्कार**

- भारत सरकारकडून पद्मश्री पुरस्कार, २०१६
- आसाम साहित्य सभेचा मामोनी रईसोम गोस्वामी राष्ट्रीय साहित्य पुरस्कार, २०१६
- म्हैसूर विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट, २०१६
- भारत सरकारकडून साहित्य अकादमी फेलोशिप, २०१५
- २०१५ मध्ये म्हैसूर विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट
- बेतागेरी कृष्ण शर्मा पुरस्कार, २०१४
- दीनानाथ मेमोरियल फाउंडेशन, मुंबईकडून वाग्विलासिनी पुरस्कार, २०१२
- बिर्ला फाउंडेशनकडून 'मंद्र' या कादंबरीसाठी सरस्वती सन्मान, २०११
- गुलबर्गा विद्यापीठामधून मानद डी.लिट, २००७
- हेडगेवार पुरस्कार (कलकत्ता), २००७
- एनटीआर पुरस्कार (आंध्र प्रदेश), २००७
- कर्नाटक सरकारी मुक्त विद्यापीठ, म्हैसूरकडून मानद डी.लिट., २००५
- पंपा प्रशस्ती (कर्नाटक राज्य) पुरस्कार, २००६

# कोकणच्या लाल मातीतील दिवाळी

धनंजय शेटये

'दिवाळी' आणि 'पोह्यांचा सुगंध' आणि आत्मियतेच्या स्नेहबंधाच्या नात्यांचा सोहळाच!

कोकणच्या या लाल मातीत रुजलेल्या आमच्या बालपणीच्या, नव्वदीच्या दशकातील दिवाळीचा उल्लेख करताच मन भूतकाळाच्या अंगणात हरवून जातं. तो काळ म्हणजे साधेपणाचं आणि समाधानी गरिबीचं सोनेरी युग होतं, जिथे गरजा कमी आणि आयुष्यातील आनंद मात्र गगनाला भिडलेला होता. आमच्यासाठी, दिवाळीच्या फराळाची व्याख्या केवळ 'पोहे' एवढीच होती. बाकी कुठला फराळ असतो, याची कल्पनाही मनाला शिवत नसे; कारण या पोह्यांच्या आत्मिक गोडीसमोर इतर पंचपक्वान्न फिके पडत.

'फॉव आणि चावदिस' (नरक चतुर्दशीचा) सोहळा: श्रमाची गोडी!

या पोह्यांची चव काही औरच! ती चव आजच्या पंचपक्वान्नांच्या फराळातही मिळत नाही. पण या चवीमागे दडलेला आहे, सामुदायिक श्रमाचा आणि अपार आनंदाचा अखंड सोहळा.

पोह्यांची 'लगिन घाई' आणि सामाजिक ऐक्याचा प्रवास

पोह्यांसाठीची तयारी म्हणजे जणू दिवाळीच्या आधीची 'लगिन घाई'. आदल्या रात्री भात भिजवून ठेवले जाई आणि मग दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे, सर्व वाडी एकत्र उठून पोह्यांच्या गिरणीकडे कूच करत असे. पंधरा-वीस किलोमीटर दूर असलेल्या सुकळवाड येथील गिरणीकडे समुहाने चालत जाण्याचा तो प्रवास म्हणजे आमच्या बालपणातील अवर्णनीय आनंदसोहळा होता. एकमेकांच्या सोबतीने, गप्पांच्या ओघात कापले जाणारे अंतर आणि सामाजिक ऐक्याची ती वीण, एक वेगळाच आत्मिक आनंद देऊन जात असे. पुढे रिक्षा आली, पण एकत्र जाण्याची ती सामाजिक प्रथा मात्र टिकून राहिली, कारण त्यात केवळ पोहे कुटणे नव्हते, तर नात्यांचा गोफ विणला जात होता.

मातीतील मोती : भाताच्या जाती आणि श्रमाची गोडी

या पोह्यांसाठी शेतात लवकर पिकलेले 'बेळा', 'पटणी', 'वालय' या भातजातींची निवड होई, जे दसरा-दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर तयार होत. भात तयार झाल्यावर सुरू होई झोडणी आणि मळणीचा सामुदायिक उत्सव. मदतीला आलेल्या शेतकरी मित्रांचे आदरातिथ्य कोरा चहा आणि गरमागरम 'पोहे' किंवा 'खारीबटर' देऊन केले जाई.

वाडीतल्या साऱ्यांनी एकत्र येऊन ही कामं करण्याची एक सुदृढ सामाजिक प्रथा होती. विशेषतः नाचणीची कणसं झोडणे हा तर एक वेगळाच मजेशीर खेळ असायचा. कणसं झोडणीचा तो लयबद्ध आवाज, एक विशिष्ट ताल धरत असे, जो आजही कानांत मधुर संगीत बनून घुमतो आणि गावातील साऱ्या जुन्या आठवणींना उजाळा देतो.

गिरणीवरील गर्दीचा संघर्ष आणि परिश्रमाची कहाणी

पोह्यांची ही तयारी म्हणजे एक अखंडित तपश्चर्याच होती. पोहे कुटण्यासाठी भिजवलेले भात घेऊन गिरणीवर जायचे, तिथेही प्रचंड गर्दी असायची. तिथे ते भिजलेले भात गरमागरम वाळूत भाजून देणाऱ्याजवळ सर्वप्रथम लाईन लावावी लागे. भल्या पहाटे चार वाजता घरातून निघून तिथे गेल्यावर १०० ते ११० वा नंबर लागलेला असायचा. पण ते भात भाजणारा ओळखीचा लाभला की, वशीला लावून भात लवकरच भाजून घेणारे आणि त्या चूल्ह्याजवळ घामाच्या धारांनी भिजलेल्या अंगाने भाजणारा कारागीर कमालीचा भाव खाऊन जायचा. एवढं झाल्यावरही पुन्हा पोहे कुटणाच्या गिरणीकडे पुन्हा प्रचंड गर्दी असायची. तिथे दुपारी ३:३० ते ५ वाजेपर्यंत नंबर लागायचा. म्हणजे पोहे कुटण्यासाठी घरातून पहाटे चार वाजता निघालेला माणूस चोवीस तासांनंतर घरी यायचा. यातही लवकर नंबर लागला असा त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचा आविर्भाव दिसायचा. याच श्रमाचे फळ म्हणून, घरोघरी पोते-पोते पोहे कुटून ठेवले जात असत, कारण संपूर्ण दिवाळीभर सकाळ-संध्याकाळचा एकमेव फराळ हेच पोहे असायचे.

'चावदिस' (नरकचतुर्दशी) आणि भजनाची पहाट

दिवाळीतील महत्त्वाचा दिवस म्हणजे 'चावदिस' अर्थात नरकचतुर्दशी. या दिवशी घरोघरी गुळाचे पोहे तयार केले जातात. हे गुळाचे पोहे भगवान श्रीकृष्णांना नैवेद्य म्हणून अर्पण करण्याची आणि त्यानंतर वाडीतील भजन मंडळाला कुड्याच्या पानांतून वाटण्याची एक गोड प्रथा आहे. आहाहा! तो क्षण म्हणजे आनंदाची परिसीमा!



उत्तररात्री सुरू झालेले देवाचे भजन, सूर्यकिरणे अंगावर येईपर्यंत भक्तिरसात न्हाऊन निघत असे. भजनाच्या सांगतेचा तो अजरामर आणि लोकप्रिय गजर, आजही मनात उत्साह भरतो:

**'सूर्य उगवला प्रकाश पडला**
**आडवा डोंगर तयाला माझा**
**नमस्कार...!'**

या जल्लोषात आणि आनंदात, शेजारधर्मालाही फराळ म्हणून प्रेमाने पोहेच दिले-घेतले जायचे.

**स्नेहबंधाचा महामंत्र : रिकामे न परतणारे ताट**

पोहे घरी आणल्यावर पहिले देव्हाऱ्यात देवाजवळ नैवेद्य म्हणून ठेवले जायचे. नंतर आपण ते पोहे खायला सुरुवात करण्यापूर्वी आजूबाजूला आठ ते दहा शेजाऱ्या-पाजाऱ्यांना शेर-दीड शेर पोहे ताटात भरून दिवाळी फराळ भेट म्हणून देण्याची प्रथा होती. ते शेजाऱ्यांना शेजारपाळा म्हणून दिवाळीची भेट दिलेलं ताट कधीच रिकामं परत येत नसे. प्रत्येक शेजारी आजही रिकामं ताट परत देत नाही.

यामध्येच आपुलकीचा, जिव्हाळ्याचा आणि आत्मियतेचा महामंत्र जपला जायचा. स्नेहभावाची वीण इथेच गुंफली जायची. आनंदाच्या देवाणघेवाण करण्याची अर्थात खरी दिवाळी हीच होती.

कोकणच्या या लाल मातीतून, साधेपणात दडलेल्या या सामाजिकतेच्या आणि सांस्कृतिक समृद्धीच्या आठवणींचा सुगंध असाच चिरंजीव राहो! या पोह्यांनी केवळ पोट भरले नाही, तर मनं जोडली आणि एका पिढीला एकत्र राहण्याचा, आनंद वाटून घेण्याचा अनमोल वारसा दिला. दिवाळीचा फराळ म्हणून 'पोह्यांचा' वापर म्हणजे कोकणच्या शेतकऱ्यांनी शेतात पिकविलेल्या धान्याची, भाताची पहिली सांस्कृतिकतेची शेतकी व्यवसायाशी जोडलेली नाळ होय. आज हे घरोघरी पोहे कुटणे कुठेतरी लुप्त झाले आहे. बाजारातून पोहे विकत आणले जातात, त्यामुळे पोह्यांच्या फराळाची खरी मजा कुठेतरी हरवलेली जाणवते.

नव्वदीच्या दशकातील ती पोह्याच्या फराळाची दिवाळी कधीच विसरता येणार नाही. दिवाळीत नवीन कपडे खरेदी करण्याची अशी आमची प्रथा कधीच पाळली नव्हती, किंबहुना कोकणातील लोकांना गणपती उत्सवात नवनवीन कपडे खरेदी करण्याची सवय आहे. दिवाळीत कारीट फोडतो... पण त्या पोह्यांच्या सामूहिक श्रमाची आणि पारंपरिक स्नेहाची चव आजही मनाला तृप्त करते!

**


# न्यायाचे राजे

निवृत्त न्या. यशवंत जावळे

भारताचे सर न्यायाधीश न्यायमूर्ती माननीय भूषण गवई न्यायाचे राजे भारताच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी उदयास येतात ज्यांनी केवळ आपल्या कर्तृत्वानेच नाही तर समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना न्यायाच्या छायेखाली आणून समतेची ग्वाही दिली. आजच्या काळातील भारताचे सरन्यायाधीश माननीय न्यायमूर्ती भूषण गवई हे त्यापैकी एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व आहे. न्यायालयीन क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान, समाजातील दुर्बल घटकांबद्दलची त्यांची बांधिलकी आणि न्यायदानातील त्यांची निष्ठा यामुळे ते खरोखरच 'न्यायाचे राजे' ठरतात.

**१. विषमतेची अन्यायी परंपरा**

भारतीय समाजव्यवस्थेवर शतकानुशतके मनुस्मृतीच्या अन्यायी नियमांचे गंडांतर होते. मनुस्मृतीत स्पष्ट तरतूद होती की शूद्राने न्यायाधीश होऊ नये. यामुळे समाजातील खालच्या वर्गांना न्यायव्यवस्थेत प्रवेशाची दारे कायम बंद होती. अस्पृश्य व्यक्तीस न्यायालयात पाऊल ठेवण्यास परवानगी नव्हती. त्यांचा आवाज न्यायाधीशाच्या ङ्गङ्कपवित्रफ्र कानात पडला तर न्याय भ्रष्ट होईल, असा हास्यास्पद आणि अन्यायी समज समाजात रुजवला गेला. त्यामुळे अस्पृश्य व्यक्ती वादी, प्रतिवादी किंवा साक्षीदार असला तरी त्याला न्यायकक्षाच्या दारात प्रवेश नव्हता. ही व्यवस्था हीनतेचे जिणे ठरवणारी आणि मानवी हक्कांची पायमल्ली करणारी होती.



**२. आंबेडकरांनी आणलेली न्यायसमानतेची व्यवस्था**

ही विषमता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाद्वारे संपवली. त्यांनी समतेवर आधारित न्यायव्यवस्था स्थापन केली. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारलेले भारतीय संविधान सर्व नागरिकांना समान हक्क देणारे आहे. अस्पृश्यतेचे निर्मूलन, समान संधी आणि शिक्षणाचा अधिकार ही बाबासाहेबांनी दिलेली लोकशाहीतील अमूल्य देणगी आहे.

**३. ज्ञानाचे राजे शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर**

राजर्षी शाहू महाराज एकदा बी.डी.डी. चाळीत डॉ. आंबेडकरांना भेटायला आले होते. तेव्हा बाबासाहेब म्हणाले, 'राजे साहेब, आपण आदेश केला असता तर मी आलो असतो, आपण कसा त्रास घेतला?' यावर शाहू महाराज म्हणाले 'भीमराव, आपण ज्ञानाचे राजे आहात.' या घटनेतून शाहू महाराजांनी आंबेडकरांच्या ज्ञानसम्राटपणाची दखल घेतली. हाच विचार पुढे समाजासाठी प्रेरणादायी ठरला.

**४. शिक्षणाद्वारे उन्नतीची दिशा**

डॉ. आंबेडकर नेहमीच सांगत की, 'समाजातील सर्वांनी आपल्या मुला-मुलींना उच्च शिक्षण द्यावे. उच्च पदांवर पोहोचलेलेच समाजावर छायाछत्र धरतील.' संविधानाच्या माध्यमातून त्यांनी सर्वांना शिक्षण घेण्याचा अधिकार दिला. शिक्षण आणि उच्च पदावरील सहभागातून समाजातील समतेची पायाभरणी त्यांनी केली.

**५. न्यायमूर्ती भूषण गवई बाबासाहेबांच्या स्वप्नपूर्तीकडे वाटचाल**

या विचारांचा परिपाक म्हणजे न्यायमूर्ती भूषण गवई यांचे व्यक्तिमत्त्व. त्यांनी उच्च शिक्षण घेऊन न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च पद म्हणजे भारताचे सरन्यायाधीश पद भूषवले. सर्वोच्च न्यायालयाचे प्रशासन, न्यायदान आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण करण्याची धुरा त्यांनी सांभाळली. अशा रीतीने त्यांनी बाबासाहेबांच्या स्वप्नाला प्रत्यक्षात उतरवले.

**६. सर्वांसाठी सुलभ न्याय**

माननीय गवई यांचे मोठे योगदान म्हणजे 'न्याय सर्वांसाठी' या तत्त्वाची अंमलबजावणी. जिथे न्यायालय नव्हते तिथे न्यायालय स्थापन करून त्यांनी वंचितांना न्याय जवळ आणला. न्याय हे केवळ उच्चभ्रूंचे साधन नसून तो प्रत्येक सामान्य माणसाचा अधिकार आहे, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले.

**७. सर्वोच्च न्यायालयातील आरक्षणाची अंमलबजावणी**

न्यायालयातील समावेशकता वाढवण्यासाठी गवई यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारी आणि कर्मचारी भरतीत आरक्षण लागू केले. यामुळे दुर्बल घटकांना न्यायव्यवस्थेत थेट सहभागाची संधी मिळाली. ही कृती भारतीय न्यायव्यवस्थेतील ऐतिहासिक पाऊल ठरले.

**८. कोल्हापूर खंडपीठाची स्थापन**

न्याय सुलभ करण्याच्या त्यांच्या धोरणाचा भाग म्हणून कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करून त्याचे उद्घाटन त्यांनी केले. ग्रामीण व गरीब नागरिकांना न्यायालयीन खर्च न परवडल्याने होणारा त्रास त्यांनी कमी केला. 'गरीब दारी न्याय' ही संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली.

**९. निर्णय आणि न्यायिक योगदान**

माननीय गवई यांनी दिलेले अनेक निर्णय भारतीय न्यायप्रणालीतील मार्गदर्शक ठरले आहेत. सामाजिक न्याय, मानवी हक्क, आरक्षण, पर्यावरण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य अशा विविध क्षेत्रांत त्यांच्या निर्णयांनी लोकशाही बळकट केली आहे. ते केवळ कायद्याचे जाणकार नाहीत, तर समाजाच्या नाडीला ओळखून न्यायदान करणारे 'न्यायाचे राजे' आहेत.

**निष्कर्ष**

मनुस्मृतीच्या अन्यायी व्यवस्थेतून सुरू झालेला प्रवास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान निर्मितीद्वारे समतेच्या दिशेने वळला. या विचारांना न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आपल्या कारकीर्दीत मूर्त रूप दिले. गरीब, शोषित आणि वंचित घटकांसाठी न्याय जवळ आणणे, आरक्षणाची अंमलबजावणी, खंडपीठांची स्थापना आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण हे त्यांचे काम 'न्यायाचे राजे' या बिरुदाला साजेसे आहे. माननीय भूषण गवई हे केवळ सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश नाहीत, तर भारतीय न्यायव्यवस्थेतील समतेचे आणि न्यायाचे खरे राजे आहेत.

# ज्याची खावी पोळी... त्याचीच वाजवावी टाळी

निलेश साठे

पूर्वी आपल्याकडे अशी एक म्हण होती. ज्याची खावी पोळी त्याचीच वाजवावी टाळी. या म्हणीचा अर्थ खूप साधा सिम्पल आणि सुंदर होता. ज्याचं आपण खातोय म्हणजे ज्याने आपल्याला सांभाळलं सावरलं संकटाच्या वेळी साथ दिली त्याचेच गुणगान करावेत त्याचीच वाहवा करावी असा अर्थ अपेक्षित होता. त्याचा कधीही कुठेही चुकूनही कोणासमोरही अवमान करू नये. नेहमी गोडवेच गावेत. खूप छान म्हण होती. देणारा देत होता घेणारा घेत होता. वेळ बदलली काळ बदलला परिस्थिती बदलली. माणसे डँबीस होऊ लागली. उपकाराची जाणीव विसरू लागली. आपल्यासाठी कोणी काय केलं हे सोयीस्करपणे विसरु लागले. परोपकाराची भावना मग हळूहळू मागे पडत चालली. कोणासाठी कितीही केलं तरी केलं म्हणत नाहीत. साधे नावही घेत नाहीत. वरून या म्हणीचा माणसाने विपर्यास केला. ही म्हण अर्धवट वापरू लागले. ज्याची खावी पोळी.... त्याचीच वाजवावी. अशी म्हण ते जगू लागले. उपकाराची परतफेड तर दूरच पण ज्याचं खाल्लंय त्याची बदनामी करण्याचे पुरेपूर प्रयत्न करू लागले. काहीजण मात्र घरचा भेदी असल्याप्रमाणे वागतात. ज्याच्यासोबत आपण राहतो, बसतो, उठतो, खातो, पितो त्याचंच नुकसान कसं होईल याच्याकडे त्यांच जास्त लक्ष असतं. आपण अनोळख्या माणसाचे काही नुकसान करू शकत नाही. कारण त्याची आपल्याला ताकद माहीत नसते. तो आपल्यापेक्षा वरचढ असेल आणि तो आपलं नुकसान करू शकतो. पण आपल्या माणसांना आपण चांगलंच ओळखून असतो. त्याची ताकद, त्याच्या चुका, त्याची कमजोरी हे आपल्याला बरोबर माहित असतं. म्हणूनच आपण आपल्याच माणसाचं नुकसान खूप जास्त करू शकतो. आणि हेच खरं जास्त धोकादायक आहे. म्हणजे लोकांचं तुम्ही काही बिघडवू शकत नाही, आपल्याच माणसांचे मात्र तुम्ही नुकसान करू शकता. म्हणूनच आपलेपणाचे ढोंग करणारे कायमचे दूर लोटले पाहिजेत. त्यामुळे कदाचित देणारे हात कमी झालेत. घेणाऱ्याची संख्याही वाढलेली आहे. पण देणारा मात्र आता विचार करून देऊ लागला आहे. आणि ते योग्यच आहे. नीट विचार करून पारखून देणाऱ्याने द्यावे हा अलिखीत नियम झाला. एखाद्याच्या उपकाराची परतफेड करू शकत नसाल तर किमान त्याची बदनामी तरी करू नये एवढीच एक माफक अपेक्षा होती, त्या देणाऱ्याची आणि त्या करणाऱ्याची. पण माणसे धोका करू लागली, फसवू लागली. खोटारडेपणे वागू लागली. म्हणूनच आपलेपणा कमी होऊ लागला. देणारा कमी झाला घेणारा तरसू लागला. तू तुझ्या दुनियेत मी माझ्या दुनियेत. ही भावना रूढ झाली. आणि ज्याची खावी पोळी हे म्हणच संपुष्टात आली.

**

# शाश्वत आणि आधुनिक दुग्ध व्यवसाय







प्रमोद जाधव

रायगड जिल्ह्यातील अलिबाग शहरापासून पाच किलो मीटर अंतरावर असलेले कार्लेखिंडजवळ कृष्णा डेअरी फार्म उभारण्यात आले आहे. रुपाली नायक आणि प्रणाली राऊत या दोन महिलांनी एकत्र येत हा उद्योग सुरु केला असून पर्यावरणाची काळजी घेत प्रगत दुध उत्पादन केले जात आहे. शाश्वत, पर्यावरण संरक्षण आणि आधुनिक दुग्ध व्यवसायाचे एक उत्तम उदाहरण म्हणून या डेअरी फार्मकडे पाहिले जात आहे.

कृष्णा डेअरी फार्मचे उद्‌घाटन तीन ऑक्टोबरला झाले. उच्च प्रतीचे फुल फॅट दुध, पनीर, आणि तुप दुग्ध जन्य पदार्थांच्या उत्पादनावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. या डेअरी फार्ममध्ये मुर्रा म्हशींच्या जातीचे पालन केले जात आहे. या म्हशी भारतभर त्यांच्या गाढ, स्वादिष्ट आणि प्रथिनांनी समृद्ध दूधासाठी भारतभर प्रसिद्ध आहेत. केवळ दुध चविष्ट नाही, तर आरोग्यासाठीही पौष्टीक म्हणून या दुधाची ख्याती आहे. आधुनिक यंत्रसाम्रगी आणि स्वच्छतेच्या नियमांचे काटेकोर पालन करून दूध काढण्याचे काम केले जाते. या डेअरी फार्ममधून अनेकांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे. कृष्णा डेअरी फार्ममधील दुध हे उत्पादनापुरता मर्यादीत नसून शाश्वतेसाठी प्रयत्न आहे. डेअरीमध्ये वीसहून अधिक म्हशी आहेत. या म्हशींच्या शेणापासून सेंद्रिय खत तयार केले जात आहे. यातून शेतीची माती नैसर्गिकरित्या सुपिक ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. रासायनिक खतापेक्षा सेंद्रीय खताचा वापर करण्याची सवय शेतकऱ्यांना निर्माण झाली पाहिजे यासाठी हा प्रयत्न केला आहे. या उपक्रमामुळे मातीचे आरोग्य टिकून राहण्याबरोबरच पिकांची गुणवत्ता वाढीला चालना देण्याचा प्रयत्न केला आहे.

डेअरी फार्ममध्ये पाण्याची बचत करण्यावरही भर दिला आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्यापासून जीवामृत (द्रव सेंद्रिय खत) तयार केले जात आहे. यामुळे गोड्या पाण्याचा वापर कमी होत असून जलसंपत्तीचे रक्षणही होत आहे. कृष्णा डेअरीमध्ये मुर्रा म्हशींच्या प्रजननावर वैज्ञानिक पद्धतीने विशेष लक्ष दिले जात आहे. मुर्रा म्हशीची जात अतिशय मौल्यवान आणि उत्पादक असल्याने तिचे संवर्धन करण्यावर भर दिला आहे.

एका दिवसाला २५० लिटरहून अधिक दुधाचे उत्पादन काढले जाते. उच्च दर्जाच्या मुर्रा म्हशींचे दुध, सेंद्रीय शेती पद्धती आणि पर्यावरणक पुरक व्यवस्थापन यांचा संगम घडवून कृष्णा डेअरी फार्मची निर्मिती करण्यात आली आहे.

डेअरी फार्ममधील म्हशींच्या गोठ्यातील शेण एका खड्ड्यात द्रवरुपात साठवले जाते. ते पाणी उपसा यंत्राद्वारे प्रक्रिया करून कोरडे शेण तयार केले जाते. या कोरड्या शेणाचा वापर झाडांना खतांसाठी केला जातो. या प्रक्रियेतून जीवामृत (द्रवरुप सेंद्रीय खत) तयार केले जाते. मातीची सुपीकता वाढविण्यासाठी नैसर्गिक आणि प्रभावी खत आहे. या पद्धतीमुळे परिसर स्वच्छ आणि दुर्गंधीमुक्त राहण्यास मदत होत आहे. यामुळे डास, मच्छरांची पैदास कमी होत असून शेण हाताने हाताळण्याची गरज कमी होते. कृष्णा डेअरी फार्ममध्ये उच्च रक्तसंबंध असलेल्या मुर्रा म्हशींच्या निवडक प्रजननावर विशेष लक्ष देत आहे. उत्तम वंश परंपरा, जास्त दुध उत्पादन, आणि निरोगी पिल्ले यावर भर देऊन शाश्वत आणि उत्कृष्ट दुग्ध व्यवसायासाठी अत्यंत महत्वाचे ठरत आहे. या पद्धतीमुळे कृष्णा डेअरी फार्म आधुनिक दुग्ध उद्योगात पर्यावरण संरक्षण आणि कार्यक्षमता यांचे आदर्श उदाहरत ठरत आहे.

**

नितांत वाचनीय...

# गेले लिहायचे राहून

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

''गेले लिहायचे राहून'' हे मृदुला भाटकर लिखित पुस्तक पुण्याच्या समकालीन प्रकाशनने प्रकाशित केले आहे. या पुस्तकातील विविध लेख, काही काळापूर्वी, दैनिक लोकसत्तातील चतुरंग पुरवणीत, दर शनिवारी, वर्षभर, दर पंधरा दिवसांनी, प्रकाशित झाले होते. या पुस्तकात एकूण २५ लेख समाविष्ट आहेत. या पुस्तकाचे साधे पण अत्यंत समर्पक, रंगीत मुखपृष्ठ गिरीश सहस्रबुद्धे यांचे आहे.

थोडं सुरुवातीचं, या लेखात मृदुला भाटकर यांनी आपल्या जीवनाचे सिंहावलोकन केले आहे. बालपणापासून निवृत्तीपर्यंतच्या जीवनात, अकरा वर्षांचा वकिलीचा आणि सव्वीस वर्षांचा न्यायदानाचा प्रवास, या काळात असलेल्या काही मर्यादांमुळे, विचार व्यक्त करण्याची संधी आता प्राप्त होत आहे, असे त्या म्हणतात. एक हत्या अन् वाट चुकलेला अतिरेकी, हा या पुस्तकातील सर्वात प्रदीर्घ लेख आहे. २६.११.२०१८ रोजी मुंबईत अतिरेक्यांनी अमानुष हत्याकांड केले. त्याच्या दुसऱ्या दिवशी हायकोर्ट कोणत्या परिस्थितीत सुरू केले गेले, त्या संबंधीच्या विविध आठवणी लेखिकेने मांडल्या आहेत. जनरल अरुणकुमार वैद्य यांच्या मारेकऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने शेवटी फाशीची शिक्षा सुनावली होती.




त्याआधी मृदुला भाटकर यांना सुखदेवसिंगची, वरिष्ठ वकील नहार यांच्या सहकारी म्हणून, न्यायालयाच्या आदेशानुसार, त्याची बाजू मांडावी लागली होती. त्यावेळच्या विविध आठवणी मृदुला यांनी सविस्तरपणे मांडल्या आहेत. फाशीची शिक्षा झालेल्या सुखदेवसिंगच्या व्यक्तिमत्त्वातील काही विशेष, न समजलेले पैलू स्पष्ट होतात. त्यामुळे शेवटी मृदुला म्हणतात, सुखदेव हा जनरल वैद्यांचा मारेकरी फासावर गेला आणि त्यावेळी माझ्या डोळ्यात अश्रू आले ते सुखदेवसिंग नावाच्या वाट चुकलेल्या माणसासाठी! ''अप्पा : द जुगाड'' या लेखात हायकोर्ट ड्रायव्हर म्हणून काम केलेल्या, पन्नास वर्षांपूर्वीच्या, अप्पा शिंदे याचे व्यक्तिचित्र लेखिकेने अप्रतिमरित्या मांडले आहे. त्यामधून हरहुन्नरी अप्पा वाचकांसमोर साक्षात साकारला जातो.

आठवण नि 'आठ'व्रण, हा लेख अत्यंत हृद्य आहे. जीवनाच्या संध्याकाळी, मोठ्या हुद्यावरून निवृत्त झालेल्या गृहस्थाला, मृत्युपत्र तयार करताना, त्यामध्ये काय समाविष्ट करता येते आणि कोणत्या गोष्टी त्यामध्ये येत नाहीत, हे सांगताना लेखिका त्यांना जिवंतपणीच चुका मान्य करून, मित्राची क्षमा मागणे कसे योग्य, हे समजावते. आठवणी जपणे हे विविध व्यक्ती कसे करतात, तेही या लेखातून वाचकाला समजते. 'ऐक जरा..' या लेखात सर्वांसाठीच श्रवणाचे महत्त्व कोणते ते उत्तम प्रकारे, सोदाहरण सांगितले आहे. ''वेशभूषा नव्हे, बरंच काही'' हा लेख खूप काही शिकवून जातो. 'कायदे जिंकलेले, कायदे हरलेले' या लेखात लेखिकेने अस्तित्वातील कायद्यांची उत्तम प्रकारे अंमलबजावणी करण्यातील विविध गोष्टींचा ऊहापोह उत्तम प्रकारे केला आहे. ''मनातलं कुरुक्षेत्र'' या लेखात न्यायाधीशांच्या मनात चाललेली, निकाल देण्यापूर्वीची आणि नंतरची घालमेल उत्तम प्रकारे व्यक्त होते. कालमानानुसार काही कायद्यांत शिक्षांची कमतरता जाणवते तर काही कायद्यांमध्ये बदल गरजेचे वाटतात, असे मृदुला भाटकर यांनी मांडले आहे, तर काही कायद्यांतील शिक्षांमध्ये बदल गरजेचे वाटतात, असे मृदुला भाटकर यांना वाटते. गजाआडचं जग आणि 'गिल्टी रोझेस', या लेखात मृदुला यांच्याकडे, मुंबईत न्यायाधीश म्हणून काम करताना, आर्थर रोड तुरुंगाची पाहणी करून त्याचा अहवाल देण्याचे काम, दोन वर्षे सोपविले होते. तेथील अनुभव त्यांनी सविस्तरपणे नोंदविले आहेत. कच्चे व पक्के कैदी यातील फरक त्यांनी स्पष्ट केला आहे. तुरुंगातील कर्मचाऱ्यांविषयी त्यांना आपले अनुभव नोंदविले आहेत. केलेल्या खुनासाठी, जन्मठेपेची शिक्षा झालेला एक कैदी व्यवसायाने माळी होता. त्याने तुरुंगात उत्कृष्ट गुलाब लावून, त्यांचा एक गुच्छ पंतप्रधानांना दिला होता. त्यावेळी इंदिरा गांधी यांनी त्यांचे वर्णन 'गिल्टी रोझेस' असे केले होते. 'गेला मोहन कुणीकडे?' मध्ये ''तो मी नव्हेच'' नाटकाप्रमाणेच फसवणूक झालेल्या स्त्रीला न्याय मिळवून देताना आलेले विलक्षण अनुभव सविस्तरपणे मांडले आहेत. नंतरच्या चार लेखांत घटस्फोटाविषयीच्या विविध खटल्यांतील विविध, चित्रविचित्र अनुभव सविस्तरपणे मंडले आहेत. ते सर्वांनाच मार्गदर्शक ठरणारे आहेत. 'प' पोलिसाचा, बुटांची चोरी, संशयाचा फायदा हे लेख सर्वांसाठीच उपयुक्त आणि मार्गदर्शक आहेत. त्यानंतरचे काही लेख न्यायालयाशी निगडित, विविध अनुभवांशी संलग्न आहेत. जय गंगे भागीरथी, हा लेख एका न्यायाधीश स्त्रीला आलेले अनुभव व्यक्त करतो. लेखिका त्या अनुभवांना कधी सहजतेने तर कधी मनातील खंत व्यक्त करून तोंड देते. सत्य, या लेखातील विचारही महत्त्वाचे आणि वाचकाला अंतर्मुख करणारे आहेत. निवृत्त न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांना न्यायालयीन काम काजाचा प्रदीर्घ अनुभव आहे. जीवनातील विविधांगी अनुभवांचे संचित त्यांच्या या अनुभवांतून उत्तम प्रकारे व्यक्त होते. त्यांच्या लेखनातून विविध भाषांतील सुयोग्य संदर्भ नेमकेपणाने येतात. साहित्य, संगीत, कला यामधील सक्रिय सहभागामुळे, त्यांचे अनुभव नितांत वाचनीय आणि प्रेरक झाले आहेत. हे अनुभव वेळोवेळी वाचण्यासारखे असल्याने, हे पुस्तक संग्राह्य ठरते.

**


**पुस्तकाचे नाव : गेले लिहायचे राहून**
**लेखिका : मृदुला भाटकर**
**प्रकाशक : समकालीन प्रकाशन,**
**४७४, सदाशिव पेठ, पुणे-३०.**
**फोन : ०२०-२४४७०८९६.**
**पृष्ठे : १३९. मूल्य : रु.२००/-**

# विटाळाचं पिल्लू नष्ट होईल काय?

अंकुश शिंगाडे

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे विश्वख्यातीचे तज्ञ म्हणून त्यांची जगताला ओळख आहे. त्यातच त्यांचा संघर्षही वाखाणण्याजोगा असाच आहे. त्यांनी केलेल्या सत्याग्रहाला धार आहे. जसा चवदार तळ्याचा सत्याग्रह. या सत्याग्रहातील काही विशिष्ट मुद्दे फारच गाजले. पहिला मुद्दा गाजला. तो म्हणजे पाणी पिवून सत्याग्रहाला बसले.

चवदार तळ्याचा सत्याग्रह बाबासाहेबांनी का केला? का गरज पडली त्यांना चवदार तळ्याचा सत्याग्रह करण्याची? तर त्याचं कारण आहे, त्यांना मिळणारं पाणी अडवणं. अस्पृश्यता पाळणे हा जरी आज गुन्हा असला तरी त्या काळात अस्पृश्यता पाळली जात होती व त्याच आधारावर अस्पृश्यांची पिळवणूक केली जात होती. अशातच त्यांचं पिण्याचं पाणी अडवलं गेलं.



पिण्याच्या पाण्यासाठी महाडातील चवदार तळ्यावर २० मार्च १९२७ रोजी जरी सत्याग्रह केल्या गेला. तरी त्या पाठीमागं एक पाश्वभुमी आहे. १९२३ साली विधानसभेतील एका बोळे नावाच्या सदस्यानं मुंबई विधानसभेत अस्पृश्यांवरील वाढत्या अत्याचाराला आळा घालण्यासाठी एक ठराव मांडला. तो संमत झाला व स्विकारण्यात आला. त्या ठरावातून लोकांच्या पैशातून बांधण्यात आलेल्या सार्वजनिक बांधकामाला अस्पृश्यांनी वापरण्यास परवानगी देण्यात आली. जसे, विहीर तलाव, शाळा, दवाखाने, न्यायालये,कार्यालये इत्यादी. महाड नगरपालिका ही मुंबई परगण्याचा भाग होती व महाड नगरपालिकेतून सुद्धा १९२४ मध्ये तोच ठराव स्विकारला गेला. हे सर्व कागदावरच होतं. परंतु वास्तविक स्वरुपात सार्वजनिक बांधकामं अस्पृश्यांना वापरायला मिळालं नव्हतं. म्हणूनच महाड येथे २० मार्च १९२७ ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांना हक्क मिळावे यासाठी एका परीषदेचं आयोजन करण्यात आलं. कारण ते एक महाड गावच होतं की ज्या गावात बाजार करण्यासाठी अस्पृश्यांना यावं लागायचं. त्यात काही अस्पृश्य लोकंही असायचे व त्यांना तहानही लागायची.

अस्पृश्य लोकं जेव्हा महाडात बाजारासाठी यायचे. तेव्हा त्यांना तहान लागल्यावर ती मंडळी महाडच्या तहसील कार्यालयाजवळ असलेल्या एका पडक्या विहिरीवर पाणी प्यायचे. परंतु त्या विहिरीवर महाड नगरपालिकेचं दुर्लक्ष असल्यानं त्या विहिरीतील पाणी हे घाणेरडं होतं व ते पाणी पिण्यायोग्य नव्हतं.

महाडात आणखी एक पिण्याच्या पाण्याचा स्रोत होता. जो स्रोत उच्चवर्णीय लोकांच्या ताब्यात होता. ज्यातून अस्पृश्यांना पाणी घेवू दिलं जात नसे.

महाडात बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली भरलेली अस्पृश्यांच्या हक्काची परीषद. ज्या परिषदेत महाडाच्याच आजुबाजूची अस्पृश्य मंडळी जातीनं हजर झाली होती. त्याचं कारण होतं. त्यांनी बाजाराच्या किंवा व्यवहाराच्या निमित्यानं महाडात गेल्यावर भोगलेल्या यातना. मनात इच्छा नसतांनाही तहसील कार्यालयाजवळ असलेल्या जुन्या विहिरीचं पाणी त्यांना प्यावं लागायचं. ती मजबुरी होती. म्हणूनच लोकं चवदार तळ्याच्या पाणी आंदोलनात सक्रीय सहभागी झाले होते.

चवदार तळ्याच्या पाण्याला अस्पृश्यांनी हात लावताच सगळीकडे ती बातमी पसरली व त्या प्रसंगानंतर सर्व सवर्ण लोकं हातात लाठ्या घेवून अस्पृश्य लोकांच्या दिशेनं आले. त्यातच ज्या तळ्यातील पाणी पिण्यासाठी अस्पृश्य लोकं आले होते. त्या अस्पृश्य मंडळींना लोकांनी मारहाण करण्यास प्रारंभ केला. त्यातच त्यांचे अन्न आणि अन्न बनवायला आणलेली भांडीही फेकण्यात आली. शिवाय ते आपल्या गावी परतताच त्यांना गावातील सर्व अश्पृश्येतर लोकांनी शिक्षा करावी असे फतवेही काढण्यात आले व तशा स्वरुपाचे निरोप गावोगावी पाठवण्यात आले.

सवर्णांच्या म्हणण्यानुसार चवदार तळे बाटले होते. ते शुद्ध करणे आवश्यक होते. त्यानंतर चवदार तळ्याचे शुद्धीकरण करण्यात आले. ज्यात कितीतरी प्रमाणात गाईचं शेण आणि मलमुत्र चवदार तळ्यात टाकण्यात आलं आणि पुढं पुन्हा एकदा अस्पृश्यांना पाणी वापरण्यास बंदी घालण्यात आली. चवदार तळ्याचं आंदोलन झाल्यानंतर सवर्ण मंडळी एवढ्यावरच थांबली नाहीत तर अस्पृश्यांनी आपलं तळं बाटवलेलं आहे म्हणून एका महाडातील नरहरी दामोदर वैद्य नावाच्या व्यक्तीनं चवदार तळ्याच्या पाण्याचा खटला न्यायालयात दाखल केला. म्हटलं की डॉक्टर बाबासाहेबांनी लोकांना भडकावून आमचं तळं बाटवलं. आणखी म्हटलं की या तलावावर कितीतरी वर्षापासून आमचीच सत्ता होती व चवदार तळे हे सार्वजनिक नव्हते. त्यामुळंच अस्पृश्यांना १९२३ च्या मुंबई विधानसभेतील ठरावानुसार चवदार तळ्यातील पाणी वापरण्याचा अधिकार नाही. शिवाय त्यांना त्यातील पाणी वापरण्यास मनाई करण्यात यावी.

शेवटी निर्माण झाला खटला. ज्या खटल्यात बाबासाहेबांची कस लागली. सवर्णांच्या बाजूने अनेक साक्षीपुरावे तपासण्यात आले. अस्पृश्यांनी १९२७ पुर्वी कधीच चवदार तळ्याचं पाणी वापरलेलं नाही. ही बाजूदेखील मांडण्यात आली. मात्र बाबासाहेबांनी पुरावे सादर करुन सांगीतलं की सदर तलाव हा बाँबे लँड रेव्हेन्यू कोडनुसार शासनाच्या मालकीचा असून सध्या त्यावर महाड महानगरपालिकेचा ताबा आहे. तो तलाव सार्वजनिक बांधकामाच्या प्रकारात येतो. शेवटी त्या खटल्यात निकाल जाहीर झाला की सदर तलाव हा शासनाच्या मालकीचा आहे. त्यातील पाणी अस्पृश्यांनी आतापर्यंत वापरलेलं नाही. कारण त्याचं पाणी सवर्ण समाज वापरत होता. त्यातील पाणी अस्पृश्यांनी न वापरण्याचं कारण आहे, सवर्ण समाजाची दबंगगिरी. यावरुन सवर्णाचा मालकी अधिकार तळ्यावर असणे सिद्ध होत नाही. त्यावरुन अस्पृश्यांना पाणी वापरु न देण्याचा कोणत्याही स्वरुपाचा अधिकार टाळता येणं शक्य नाही. त्यामुळंच अस्पृश्यांना चवदार तळ्यातील पाणी वापरु देण्यात यावे.

चवदार तळ्याच्या आंदोलनातून केवळ अस्पृश्यांना न मिळणाऱ्या पाण्याचाच प्रश्न मिटला नाही तर त्यातून अस्पृश्यांच्या सवर्णांना होत असलेल्या विटाळाचाही प्रश्न मिटला होता. थोडासा उरला होता. तोही पुढं बाबासाहेबांनी संविधान लिहिलं. त्यावेळेस मिटला.

विशेष सांगायचं झाल्यास असंच सांगता येईल की काल जसा विटाळ मिटविणायासाठी बाबासाहेबांना संघर्ष करावा लागला. विटाळ नावाचा बाप नष्ट करण्यासाठी. अन् तो बाप नष्ट झालासी. कदाचित तीच भुमिका धरुन आज त्याच विटाळाच्या पिल्लूला नेस्तनाबूत करण्यासाठी संघर्ष करावा लागेल काय? पुन्हा एकदा एखाद्या चवदार तळ्याचा खटला लढावा लागेल काय? इत्यादी सारे प्रश्न अनुत्तरीतच आहेत. कदाचीत पुन्हा ऐकदा चवदार तळं आंदोलन करुन बाबासाहेबांच्या लेकरांना विटाळाच्या पिल्लाला ठेचून काढावं लागेल. त्याशिवाय विटाळ समूळ प्रमाणात नष्ट होणार नाही. असं वाटणं साहजिकच आहे.

**

# ऑपरेशन सिंदूर

प्राप्ती म्हात्रे



''शुरांचा त्याग व्यर्थ जावू देणार नाही. माझ्या भारतभूमीवर दहशतवादाचे सावट राहू देणार नाही.''

भारताच्या इतिहासात प्रत्येक पानावर देशासाठी बलिदानाची, शौर्याची आणि त्यागाची कथा लिहिलेली आहे अशाच एका पानावर सुवर्णाक्षरांनी लिहलं गेलं ते म्हणजे ''ऑपरेशन सिंदूर''

२२ एप्रिल २०२५ रोजी, काश्मीरच्या पहलगाम भागातील बीसरण व्हॅलीमध्ये निरपराध यात्रेकरुंवर, झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सैनिकांनी उभा केला तो एक अद्वितीय शौर्याचा इतिहास. आपल्यावर वार झाला तर आपण फक्त सहन करून बसत नाही तर त्याला तितक्याच ताकदीने उत्तर देणे ही माझ्या भारताची परंपरा आहे हेच दाखवून दिले आपल्या जवानांनी.

''शत्रूचा त्या डाव काळा,
तिरंगा आमचा ज्वाळा रक्ताच्या थेंबाथेंबातून माझा भारत उभा राहिला.''

भारताच्या इतिहासात काही प्रसंग असे आहेत की, जे आपल्या मनाला कायमचे घाव देवून जातात. पहलगाम हल्ला हा तसाच एक प्रसंग, नक्की कायं घडल होत तिथे? निरागस पर्यटक सुंदर काश्मीरची सफर करण्यासाठी गेले होते. काही तरुण जोडपी नुकतीच संसाराच्या नव्या वाटेवर पाऊल ठेवत होती. पण त्या दहशतवादी गोळ्यांनी त्यांच्या स्वप्नांना भेदून टाकले. निर्दयपणे हल्ला केला नि तुझा धर्म काय विचारला? अहो! प्राणांची भित मागून सुद्धा त्यांनी सोडले नाही. फक्त धर्मावरून निरपराधांचे प्राण घेतले. पहलगामच्या त्या काळ्या दिवशी शेकडो घरे उद्ध्वस्त झाली. कित्येक आईच्या कुशीतला मुलगा कायमचा निघून गेला. अनेक पत्नींच्या हातातल्या बांगड्या फुटल्या. लहानग्या मुलांच्या डोळ्यातून बाबा कधी येणार हा प्रश्न तर कायमचाच थांबला.

पण आपल्या शूर जवानांनी अतिशय नेमक्या आणि कठोर कारवाईतून जगाला दाखवून दिले की भारतावर हल्ला केला तर माझा भारत कधीही गप्प बसणार नाही. ७ मे २०२५ रोजी भारताने राबवले 'ऑपरेशन सिंदूर.'

हे ऑपरेशन फक्त बदला घेण्यासाठी नव्हते तर शत्रूचे अड्डे कायमचे उद्ध्वस्त करण्यासाठी होते. खुफिया माहितीच्या आधारावर पाकिस्तान व पाक व्याप्त काश्मीरमधील ९ प्रमुख दहशतवादी प्रशिक्षण शिबिरांवर हवाई हल्ले व अत्याधुनिक शस्त्रांचा वापर करून हल्ला चढवला आता प्रश्न पडतो की याला 'सिंदूर' हेच नाव का बरे दिले? सिंदूर म्हणजे काय?

सिंदूर म्हणजे मंगळसूत्राची, नात्याची, जगण्याची ओळख पहलगाम मध्ये नवविवाहिता स्त्रिया विधवा झाल्या. त्यांचे मंगळसूत्र तुटले. कपाळावरचा सिंदूर पुसला गेला. त्यांच्या कधीच न भरून येणाऱ्या वेदनेला उत्तर म्हणून भारतीय सैन्याने या कारवाईला ऑपरेशन सिंदूर हे नाव देऊन संदेश दिला की, 'भारतीय स्त्रीच्या कपाळावरचा सिंदूर आम्ही जपणार, तिच्या अश्रूंना आमची तलवार उत्तर देणार.' कर्नल सोफिया खुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह या दोन रणरागिणींनी ऑपरेशन सिंदूरचे नेतृत्व केले. तसेच बी.एस.एफ. महिला, एअर डिफेन्स युनिटमध्ये महिला कर्नलची कमांड भूमिका यांनी हे दाखवून दिले की, हा निर्णय एक प्रतिकात्मक संदेश होता की माझ्या देशाची सुरक्षा आणि युद्ध क्षेत्रात महिलांची भूमिका फक्त सहाय्यक नाही, तर अग्रेसर नेतृत्व करणारी आहे. या सिंदूर ऑपरेशन मधून फक्त दहशतवाद्यांचा पराभवच नाही झाला तर संपूर्ण जगाला संदेश गेला की, 'भारतावर डोळा ठेवणाऱ्यांचे डोळे कायमचे मिटवले जातील.'

आणि याचे जिवंत उदाहरण म्हणजेच आताच झालेला एशिया कप भारत-पाकिस्तान सामना, यामध्ये आपला भारत विजयी तर झालाच पण सोबतच भारतावर वाकड्या नजरेने बघणाऱ्यांची नजर कशी खाली झुकवायची हे देखील भारताने चांगलेच दाखवून दिले.

।। जय हिंद । जय भारत ।।

**

# भारताच्या फिरकीपुढे विंडीज घायाळ

## पहिल्या डावात ५१८ धावांचा डोंगर; वेस्ट इंडिज ३७८ धावांनी पिछाडीवर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताने वेस्ट इंडिजवर वर्चस्व गाजवले आहे. भारताने पहिल्या डावात ५१८ धावांवर घोषित केला होता. वेस्ट इंडिजने दुसऱ्या दिवस अखेर ३७८ धावांनी पिछाडीवर होता.



या सामन्यात दुसऱ्या दिवशी भारताने ९१ षटकापासून आणि २ बाद ३१८ धावांपासून पुढे खेळायला सुरुवात केली. यावेळी यशस्वी जैस्वाल १७३ धावांवर आणि शुभमन गिल २० धावांवर नाबाद होते. मात्र, दिवसाच्या दुसऱ्याच षटकात यशस्वी जैस्वाल दुर्दैवीरित्या बाद झाला. त्याने २५८ चेंडूत १७५ धावांची खेळी केली. परंतु, तो बाद झाल्यानंतर गिलला नितीश रेड्डीने साथ दिली. परंतु, तोही ४३ धावा करून बाद झाला. त्यानंतर ध्रुव जुरेलने गिलची साथ दिली. या दोघांमध्येही शतकी भागीदारी झाली. यादरम्यान, शुभमन गिलने त्याने कसोटी कारकिर्दीतील १० वे शतक पूर्ण केले. तसेच, या वर्षातील त्याचे हे ५ वे कसोटी शतक ठरले. शतकानंतर गिल आक्रमक खेळत होता. ध्रुव जुरेलही अर्धशतकाच्या जवळ होता. परंतु, तो ४४ धावांवर त्रिफळाचीत झाला. त्यामुळे तो बाद होताच कर्णधार गिलने भारताचा पहिला डाव घोषित केला. भारताने पहिल्या डावात १३४.२ षटकांत ५ बाद ५१८ धावा केल्या. या डावात पहिल्या दिवशी केएल राहुल ३८ धावांवर आणि साई सुदर्शन ८७ धावांवर बाद झाले होते. वेस्ट इंडिजकडून वॉरिकनने सर्वाधिक ३ बळी घेतले. तसेच, कर्णधार रोस्टन चेसने १ बळी घेतला.

त्यानंतर वेस्ट इंडिजचा संघ पहिल्या डावात फलंदाजीसाठी उतरला. त्यांच्याकडून जॉन कॅम्पबेल आणि तेजनारायण चंद्रपॉल यांनी डावाची सुरुवात केली. दोघांनी सुरुवात संयमी केली होती. परंतु, कॅम्पबेल १० धावांवर बाद झाला. त्यानंतर चंद्रपॉल आणि एलिक एथानाज यांनी अर्धशतकी भागीदारी केली. परंतु, चंद्रपॉल ३४ धावांवर बाद झाला. त्यानंतर मात्र वेस्ट इंडिजने एलिक एथनाज आणि कर्णधार रोस्टन चेस यांचे बळी झटपट गमावले. एथनाज ४१ धावा करून बाद झाला. त्यानंतर रोस्टन चेसल शून्यावर बाद झाला. त्यानंतर तेविन इमलाचने शाय होपला साथ दिली. त्यांनी संघाला १४० धावांपर्यंत पोहचवले. वेस्ट इंडिजने पहिल्या डावात दुसऱ्या दिवस अखेर ४३ षटकांत ४ बाद १४० धावा केल्या. भारताकडून जडेजाने ३ बळी, तर कुलदीप यादवने १ बळी घेतला.



# यू मुंबाचा बंगालवर विजय

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

प्रो कबड्डी स्पर्धेतील ७६ वा सामना यू मुंबा आणि बंगाल वॉरियर्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. चेन्नई लेगच्या शेवटच्या सामन्यात यू मुंबाने बंगाल वॉरियर्सवर दमदार विजय मिळवला आहे. हा सामना यू मुंबाने ४८-२९ च्या फरकाने आपल्या नावावर केला.

चेन्नईतील एसडीएटी मल्टीपर्पज स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात यू मुंबाच्या खेळाडूंकडून दमदार खेळ पाहायला मिळाला. या सामन्यात यू मुंबाकडून अजित चौहानने पहिली चढाई करताना १ गुण घेत संघाचे खाते उघडून दिले. तर, बंगालकडून देवांकने २ गुण घेत प्रो कबड्डी स्पर्धेत सर्वात जलद ५०० गुण घेण्याचा पराक्रम आपल्या नावावर केला आहे. सुरुवातीचा ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दोन्ही संघ ४-४ ने बरोबरीत होते. बंगालकडून देवांक दलालने चांगली सुरुवात केली. परंतु, पूर्वार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर यू मुंबाचा संघ ११-६ ने आघाडीवर होता. ११व्या मिनिटाला बंगाल वॉरियर्सचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह यू मुंबाने १५- ७ गुणांसह ८ गुणांची आघाडी घेतली. सुरुवातीच्या २० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर यू मुंबाचा संघ २४- १३ गुणांसह ११ गुणांनी आघाडीवर होता. १३ मिनिटांचा खेळ शिल्लक असताना यू मुंबाकडे १३ गुणांची आघाडी होती. उत्तरार्धातील शेवटच्या १० मिनिटांत बंगालला १५ गुणांची पिछाडी भरून काढायची होती. देवांक दलालने सुपर १० पूर्ण केले. परंतु, त्याला संघातील इतर खेळाडूंकडून साथ मिळाली नाही. शेवटची २ मिनिटे असताना यू मुंबाचा संघ ४४-२६ गुणांसह आघाडीवर होता. शेवटी यू मुंबाने या सामन्यात ४८-२९ ने विजय मिळवला.

# आफ्रिदीचे पुनरागमन

**नवी दिल्ली :** पाकिस्तान क्रिकेटने रविवारपासून सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यासाठी प्लेइंग इलेव्हन जाहीर केली. त्यांनी ३८ वर्षीय आसीफ आफ्रिदी आणि ३९ वर्षीय नोमान अली यांना संघात स्थान दिले आहे. आफ्रिदीवर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने बंदीची कारवाई केली होती; परंतु, तो आता संघात परतला आहे. ३८ वर्षीय फिरकी गोलंदाज आसिफने ५७ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये २५.४९ च्या सरासरीने १९८ बळी घेतले आहेत. तो ३९ वर्षीय फिरकी गोलंदाज नोमान अलीसोबत खेळेल. ज्याने १९ कसोटी सामन्यांमध्ये २४.७५ च्या सरासरीने ८३ बळी घेतले आहेत. २०२२ मध्ये पीसीबीने आफ्रिदीवर भ्रष्टाचारात सहभागी असलेल्या गुन्ह्यांसंदर्भात बंदी



# लिजेंड्स स्मॅशर्सची विजयी सलामी

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पूना क्लब लिमिटेड व डेक्कन जिमखाना क्लबच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या मैत्रीपूर्ण बॅडमिंटन लीगमध्ये स्ट्रायकर्स, ईगल्स शटलर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव केला.

डेक्कन जिमखाना क्लबच्या बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत शटलर्स संघाने लिजेंड्स संघाचा ३-२ असा पराभव करून पहिला विजय मिळवला. शटलर्स संघाकडून केदार नाडगोंडे, सारा नवरे, रोहित मेहेंदळे, नीरज दांडेकर, किरण संघवी, सलोनी केळकर यांनी अफलातून कामगिरी केली. अन्य लढतीत स्ट्रायकर्स संघाने हॉटफुट संघाचा ३-२ असा पराभव केला. त्यात महत्त्वाचा वाटा मृणाल शहा, पंकज शहा, आरएस बेदी, चैत्राली नवरे, अमित दरेकर, शार्दूल वाळिंबेचा होता. यश शहा, मधुर इंगळहळीकर, पराग चोपडा, देवेंद्र चितळे, देवेंद्र जोशी, अक्षय कश्यप, आनंद शहा, निहार आडकर, आर्यन शर्मा, आशना देसाईने केलेल्या सुरेख कामगिरीच्या जोरावर ईगल्स संघाने जेट्स संघाचा ५-० असा पराभव केला.

# प्रमुख फलंदाजांच्या अपयशामुळे पराभव

**। विखाशापट्टनम । प्रतिनिधी ।**

भारतीय महिला क्रिकेट संघातील वरच्या प्रमुख फलंदाजांकडून धावा होत नसल्याचा फटका गुरुवारी एकदिवसीय विश्वकरंडकात बसला. त्यामुळे दक्षिण आफ्रिका संघाकडून भारतीय महिला संघाला पराभव स्विकारावा लागला. या पराभवानंतर भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने प्रमुख फलंदाजांनी जबाबदारीने फलंदाजी करायला हवी, असे मत याप्रसंगी व्यक्त केले. स्मृती मानधना, हरमनप्रीत कौर व जेमिमा रॉड्रिग्ज या प्रमुख फलंदाजांकडून यंदाच्या विश्वकरंडकात अद्याप मोठ्या प्रमाणात धावा करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे हरमनप्रीत कौर हिने कमालीची नाराजी व्यक्त केली.



हरमनप्रीत कौर पुढे म्हणाली की, आमच्या संघातील प्रमुख फलंदाजांनी आपली जबाबदारी ओळखून खेळ करायला हवा. भारतीय संघाने मोठी धावसंख्या उभारायला हवी. या करंडकातील साखळी फेरीमध्ये सात लढती होणार आहेत. त्यामुळे अजून बराच वेळ आहे. आशावादी राहायला हवे. दक्षिण आफ्रिकन संघाविरुद्धच्या लढतीमधून खूप काही शिकायला मिळाले असल्याचे सांगितले. तसेच, हरमनप्रीत कौर हिने भारतीय संघातील प्रमुख फलंदाजांच्या अपयशावर नाराजी व्यक्त केली; मात्र, रिचा घोषच्या फलंदाजीचे कौतुकही केले. ती म्हणाली, आमचे प्रमुख फलंदाज झटपट बाद झाले. तरीही आम्ही २५०च्यावर धावा उभारल्या. या लढतीत रिचा घोष हिने अव्वल दर्जाची फलंदाजी केली. यापुढील लढतींमध्येही तिच्याकडून अशाच कामगिरीची अपेक्षा आहे. दोन्ही संघांनी या लढतीत छान खेळ केला; परंतु, सी. ट्रायऑन व नदीन दी क्लार्क या फलंदाजांनी या खेळपट्टीवर धावांचा पाठलाग करताना चांगली फलंदाजी करता येऊ शकते, हे दाखवून दिले. दक्षिण आफ्रिकन संघाने या लढतीत सरस खेळ केला. ते विजयाचे हकदार आहेत, असेही कौर म्हणाली.

# पॅरा पॉवरलिफ्टिंगमध्ये विनयचे ‘सुवर्ण’ यश

**। काहिरा । वृत्तसंस्था ।**

भारताचा पॅरा पॉवरलिफ्टिर विनयने इजिप्तमधील काहिरा येथे सुरू असलेल्या पॅरा पॉवरलिफ्टिंग जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्ण यशाची नवी गाथा रचली आहे. दुसऱ्या दिवशी झालेल्या ७२ किलो ज्युनियर प्रकारात त्याने दमदार कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले आहे.

विनयने आपल्या तीन प्रयत्नांमध्ये अनुक्रमे १३७ किलो, १४२ किलो आणि १४७ किलो वजन उचलत सुवर्णपदकावर आपला दावा केला. त्याची अंतिम फेरीतील १४७ किलो उचलण्याचा यशस्वी प्रयत्न पंचांनी अवैध ठरवला, मात्र दुसऱ्या प्रयत्नातील १४२ किलोचे यश सुवर्णपदक निश्चित करण्यासाठी पुरेसे ठरले. इक्वेडोरच्या सॅबेस्टियनने १३७ किलो वजन उचलून कांस्यपदक जिंकले. यापूर्वीही विनयने दमदार कामगिरी करत इजिप्तमधील शर्म-अल-शेख येथे झालेल्या पॅरा पॉवरलिफ्टिंग विश्व चषकात ५९ किलो ज्युनियर प्रकारात १२० किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकले होते.

# विजय हजारे चषकाला नवसंजिवनी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या देशांतर्गत क्रिकेटला नवा श्वास देणारी बातमी समोर आली आहे. भारताचे दिग्गज फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली हे दोघेही आगामी विजय हजारे चषकामध्ये खेळताना दिसणार आहेत. मुख्य निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांच्या सूचनेला सकारात्मक प्रतिसाद देत या दोन दिग्गजांनी देशांतर्गत स्पर्धेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.



जानेवारी महिन्यात न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेपूर्वी हा निर्णय घेण्यात आला आहे. आगरकर यांनी स्पष्ट केले होते की, प्रत्येक केंद्रीय करारबद्ध खेळाडू जो तंदुरुस्त आणि उपलब्ध आहे त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये भाग घेणे आवश्यक आहे. २०२७च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या दिशेने पाहता खेळाडूंनी घरच्या स्पर्धांत सातत्य ठेवणे अत्यावश्यक आहे. देशांतर्गत क्रिकेट हाच राष्ट्रीय संघाचा पाया आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या या भूमिकेनंतर विराट आणि रोहित या दोघांनीही आपला अनुभव आणि उपस्थिती देशांतर्गत क्रिकेटकडे परत नेण्याचा निर्णय घेतला आहे. दोघांनीही २४ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे चषकासाठी आपली उपलब्धता निश्चित केली असून ते किमान तीन ते चार सामने खेळतील, अशी अपेक्षा आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या शेवटच्या एकदिवसीय सामन्यानंतर (६ डिसेंबर) आणि न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यादरम्यान (११ जानेवारी) सुमारे पाच आठवड्यांचा अवकाश असल्याने या काळात दोघेही आपल्या राज्य संघांसाठी मैदानात उतरतील आणि रोहित मुंबईचे, तर विराट दिल्लचे प्रतिनिधित्व करताना दिसणार आहे. त्यामुळे या दोन्ही ताऱ्यांच्या पुनरागमनामुळे विजय हजारे चषकाचा दर्जा आणि आकर्षण दोन्हीही नव्या उंचीवर जाणार आहे.

# निवडक

## रवींद्र जडेजाचं मोठं वक्तव्य

**नवी दिल्ली :** भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा सध्या उत्कृष्ट फॉर्मात आहे. वेस्ट इंडिजविरूद्ध कसोटी मालिकेत त्याने चेंडू आणि बॅटने कमालीची कामगिरी केली आहे. याशिवाय चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या विजयातही जडेजाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यानंतरही जडेजाला ऑस्ट्रेलियाविरूद्ध एक दिवसीय मालिकेतून वगळण्यात आले आहे. याबाबत आता पहिल्यांदाच रवींद्र जडेजाने वक्तव्य केले आहे. दिल्ली कसोटीच्या दुसऱ्या दिवसानंतर पत्रकार परिषदेत, रवींद्र जडेजाने २०२७ च्या विश्वचषकाबाबत एक महत्त्वपूर्ण वक्तव्य केले आहे. एकदिवसीय संघातून वगळल्याबद्दल विचारले असता, जडेजा म्हणाला की, हे माझ्या हातात नाही. नक्कीच, मला २०२७ चा विश्वचषक खेळायचा आहे. परंतु, शेवटी संघ व्यवस्थापन, निवड समिती, प्रशिक्षक आणि कर्णधार यांनी काहीतरी विचार केला असेल, ज्यामुळे त्यांनी मला या मालिकेसाठी संघात निवडले नाही. त्यामागे नक्कीच काहीतरी कारण असेल. त्यांनी माझ्याशी या निर्णयाबद्दल चर्चा केली होती. म्हणजेच संघ जाहीर झाला तेव्हा माझी निवड केली नव्हती हा माझ्यासाठी धक्का नव्हता. ही चांगली गोष्ट आहे की कर्णधार, निवड समिती आणि प्रशिक्षकांनी मला त्यांच्या विचारांबद्दल आणि निर्णयामागील कारणांबद्दल सांगितले. मी त्याबद्दल समाधानी आहे, असे जडेजा म्हणाला.





## दिव्या मढवी, रिया घासे यांची विभागीय स्तरावर निवड

**नागोठणे :** सानेगाव आश्रम शाळा येथे नुकत्याच तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील श्रीमती गु.रा. अग्रवाल विद्यामंदिर व कै. सरेमल प्रतापमल जैन कनिष्ठ महाविद्यालयच्या १९ वर्षाखालील गटात मुलींनी विजेतेपद पटकावले असून त्यांची जिल्हास्तरावर निवड झाली होती. ही स्पर्धा अलिबाग तालुक्यातील नेहूली येथील जिल्हा क्रिडा संकुलात पार पडली. यावेळी नागोठणे संघाने महाड, कर्जत, माणगाव या संघांना पराभूत करून अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात पीएनपी अलिबाग व नागोठणे या संघांत झालेल्या चुरशीच्या लढतीत नागोठणे संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. नागोठणे संघातून खेळणाऱ्या दिव्या मढवी व रिया घासे या दोन खेळाडूंची विभागीय स्तरावर निवड झाली आहे. ही विभागीय स्पर्धा ठाणे जिल्ह्यातील पालघर येथे पार पडणार आहे.

## आफ्रिकेच्या महिला स्टार खेळाडूवर आयसीसीची कारवाई

**नवी दिल्ली :** आयसीसी महिला विश्व चषक २०२५ स्पर्धेत भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये रोमांचक सामना रंगला. या सामन्यात भारतीय संघाने २५१ धावा केल्या होत्या. या धावांचा बचाव करताना भारतीय गोलंदाजांनी पूर्ण जोर लावला. परंतु, शेवटच्या ४ षटकात सामना फिरला. दक्षिण आफ्रिकेकडून ८ व्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या क्लार्कने दमदार खेळी करून दक्षिण आफ्रिकेला विजय मिळवून दिला. दरम्यान, या सामन्यानंतर आयसीसीने दक्षिण आफ्रिका संघातील फिरकी गोलंदाज नॉनकुलुलेको मलाबावर कारवाई केली आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात झालेल्या सामन्यात १७ वे षटक टाकण्यासाठी नॉनकुलुलेको मलाबा गोलंदाजीला आली होती. त्यावेळी हरलीन देओल स्ट्राईकवर होती. नॉनकुलुलेको मलाबाच्या गोलंदाजीवर हरलीन देओल बाद होऊन माघारी परतली. बाद केल्यानंतर तिने सेलिब्रेशन करताना हरलीन देओलला टाटा बाय बायचा इशारा केला होता. हे आयसीसीला वादग्रस्त वाटलें त्यामुळे आयसीसीने तिच्यावर कारवाई केली आहे. यासह तिला १ डिमेरिट पॉईंट देखील दिला आहे.



### ६,९७८ विद्यार्थ्यांचा सहभाग | विजेत्यांची जिल्हा क्रीडा स्पर्धेसाठी निवड

# पावसाळी क्रीडा स्पर्धेची सांगता

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत पंचायत समिती शिक्षण विभाग आणि शासनाच्या क्रीडा युवक संचालनालय यांच्या माध्यमातून पावसाळी क्रीडा स्पर्धा तालुक्यातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांचा समारोप मैदानी संप्रदाहनच्या आयोजनानंतर झाला असून तालुक्यातील ६,९७८ विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रराकारात आणि स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता. महिनाभर चाललेल्या या स्पर्धेची सांगता नेरळ जवळील वंजारपाडा येथील माथेरान व्हॅली स्कुल येथे संपन्न झाली.



यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून गटविकास अधिकारी सुशांत पाटील व गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे हे उपस्थित होते. तसेच, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे उपस्थित होते. तालुका क्रीडा महोत्सवात कबड्डी, खो-खो, मैदानी, हॉलीबॉल, कॅरम, कुस्ती, कराटे, योगासने, बुद्धिबळ आणि बॅडमिंटन अशा एकूण १० खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व क्रीडा स्पर्धा १४ वर्षे, १७ वर्षे आणि १९ वर्षे अशा तीन वयोगटांमध्ये पार पडल्या. यामध्ये कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद, सर्व माध्यमांच्या अनुदानित व विनाअनुदानित आणि आश्रम शाळांमधील इयत्ता सहावी ते बारावीमध्ये शिकणाऱ्या एकूण ६,७९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धा तालुक्यातील अभिनव प्रशाला कर्जत, गुड शेफर्ड इंग्लिश मीडियम स्कूल गुंडगे, बाबा इंटरनॅशनल स्कूल बामनोली, दिलक्याप इंजिनिअरिंग कॉलेज ममदापूर आणि माथेरान व्हॅली इंग्लिश स्कूल वंजार पाडा येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. दरम्यान, प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा वैयक्तिक क्रीडा प्रकारातील जिल्हा क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. तर, सांघिक गटातील पहिला क्रमांक मिळविणाऱ्या संघांचा देखील जिल्हा क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

## कबड्डी स्पर्धेचा निकाल

**१४ वर्षाखालील मुलांमध्ये प्रथम क्रमांक जिल्हा परिषद शाळा गुडवण व दुसरा क्रमांक भाऊसाहेब राऊत विद्यालय कशेळे, तर मुलींमध्ये प्रथम क्रमांक माथेरान व्हॅली स्कुल वंजारपाडा व द्वितीय क्रमांक भाऊसाहेब राऊत विद्यालय कशेळे यांनी पटकावला आहे. १५ वर्षाखालील मुलांमध्ये प्रथम क्रमांक नेरळ विद्या मंदिर व दुसरा क्रमांक गीता घारे फाऊंडेशन स्कुल, तर मुलींमध्ये प्रथम क्रमांक अभिनव ज्ञान मंदिर कर्जत व दुसरा क्रमांक आश्रमशाळा पिंगळस यांनी पटकावला आहे. तसेच, १७ वर्षाखालील मुलांमध्ये प्रथम क्रमांक नेरळ विद्या मंदिर व दुसरा क्रमांक अभिनव ज्ञान मंदिर शाळा कर्जत, तर मुलींमध्ये प्रथम क्रमांक माथेरान व्हॅली स्कुल वंजारपाडा व दुसरा क्रमांक हुतात्मा हिराजी पाटील ज्युनियर कॉलेज यांनी पटकावला आहे.**

# मुंबईची धुरा शार्दुलच्या खांद्यावर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आगामी रणजी करंडकाच्या हंगामासाठी मुंबई क्रिकेट संघाने नवा कर्णधार जाहीर केला आहे. मुंबई क्रिकेट संघाची अनुभवी अष्टपैलू शार्दुल ठाकूरकडे नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली आहे. भारतासाठी कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० प्रकारात दमदार कामगिरी करणारा ठाकूर आता मुंबई रणजी संघाचा ‘नवा सेनापती’ म्हणून क्रिकेटभूमीवर उतरणार आहे. मुंबईचा पहिला सामना १५ ऑक्टोबरपासून श्रीनगरमध्ये जम्मू आणि कश्मीरविरुद्ध रंगणार आहे. ४२ वेळा रणजी करंडकाचे विजेतेपद पटकावणाऱ्या या परंपरागत संघाने अजिंक्य रहाणेच्या जागी शार्दुल ठाकूरची नेमणूक करत नव्या हंगामाचा सूर लावला आहे. गेल्या हंगामात मुंबईला जम्मू आणि कश्मीरकडून पराभव सहन करावा लागला होता. त्यामुळे यंदा शार्दुलच्या नेतृत्वाखाली संघ त्या पराभवाचा बदला घेण्याच्या निर्धारात आहे. मुंबईचा समावेश हिमाचल प्रदेश, दिल्ली, हैदराबाद, राजस्थान, छत्तीसगड आणि पुद्दुचेरीसह एलिट गट ‘ड’ मध्ये झाला आहे.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)